म. ग्रं सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. १८८७१५

IRBK-0119717

30 MAY 2002

## वसंत कानेटकर यांचे साहित्य

**नाटके :**

वेड्याचं घर उन्हात । देवांचं मनोराज्य । प्रेमा, तुझा रंग कसा ? । रायगडाला जेव्हा जाग येते । दोन ध्रुवांवर दोघे आपण । मत्स्यगंधा । मोहिनी । अश्रूंची झाली फुले । लेकुरे उदंड जाली । इथे ओशाळला मृत्यू । घरात फुलला पारिजात । मला काही सांगायचंय । तुझा तू वाढवी राजा । मीरा मधुरा । हिमालयाची सावली । वेड्मान । अखेरचा सवाल । नलदमयंती । विषवृक्षाची छाया । कस्तुरीमृग । माणसाला डंख मातीचा । सूर्याची पिल्ले । एक रूप : अनेक रंग । गोष्ट जन्मांतरीची । गाठ आहे माझ्याशी । कधीतरी कोठेतरी । पंखांना ओढ पावलांची. । छू मंतर ! । गगनभेदी ।

**एकांकिका :**

व्यासांचा कायाकल्प । मद्रासीने केला मराठी भ्रतार । गड गेला, पण सिंह जागा झाला । स्मगलर सम्राटांच्या न्यायालयात रामशास्त्री । झेंडे-पाटील महाविद्यालयात गंगू, अंबू, विठा । आनंदीबाई आणीबाणी पुकारतात । शहाण्याला मार शब्दांचा ।

**कादंबऱ्या :**

घर । पंख । पोरका ।

**कथा :**

लावण्यमयी ।

**टीका :**

नाटक : एक चिंतन ।

# ॥ गगनभेदी ॥

वसंत कानेटकर

IRBK-0119717

परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई चार

आवृत्ती पहिली : ऑक्टोबर १९८२ । प्रकाशन क्रमांक : ५११ । सरकारी प्रमाणपत्र डी. आर. एम्. ७. ५१/१९८२ । ९-८-८२

प्रकाशक : सौ० शुभदा विष्णू परचुरे । परचुरे प्रकाशन मन्दिर । २०३/४, मेहता भवन । ३११, राजा राममोहन रॉय मार्ग । गिरगांव, मुंबई ४०० ००४

मुद्रक : प्र० पु० भागवत । मौज प्रिंटिंग ब्यूरो । खटाववाडी गिरगांव । मुंबई ४०० ००४

मूल्य : वीस रुपये

या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत.

आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये । तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि प्रयोगमूल्य याबद्दल सौ० उषा वसंत कानेटकर, शिवाई, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा । दूरध्वनी क्रमांक २०९२



जगद्वंद्य नाटककार

**विलयम शेक्सपीयर**

यांच्या देदीप्यमान प्रतिमेस—

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
वा. क्र. ७८८९८ नों. दि. ६/५/८३
वि. नाटक क्र.

**गगनभेदी** या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग, चंद्रलेखा, मुंबई या संस्थेने शनिवार दि. ९ ऑक्टोबर १९८२ रोजी सायंकाळी सहा वाजता गोल्डन थिएटर, गोल्डन लेन, लंडन ई. सी. १ येथे सादर केला.

दिग्दर्शक : **मधुकर तोरडमल** । नेपथ्य/प्रकाश : **मोहन वाघ** । रंगभूषा : **कृष्णा बोरकर** । ध्वनी : **गणेश गोरे** । वेशभूषा : **पॅमसन मेन्स वेअर** । **अनिल दळवी** । **लक्ष्मण गोपाळ** । निर्मितिसाहाय्यक : **हनुमान शिंदे** । व्यवस्थापक : **मनोहर कदम** । पार्श्वसंगीत : **अनंत अमेंबल**

*कलाकार :* विक्रम : **मधुकर तोरडमल** । बलराज : **नरेन चव्हाण** । दयाळजी : **मोहन मुंगी** । प्रियरंजनदास : **जगन्नाथ कांदळगावकर** । उदय : **उपेंद्र दाते** । बाळाराम : **मधू कडू** । ललितागौरी : **उषा लिमये** । जाई : **वंदना गुप्ते** । रूपाली : **अश्विनी भावे**

## मुजरा

'गगनभेदी' हे प्रा. वसंत कानेटकरांचे; त्यांचा मानबिंदू असलेले नाटक मराठी वाचकांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. गेली अनेक वर्षे प्रा. कानेटकर या नाटकाचे चिंतन करीत होते. किंबहुना कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना त्यांचा शेक्सपीअरचा जो अभ्यास झाला तेव्हाच कधी तरी या नाटकाचा जन्म झालेला आहे आणि त्या चिंतनाचा परिपाक म्हणजे 'गगनभेदी' हे नाटक होय. मराठीत शेक्सपीअरच्या नाटकांची अनेक रूपांतरे झालेली आहेत, परंतु शेक्सपीअरच्या चार शोकांतिकांमध्ये (हॅम्लेट, ऑथेल्लो, मॅकबेथ आणि किंग लिअर) जी निरनिराळी व्यक्तिमत्त्वे आहेत हे सर्व काव्यात्मे आहेत आणि त्यांचे मर्म सांगण्यासाठी, मानवी जीवनाचे, मानवी स्वभावाचे, दैवयोजनेचे, व्यक्ती आणि नियतीच्या संघर्षाचे पापुद्रे उलगडून दाखविण्यासाठी प्रा. कानेटकरांनी या नाटकात आपल्यासमोर विक्रम हे पात्र उभे केले आहे. अशा तऱ्हेने चार शोकांतिका मिळून एक कथासूत्र निर्माण करून प्रा. कानेटकरांनी मराठी रंगभूमीवर एक 'विक्रम'च केला आहे. त्याचप्रमाणे 'गगनभेदी' या नाटकाचे निर्माते आमचे मित्र श्री. मोहन वाघ, दिग्दर्शक प्रा. मधुकर तोरडमल यांनी नाटकाचा प्रथम प्रयोग शेक्सपीअरच्या जन्मभूमीत, लंडनमध्ये सादर करून मराठी रंगभूमीच्या इतिहासात एका नव्या 'विक्रमा'ची नोंद केली आहे. लेखक, निर्माता आणि दिग्दर्शक यांचेबरोबर या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ शेक्सपीअरच्या जन्मग्रामी (स्ट्रॅटफोर्ड-ऑन-ॲव्हन) करून मराठी प्रकाशन व्यवसायात आम्हीसुद्धा एक 'विक्रम'च करीत आहोत. अशा सर्वार्थाने 'विक्रमी' असलेल्या नाट्याची पहिली प्रत शेक्सपीअरच्या समाधीवर ठेवून आम्ही शेक्सपीअरला करीत असलेला हा मानाचा मुजरा.

—प्रकाशक

## मुजरा

'गगनभेदी' हे प्रा. वसंत कानेटकरांचे; त्यांचा मानबिंदू असलेले नाटक मराठी वाचकांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. गेली अनेक वर्षे प्रा. कानेटकर या नाटकाचे चिंतन करीत होते. किंबहुना कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना त्यांचा शेक्सपीअरचा जो अभ्यास झाला तेव्हाच कधी तरी या नाटकाचा जन्म झालेला आहे आणि त्या चिंतनाचा परिपाक म्हणजे 'गगनभेदी' हे नाटक होय. मराठीत शेक्सपीअरच्या नाटकांची अनेक रूपांतरे झालेली आहेत, परंतु शेक्सपीअरच्या चार शोकांतिकांमध्ये (हॅम्लेट, ऑथेल्लो, मॅकबेथ आणि किंग लिअर) जी निरनिराळी व्यक्तिमत्त्वे आहेत हे सर्व कान्यात्मे आहेत आणि त्यांचे मर्म सांगण्यासाठी, मानवी जीवनाचे, मानवी स्वभावाचे, दैवयोजनेचे, व्यक्ती आणि नियतीच्या संघर्षाचे पापुद्रे उलगडून दाखविण्यासाठी प्रा. कानेटकरांनी या नाटकात आपल्यासमोर विक्रम हे पात्र उभे केले आहे. अशा तऱ्हेने चार शोकांतिका मिळून एक कथासूत्र निर्माण करून प्रा. कानेटकरांनी मराठी रंगभूमीवर एक 'विक्रम'च केला आहे. त्याचप्रमाणे 'गगनभेदी' या नाटकाचे निर्माते आमचे मित्र श्री. मोहन वाघ, दिग्दर्शक प्रा. मधुकर तोरडमल यांनी नाटकाचा प्रथम प्रयोग शेक्सपीअरच्या जन्मभूमीत, लंडनमध्ये सादर करून मराठी रंगभूमीच्या इतिहासात एका नव्या 'विक्रमा'ची नोंद केली आहे. लेखक, निर्माता आणि दिग्दर्शक यांचेबरोबर या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ शेक्सपीअरच्या जन्मग्रामी (स्ट्रॅटफोर्ड-फॉन-ॲव्हन) करून मराठी प्रकाशन व्यवसायात आम्हीसुद्धा एक 'विक्रम'च करीत आहोत. अशा सर्वार्थाने 'विक्रमी' असलेल्या नाट्याची पहिली प्रत शेक्सपीअरच्या समाधीवर ठेवून आम्ही शेक्सपीअरला करीत असलेला हा मानाचा मुजरा.

—प्रकाशक

# निवेदन

विल्यम शेक्सपिअर हा एक जगद्वंद्य नाटककार आहे. त्याच्या हॅम्लेट, मॅकबेथ, ऑथेल्लो आणि किंग लिअर या थोर शोकात्मिका म्हणजे या महाकवीच्या प्रतिभेचा एक देदीप्यमान चिद्‌विलास आहे. जगातला प्रत्येक मोठा नट या भूमिका रंगमंचावर आपल्या सर्व शक्तीनिशी साकार करण्यात धन्यता मानीत आलेला आहे; आणि जगातल्या प्रत्येक भाषेतला नाटककार शेक्सपिअरच्या या कलाकृती आपल्या भाषेत, शब्दांत पकडण्याची धडपड करीत आला आहे. नाट्य, काव्य, संवाद, व्यक्तिचित्रण, मनोवगाहन, रसवत्ता आणि व्यक्ती विरुद्ध नियती यावर चटका लावणारे जीवनभाष्य, या सर्वच बाबतींत 'शेक्सपिअर' हा शेवटचा शब्द आहे.

विद्यार्थीदशेमध्ये शेक्सपिअरची आणि माझी पहिली भेट झाली आणि उत्तरोत्तर शेक्सपिअरच्या विविध कलागुणांचे आणि सामर्थ्याचे दर्शन घडत गेले तसतशी ही भक्ती गाढ आणि उत्कट होत गेली. माझ्या आजवरच्या सुमारे तीस नाटकांवर कमीअधिक प्रमाणात शेक्सपिअर-स्पर्शाची दाट छाया पडली आहे. या गुरुऋणातून मुक्त होण्याचा मी केलेला एक अल्पसा प्रयत्न म्हणजेच 'गगनभेदी'. शेक्सपिअरच्या ट्रॅजिडीचे नायक गगनभेदी असतात म्हणून तर त्यांचे उन्मळणे नाटकातल्या पात्रांनाच नव्हे, तर प्रेक्षकांनाही चटका लावून जाते. हॅम्लेटची ऑफिलिया हॅम्लेटबद्दल सहज जे बोलून जाते— "what a great mind is here overthrown!" ते वस्तुतः शेक्सपिअरच्या सगळ्याच शोकान्त नायकांचे अंतरंग सूचित करते.

या चार ट्रॅजिडींचा अभ्यास करताना कित्येक वर्षांपासून मला जाण आली होती की देहाने हे चार नायक आणि त्यांची कहाणी वेगवेगळी असली, तरी त्यांचा आत्मा एकच आहे. त्या सर्वांत काहीएक 'रक्ताचे नाते' आहे. त्यांच्या सुखदुःखाची जात एक आहे, तसेच नियतीने आव्हान टाकल्यावर त्याला भिडण्याची जिद्द आणि वृत्तीही एकच आहे. हे सर्व नायक वृत्तीने 'मनस्वी' आणि अंतःकरणाने 'काव्यात्मे' आहेत. म्हणून तर सामान्य, सरपटणाऱ्या आणि पदोपदी व्यवहाराला शरण जाणाऱ्या पोटभरू दीड


विटीच्या दुनियेत त्यांची धिंड निघते. हे सगळे नायक कधीकाळी वेडाच्या अवस्थेला स्पर्श करून आले आहेत आणि त्यांच्या दुर्भाग्याला कमीअधिक प्रमाणात स्त्रीत्वाची विविध रूपे कारण झाली आहेत. कधी आई, कधी बायको, तर कधी कन्या. आणि इतके असूनही हे सर्व नायक स्वतःच आपल्या दुर्भाग्याचे शिल्पकार आहेत.

हॅम्लेट, मॅकबेथ, ऑथेल्लो आणि लियर या जबरदस्त व्यक्तिरेखा खऱ्या; पण मूलतः या 'मनोवृत्ती' आहेत आणि 'मनोवस्था' देखील आहेत. कोणे एके समयी माझ्या मनात असा विचार आला की ह्या चार 'मनोवस्था' असतील तर त्या एकाच माणसाच्या आयुष्यात भिन्न भिन्न काळी संक्रान्त होणेही शक्य आहे. त्यातून शोध घेताना एक दिवस या सर्व शोकात्म नायकांच्या जीवनसंघर्षाचे एक सूत्र मला सापडले. ही कहाणी अशा एका माणसाची आहे की जो जन्मभर एकाकी राहिला, उध्वस्त झाला—प्रथम त्याच्या आईमुळे, नंतर त्याच्या बायकोमुळे आणि नंतर त्याच्या मुलीमुळे. या सूत्राबरोबरच माझ्या मनात एक आकृतिबंध उभा राहिला. पहिल्या अंकात हॅम्लेट, दुसऱ्या अंकात मॅकबेथ–ऑथेल्लो आणि तिसऱ्या अंकात किंग लिअर—या मनोवृत्तींचे संक्रमण कालान्तराने, पण एकाच नायकाच्या आयुष्यात घडत जाते. हे सूत्र आणि हा आकृतिबंध मनात बाळगून भारतीय मातीतून मी एक नाट्यकृती घडवण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्याचेच नाव 'गगनभेदी'. हा प्रयत्न कितपत यशस्वी झाला आहे ते या क्षेत्रातले जाणकार ठरवतील.

या नाट्यलेखनात माझे मित्र आणि शेक्सपिअरचे गाढे अभ्यासक प्रा. मधुकर तोरडमल यांचे मला अमोल साहाय्य झाले, तसेच या नाटकाची प्रचंड उत्साहाने निर्मिती करणारे माझे मित्र श्री. मोहन वाघ आणि या नाटकाचे देखणे पुस्तक तयार करणारे माझे मित्र श्री. अप्पासाहेब परचुरे यांचेही मला फार मोठे साहाय्य झाले आहे. या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग लंडन येथे महाराष्ट्र मंडळाच्या महोत्सवासाठी होत आहे आणि या नाटकाचे प्रकाशनही शेक्सपिअरच्या जन्मग्रामी (स्ट्रॅटफोर्ड–ऑन–ॲव्हन) होत आहे. यापरते दुसरे कोणते 'अहोभाग्य' मला लाभेल!

शिवाई, शरणपूर रोड
नासिक २

**वसंत कानेटकर**



# अंक पहिल

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
दा. क्र. ९८७९८ नों. दि. ........ ७।५।८३
वि. ... नाटक ... क्र. ........

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[राजेंद्रनगर. या नगरातील प्रख्यात उद्योगपती श्रीमान शिवशंकर राजेंद्र—आता कैलासवासी, यांच्या परिवाराचे निवासस्थान असलेला प्रासादतुल्य ललितमहाल. या महालातील तळमजल्यावरील हॉल. समोरच्या भिंतीत प्रचंड महाद्वार. बाहेर व्हरांडा. त्यामागे बागबगीचा. हॉलमधील सजावट उद्योगपतीच्या निवासाला साजेल-शोभेलशी.
वेळ सायंकाळची. पडदा वर जातो त्या वेळी रंगमंचावर कोणीही नाही. मात्र दुरून कोठून तरी हास्यकल्लोळ आणि वाद्यवृंद-संगीत यांचा जल्लोष अगदी अस्पष्ट ऐकू येतोय. रंगमंच प्रकाशाने उजळल्यावर बाहेर मोटार थांबल्याचा आवाज. तशी आतून दोन चपराशी लगबगीने बाहेर धावत जातात. क्षणभरातच परदेशाहून परतल्यासारख्या मोठमोठ्या सूटकेसीस् बॉक्सीस, पेलत ते परत येतात व आत जातात. बलराजच्या आवाजात त्यांना काही सूचना दिलेल्याही ऐकू येतात. क्षणभराने एक छोटी ब्रीफकेस घेऊन विक्रम दाराशी येतो. एकदम थबकतो. व्हरांड्यातूनच दूरवरून येणाऱ्या जल्लोषाचा शोध घेऊ लागतो. विक्रम तिशीतला उमदा, देखणा तरुण. मुद्रा तेजस्वी, पण अस्वस्थ आणि उदास. डोळे चमकदार, बोलके, पण दृष्टी हरवलेली. अंगावर किमती सूट. क्षणार्धातच बलराज येतो. तोही विक्रमला पाहात गडबडून थबकतो. बलराजही विक्रमच्याच वयाचा. अंमळ अधिक नाजूक आणि देखणा. अंगात पँट-बुशशर्ट, पायात सँडल्स. त्याच्या दोन्ही हातांत छोट्या बॅग्ज.]

**बलराज :** विक्रम, तुझं बाकीचं सगळं बॅग अँड बॅगेज तुझ्यासाठी तयार केलेल्या रूमवर न्यायला सांगितलंय. फक्त—

**विक्रम :** (आपल्याच नादात दूरवर पाहात) बलराज...गड्या हा काय प्रकार चाललाय? ही—ही रोषणाई कसली? हा ऑर्केस्ट्रा, हा हास्यकल्लोळ...कुठं, जवळपासच्या बंगल्यात लॉन-पार्टी चाललीय का?

**बलराज :** जवळपासच्या बंगल्यात नाही. या—या आपल्या ललितमहालाच्या आवारातच पार्टी चाललीय...[विक्रम थक्क होऊन 'काऽय?' या अर्थाच्या दृष्टीनं बघू लागतो तशी—] इतका वेळ मी तेच तुला सांगायचा प्रयत्न करतोय, पण...म्हणजे...जवळ-जवळ रोजच इथं मेजवान्या झडताहेत.

**विक्रम :** (ताडकन्) क...काय सांगतोस काय तू मला बलराज? रोऽज! या—या ललितमहालाच्या हिरवळीवर मेजवान्याऽ! अरे या ललितमहालाचा धनी, या उद्योग-समूहाचा स्वामी, या राजेंद्रनगराचा प्राण, शिवशंकर राजेंद्र—माझे पपा, अपघातात ठार झाले त्याला पुरतं वर्षही उलटलं नाही आणि—

**बलराज :** राजेंद्र उद्योगसमूहाचं हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे विक्रम.

**विक्रम :** (उसळून आत येत) हेल वुइथ इट! अरे या उद्योगसमूहाचा शिल्पकार डोक्यावर तुळई कोसळून कारखान्यातच चिरडून ठार झाला—अवघ्या दहा महिन्यां-पूर्वी. आणि—(थबकून पुन्हा बाहेर जाऊन न्याहाळून, मग माघारी फिरत आवेगानं) आय सीऽऽ! आत्ता माझ्या डोक्यात प्रकाश पडला. हा हा सगळा तमाशा, उलट्या काळजाच्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्सनी चालवला असला पाहिजे. नफा, भत्ते, चंगळ आणि चैन एवढाच हिशेब ज्यांना कळतो, ते प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारे राक्षस, दहा महिन्यांपेक्षा अधिक किती काळ धीर धरणार? पण उद्योगसमूहाचे जनरल मॅनेजर, पपांचे उजवे हात, ज्यांना पपांनी धाकट्या भावासारखं वाढवलं, ते प्रियरंजनदास; पपांचे पर्सनल असिस्टंट, माझ्या लाडक्या जाईचे वडील दयाळसाहेब कसे कबूल झाले या उत्सवाला? का बोर्डावरल्या सगळ्या गिधाडांनी या दोघांना धुळीत भिरकावून दिलंय? काय घडलंय तरी काय? बलराज, तू माझा जिवलग मित्र असलास तरी माझ्यापासून काहीतरी लपवतो आहेस. (थबकून) आई कुठाय? सांग, सांग बलराज, आई कुठाय? मला भेटायला ती का पुढं आली नाही? एयरपोर्टवर तुझ्याशिवाय कोणीच कसं आलं नाही? दयाळसाहेब, खानझोडे, कीर्तिकर, पापामिया, नटवरलाल—पपांचे सगळे डावे-उजवे हात काय करीत होते? मेजवानीवर ताव मारीत होते? एक वृक्ष उन्मळून पडला की सगळ्या फांद्या झडून जायच्या आणि पालवी सुकून जायची हे मलाच कळायला हवं होतं! पण जाई? एयरपोर्टवर जाई का नाही आली? मी येणार आहे हे तिला ठाऊक होतं. की दयाळसाहेबांनी आपल्या लाडक्या लेकीला मला भेटायची देखील बंदी केलीय?

**बलराज :** तेच तू शांतपणे समजून घेतलं पाहिजेस. विक्रम, या दहा महिन्यांत या राजेंद्रनगरात बरंच काही घडलंय!

**विक्रम :** मला कल्पना आलीय त्याची. या प्रासादातला वनराज गारद होताच बिळा-बिळातल्या उंदरांनी धुमाकूळ माजवून राजेंद्रनगर पादाक्रांत केलंय.

**बलराज :** तेवढंच नाही. आणखी बरंच काही बदलंय. पण परिस्थितीला तुला धीटपणानं

सामोरं गेलंच पाहिजे. अगदी दगडासारख्या घट्ट मनानं.

**विक्रम :** (न्याहाळत) तुला काय सांगायचंय बलराज ? [बलराज सांगण्याची धडपड करतो, पण गप्प राहातो. तशी—] ठीक आहे. (आत जाऊ लागत) प्रथम आपण आईला भेटू या आणि मग बोलायला आपल्याला भरपूर वेळ—

**बलराज :** (एकदम अडवीत) थांब विक्रम. आईसाहेब घरात नाहीयेत.

**विक्रम :** (थबकून वळून) घरात नाहीये ? मग कुठाय ?

**बलराज :** त्या...तिथं...बाहेर हिरवळीवर पाहुण्यांची देखभाल करताहेत.

**विक्रम :** (धक्का बसत) क...क...काऽय ? काऽय ? तिथंऽऽ ? आईऽऽ ? मेजवानीत पाहुण्यांची देखभाल···? नाही...नाही...नाही...तुझी काहीतरी गफलत होतेय... क...कदाचित असं असेल की पपांनी सुरू केलेला सुवर्णमहोत्सव पुरा व्हावा... म्हणजे तशी त्यांची अखेरची इच्छा...म्हणजे शो मस्ट गो ऑन तसं...हो हो, तसंच असणार...म्हणूनच ती...ती सगळं दुःख गिळून टाकून कदाचित...

**बलराज :** नाही विक्रम. तुझ्या आईसाहेब पाहुण्यांचा पाहुणचार अगदी आनंदानं, प्रफुल्लित अंतःकरणानं करताहेत आपल्याऽऽ...नव्या पतिराज्यांच्या समवेत !

**विक्रम :** (वज्रघात होऊन) क...क...काय काय काय म्हणालास ? आपल्या कोऽण ? नव्या कोण ? (अंगावर धावून जात त्याचा गळा पकडत) कोऽण ?

**बलराज :** (सोडवून घेत) माझा गळा घोटलास तरी सत्य बदलणार नाहीये विक्रम.

**विक्रम :** (त्याला दूर सारीत) पतिराऽज ? नाही...नाही...नाऽही ! चुकलो म्हण ! खोटं बोललो म्हण ! राजा, मस्करी केली म्हण. पण हे—हे खरं नाहीये, एवढंच सांग. एवढीच भिक्षा घाल मला. मित्रा मित्रा...[बलराज खाली मान घालून उभा राहातो तशी—] अशी खाली मान घालून राहू नकोस. मित्रा, हे कसं शक्य आहे ? अरे आईचं पपांच्यावर किती गाढ उत्कट प्रेम होतं हे तुला ठाऊक नाही. तिच्या एकनिष्ठतेची धार तरवारीच्या लखलखत्या पात्यासारखी होती. अरे माझे पपा होतेच तसे पराक्रमी, कर्तबगार, चारित्र्यसंपन्न आणि प्रेमळ. आईवर त्यांची अपार अपार प्रीती होती. एक तार छेडली तर दुसरीवर तिचा झंकार उमटावा; एकाच्या डोळ्यात चिंतेचा ढग दिसायपूर्वी दुसऱ्याचे डोळे डबडबून यावेत; एकानं ओठ उघडण्यापूर्वीच दुसऱ्यानं मनोगत बोलून दाखवावं इतके दोघेही एकरूप झाले होते. मी तुला सांगतो बलराज, ज्या स्त्रीनं एकदा पपांच्यावर प्रेम केलं ती आयुष्यात कोणा पुरुषोत्तमाकडं ढुंकूनसुद्धा बघायची नाही, असला पूर्ण पुरुष होता तो. आणि तू म्हणतोस— (थबकून) तुला कोणीतरी काहीतरी चुकीचं सांगितलंय. तुला कोणीतरी बनवलंय. मित्रा, असं होणार नाही, असं कदापि—कदापि घडणार नाही. अरे असला काही प्रकार घडता तर तो मला आधी कळला नसता का ? थांब, लेट मी टेस्ट यू. कोण आहे तो ? सांग, कोण आहे तो ? असल्या पूर्ण पुरुषाला अवघ्या दहा महिन्यांत

**बलराज :** जवळपासच्या बंगल्यात नाही. या—या आपल्या ललितमहालाच्या आवारातच पार्टी चाललीय...[विक्रम थक्क होऊन 'काऽय?' या अर्थाच्या दृष्टीनं बघू लागतो तशी—] इतका वेळ मी तेच तुला सांगायचा प्रयत्न करतोय, पण...म्हणजे...जवळ-जवळ रोजच इथं मेजवान्या झडताहेत.

**विक्रम :** (ताडकन्) क...काय सांगतोस काय तू मला बलराज? रोऽज? या—या ललितमहालाच्या हिरवळीवर मेजवान्याऽ? अरे या ललितमहालाचा धनी, या उद्योग-समूहाचा स्वामी, या राजेंद्रनगराचा प्राण, शिवशंकर राजेंद्र—माझे पपा, अपघातात ठार झाले त्याला पुरतं वर्षही उलटलं नाही आणि—

**बलराज :** राजेंद्र उद्योगसमूहाचं हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे विक्रम.

**विक्रम :** (उसळून आत येत) हेल विइथ इट! अरे या उद्योगसमूहाचा शिल्पकार डोक्यावर तुळई कोसळून कारखान्यातच चिरडून ठार झाला—अवघ्या दहा महिन्यां-पूर्वी. आणि—(थबकून पुन्हा बाहेर जाऊन न्याहाळून, मग माघारी फिरत आवेगानं) आय सीऽऽ! आत्ता माझ्या डोक्यात प्रकाश पडला. हा हा सगळा तमाशा, उलट्या काळजाच्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्सनी चालवला असला पाहिजे. नफा, भत्ते, चंगळ आणि चैन एवढाच हिशेब ज्यांना कळतो, ते प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारे राक्षस, दहा महिन्यांपेक्षा अधिक किती काळ धीर धरणार? पण उद्योगसमूहाचे जनरल मॅनेजर, पपांचे उजवे हात, ज्यांना पपांनी धाकट्या भावासारखं वाढवलं, ते प्रियरंजनदास; पपांचे पर्सनल असिस्टंट, माझ्या लाडक्या जाईचे वडील दयाळसाहेब कसे कबूल झाले या उत्सवाला? का बोर्डावरल्या सगळ्या गिधाडांनी या दोघांना धुळीत भिरकावून दिलंय? काय घडलंय तरी काय? बलराज, तू माझा जिवलग मित्र असलास तरी माझ्यापासून काहीतरी लपवतो आहेस. (थबकून) आई कुठाय? सांग, सांग बलराज, आई कुठाय? मला भेटायला ती का पुढं आली नाही? एयरपोर्टवर तुझ्याशिवाय कोणीच कसं आलं नाही? दयाळसाहेब, खानझोडे, कीर्तिकर, पापामिया, नटवरलाल—पपांचे सगळे डावे-उजवे हात काय करीत होते? मेजवानीवर ताव मारीत होते? एक वृक्ष उन्मळून पडला की सगळ्या फांद्या झडून जायच्या आणि पालवी सुकून जायची हे मलाच कळायला हवं होतं! पण जाई? एयरपोर्टवर जाई का नाही आली? मी येणार आहे हे तिला ठाऊक होतं. की दयाळसाहेबांनी आपल्या लाडक्या लेकीला मला भेटायची देखील बंदी केलीय?

**बलराज :** तेच तू शांतपणे समजून घेतलं पाहिजेस. विक्रम, या दहा महिन्यांत या राजेंद्रनगरात बरंच काही घडलंय!

**विक्रम :** मला कल्पना आलीय त्याची. या प्रासादातला वनराज गारद होताच बिळा-बिळातल्या उंदरांनी धुमाकूळ माजवून राजेंद्रनगर पादाक्रांत केलंय.

**बलराज :** तेवढंच नाही. आणखी बरंच काही घडलंय. पण परिस्थितीला तुला धीटपणानं

सामोरं गेलंच पाहिजे. अगदी दगडासारख्या घट्ट मनानं.

**विक्रम :** (न्याहाळत) तुला काय सांगायचंय बलराज ? [बलराज सांगण्याची धडपड करतो, पण गप्प राहातो. तशी—] ठीक आहे. (आत जाऊ लागत) प्रथम आपण आईला भेटू या आणि मग बोलायला आपल्याला भरपूर वेळ—

**बलराज :** (एकदम अडवीत) थांब विक्रम. आईसाहेब घरात नाहीयेत.

**विक्रम :** (थबकून वळून) घरात नाहीये ? मग कुठाय ?

**बलराज :** त्या...तिथं...बाहेर हिरवळीवर पाहुण्यांची देखभाल करताहेत.

**विक्रम :** (धक्का बसत) क...क...काऽय ? का ऽ य ? तिथं ऽ ऽ ? आई ऽ ऽ ? मेजवानीत पाहुण्यांची देखभाल···? नाही...नाही...नाही...तुझी काहीतरी गफलत होतेय... क...कदाचित असं असेल की पपांनी सुरू केलेला सुवर्णमहोत्सव पुरा व्हावा... म्हणजे तशी त्यांची अखेरची इच्छा...म्हणजे शो मस्ट गो ऑन तसं...हो हो, तसंच असणार...म्हणूनच ती...ती सगळं दुःख गिळून टाकून कदाचित... .

**बलराज :** नाही विक्रम. तुझ्या आईसाहेब पाहुण्यांचा पाहुणचार अगदी आनंदानं, प्रफुल्लित अंतःकरणानं करताहेत आपल्या ऽ ऽ...नव्या पतिराज्यांच्या समवेत !

**विक्रम :** (वज्रघात होऊन) क...क...काय काय काय म्हणालास ? आपल्या कोऽण ? नव्या कोण ? (अंगावर धावून जात त्याचा गळा पकडत) को ऽ ण ?

**बलराज :** (सोडवून घेत) माझा गळा घोटलास तरी सत्य बदलणार नाहीये विक्रम.

**विक्रम :** (त्याला दूर सारीत) पतिरा ऽज ? नाही...नाही...नाऽही ! चुकलो म्हण ! खोटं बोललो म्हण ! राजा, मस्करी केली म्हण. पण हे—हे खरं नाहीये, एवढंच सांग. एवढीच भिक्षा घाल मला. मित्रा मित्रा...[बलराज खाली मान घालून उभा राहातो तशी—] अशी खाली मान घालून राहू नकोस. मित्रा, हे कसं शक्य आहे ? अरे आईचं पपांच्यावर किती गाढ उत्कट प्रेम होतं हे तुला ठाऊक नाही. तिच्या एकनिष्ठतेची धार तरवारीच्या लखलखत्या पात्यासारखी होती. अरे माझे पपा होतेच तसे पराक्रमी, कर्तबगार, चारित्र्यसंपन्न आणि प्रेमळ. आईवर त्यांची अपार अपार प्रीती होती. एक तार छेडली तर दुसरीवर तिचा झंकार उमटावा; एकाच्या डोळ्यात चिंतेचा ढग दिसायपूर्वी दुसऱ्याचे डोळे डबडबून यावेत; एकानं ओठ उघडण्यापूर्वीच दुसऱ्यानं मनोगत बोलून दाखवावं इतके दोघेही एकरूप झाले होते. मी तुला सांगतो बलराज, ज्या स्त्रीनं एकदा पपांच्यावर प्रेम केलं ती आयुष्यात कोणा पुरुषोत्तमाकडं ढुंकूनसुद्धा बघायची नाही, असला पूर्ण पुरुष होता तो. आणि तू म्हणतोस— (थबकून) तुला कोणीतरी काहीतरी चुकीचं सांगितलंय. तुला कोणीतरी बनवलंय. मित्रा, असं होणार नाही, असं कदापि—कदापि घडणार नाही. अरे असला काही प्रकार घडता तर तो मला आधी कळला नसता का ? थांब, लेट मी टेस्ट यू. कोण आहे तो ? सांग, कोण आहे तो ? असल्या पूर्ण पुरुषाला अवघ्या दहा महिन्यांत

विसरून आईनं या, या वयात लंपटपणे ज्याच्या गळ्यात स्मशानवाईनं माळ घालावी, असा कोण पुरुषोत्तम विधात्यानं या भूतलावर घडवलाय? कोणी नाही. मी सांगतो, असले चमत्कार विधात्यालाही पुनःपुन्हा करता येत नाहीत. (पिसाटासारखा हसत( व्हॉट् अ सिली न्यूज! तू मूर्ख आहेस बलराज, तू बावळट आहेस. तू फसला आहेस. कोणीतरी तुला फसवलं आहे. खरं आहे ना? होय म्हण...खरं आहे ना?

[बलराज मान वर करून व्याकूळ दृष्टीनं त्याच्यांकडं फक्त बघतो. तशी दचकून—मागे मागे सरत किंचाळत]

नाही...नाहीऽऽऽ?

[धक्का बसून थरथरत मागे सरत]

तर मग मीच मूर्ख आहे...बावळट आहे...मीच फसलो गेलोय...(शुष्क दृष्टीने पाहात) क...क...कोण आहे तो?

**बलराज** : राजेंद्र उद्योगसमूहाचे एकेकाळचे जनरल मॅनेजर—

**विक्रम** : (दचकून) न...नाही नाही...

**बलराज** : एकेकाळचे पपांचे उजवे हात...त्याचे दूरचे भाऊ...आजचे मॅनेजिंग डिरेक्टर—

**विक्रम** : प्रियरंजनदास? तो...तो...आमच्या नात्यातला एक आश्रित...?

[बलराज मानेनं 'होय' म्हणतो तशी विक्रम हातातली बॅग भिरकावीत "ओ गॉड...हेल अपॉन मी!" असे किंचाळीत मटकन् बसतो. तळव्यानं तोंड झाकून मूक रुदन करू लागतो. त्या रुदनातही त्याची सगळी तडफड अगदी उतू जाते. बलराज जवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवीत—"शांत हो विक्रम...शांत हो" अशी समजूत घालू पाहातो. पण विक्रम त्याचा हात आवेगानं झिडकारून टाकतो. अखेर प्रयासानं तो स्वतःला सावरतो. आणि मग—]

**विक्रम** : माफ कर मला बलराज, क्षणमात्र माझा तोल गेला. जायला नको होता; पण गेला. सो दॅटस् दॅट! तर मग या प्रासादातल्या हिरवळींवर चाललेली ही मेजवानी, हा उत्सव, नवविवाहितांच्या सन्मानार्थ चालली आहे तर!

**बलराज** : तसं नाही विक्रम, राजेंद्र उद्योगसमूहाच्या सुवर्णमहोत्सवासाठी—

**विक्रम** : (कडाडत) सुवर्णमहोत्सव ही एक निव्वळ धूळफेक आहे, बलराज, लोकांनी तोंडात शेण घालू नये म्हणून मिरवलेली एक सबब आहे. या सुवर्णमहोत्सवात, कारखान्याच्या हितसंबंधात सगळ्या कामगारांना सहभागी करून घेण्याची एक योजना पपा जाहीर करणार होते.

**बलराज** : सहकाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध!

**विक्रम** : होय; होय—सगळ्या सहकाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध. भल्या गोष्टीसाठी पोटार्थी सहकारी, नेत्याचे पाय ओढणार असतील तर, त्यांचा विरोध मोडून काढून योजना—

**बलराज** : नव्या मॅनेजिंग बॉडीनं ती योजना रद्द केलीय.

**विक्रम** : ती योजना रद्द करता यावी म्हणून मी परत यायच्या पूर्वीच, नव्या मॅनेजिंग बॉडीची आणि नव्या मॅनेजिंग डिरेक्टरची निवड करण्यात आली. होय ना ? आणि माझा अडथळा, परस्पर दूर केला जावा म्हणून स्मशानबाईनं हे लग्न—(थबकून) आय सीऽऽ. आता सगळे धागेदोरे मला स्पष्ट होत चालले आहेत.

**बलराज** : कोणते धागेदोरे ?

**विक्रम** : महिन्यापूर्वी मला एक निनावी पत्र आलं होतं. राजेंद्र नगरातील कोणा एका कामगाराचं. निनावी पत्रावर मी विश्वास ठेवीत नाही म्हणून मी तात्काळ चुरगाळून टाकलं. पण— (थबकतो.)

**बलराज** : काय होतं त्या पत्रात ?

**विक्रम** : तुळई कोसळून पपा ठार झाले, हा अपघात नव्हता तर जाणूनबुजून पूर्व-नियोजित असा तो खून—

**बलराज** : (त्याच्या तोंडावर हात ठेवीत) तोंड आवर मित्रा... भिंतीलाही कान असतात. जमाना बदललाय आता.

**विक्रम** : म्हणून काय होईल ? ज्यानं पपांना मारलं तोच मलाही—

**बलराज** : त्याच्या आधी लोकच तुला जायबंदी करतील. प्रियरंजनदास किती लोकप्रिय आहेत त्याची तुला कल्पना नाही.

**विक्रम** : पपांची सत्ता त्यानं बोलबोल म्हणता बळकावली यावरून मला त्याची खात्रीच पटलीय !

**बलराज** : नुसती सत्ताच नव्हे, त्यांची बायकोदेखील.

**विक्रम** : हूंऽऽ ! माझा पक्का बंदोबस्त करण्याची कडेकोट सिद्धता झालीय तर !

**बलराज** : मित्रा, तुला फार धोरणीपणानं पावलं टाकायला हवीत.

**विक्रम** : (शून्यात पाहात) हूंऽऽ ! कधी झालं हे लग्न ?

**बलराज** : महिन्यापूर्वी, म्हणजे जाहीर रीतीनं.

**विक्रम** : अस्संऽ ! या विवाहाच कोणालाही आश्चर्य वाटलं नाही ? कोणालाही धक्का बसला नाही ? कोणीही आपला विरोध नोंदवला नाही ?

**बलराज** : आश्चर्य वाटलं आणि धक्का बसला तरी तोंड कोण उघडणार ? आणि इतरे-जनांना विरोध करायचं कारणच काय ?

**विक्रम** : ठीक आहे. हेही मला या पूर्वीच उमजायला हवं होतं. तर मित्रा, तू या दुर्दैवी, करंट्या माणसावर एक छोटासा उपकार करशील ?

**बलराज** : (व्याकुळतेनं) अशा शब्दांत तू मला का विचारतोस विक्रम ?

**विक्रम** : कोण जाणे. (कालपरवापर्यंत जो कोणी एक मायाममतेच्या सप्तरंगी स्वर्गात विहार करीत होता, त्याचा कडेलोट होऊन तो एका घाणेरड्या दलदलीत कोसळलाय.

आपण कुठं आहोत, कोण आहोत, त्याचा तो शोध घेतोय. सगळ्या नात्यागोत्याचा चिखलच अंगाला बरबटलाय. या चिखलातून, माती कोणती आणि अंग कोणतं, ते तो चाचपून बघतोय.) तर बलराज, तू माझं एक काम कर. मेजवानीच्या ठिकाणी जा आणि ललितागौरीला सांग—

**बलराज** : ललितागौरी?

**विक्रम** : होय ललितागौरी. तुला कदाचित ठाऊक नसेल—माझ्या कैलासवासी पपांच्या माजी बायकोचं नाव आहे—नव्हे, होतं ते.

**बलराज** : म्हणजे आईसाहेब.

**विक्रम** : आता आई संपली. समजलं ना बलराज? आई कापरासारखी भुरुभुरु जळून गेली. उरलीय फक्त काजळी. तिचं नाव ललितागौरी. तर जाऊन तिला वर्दी दे की, कैलासवासी शिवशंकर राजेंद्र यांचा पोरका पुत्र विक्रम, दूर देशाहून परतला आहे. आपला आनंदोत्सव संपला, म्हणजे सोयीसवडीनं त्याला येऊन भेटा. पण भेटीसाठी याल तेव्हा एकट्याच या. नव्या पतिराजांची ढाल घेऊन येऊ नका.

**बलराज** : राग आवर विक्रम, संतापाला विवेकाचा लगाम घाल. जरा विचार कर. तुझ्या भावना मला कळतात. पण त्यांचा असा वादळी उद्रेक बरा नव्हे. तुला कितीही राग आला असला तरी प्रियरंजनदासांनी तुझ्या मातेशी लग्न केलंय लग्न. दोघांच्या खुषीचा मामला आहे हा. त्यात कसलीही जुलूमजबरदस्ती तर नव्हती? तसाच विचार केला तर त्या दोघांना हवं ते करायला त्यांची ती स्वतंत्र नाहीत का?

**विक्रम** : होय होय मित्रा, तू मला सल्ला दिलास. हवं ते करायला ती दोघं स्वतंत्र आहेत. माझं आयुष्य चुरगाळून मला उकिरड्यात भिरकावून द्यायलाही ती दोघं स्वतंत्र आहेत. अखेर तोही मियाबीबींचा खुषीचा मामला आहे, नाही का? तेव्हा जा...असाच जा आणि त्यांच्यापुढं पायघड्या पसरून, त्यांना वाजतगाजत, मिरवीत घेऊन ये. तोवर गुलाबपुष्पांनी मी त्यांची एकशय्या पुरेपूर सजवून मातृऋणातून मुक्त होतो. मग तर झालं?

**बलराज** : (कष्टी होत) माझ्यावर रागावू नकोस रे विक्रम. मी चुकलो असेन तर मला क्षमा कर. पण मी काय म्हणतोय ते—

**विक्रम** : मला पुरतं समजलंय बलराज. (अरे वेड्या, माझा राग तुझ्यावर नाही; त्यांच्यावर नाही; माझ्याच प्राक्तनावर आहे.) माझ्याच वाट्याला हे असले भोग का यावेत? पपांच्या अपघाती मृत्यूचं दुःख कष्टानं गिळून, एका नव्या उमेदीनं त्यांची सगळी स्वप्नं साकार करण्याची जिद्द धरून मी विमानात पाऊल ठेवलं होतं. आणि घरात पाऊल ठेवताच माझ्यापुढं, हे काय अमंगळ, ओंगळ वाढून ठेवलंय? कोणत्या पापाचं प्रायश्चित्त भोगतोय मी हे?

**बलराज** : या प्रश्नाला उत्तर नाही विक्रम—दुनियेत उत्तर नाही.

विक्रम : देयर एण्डस् द होल मॅटर. तू जाऊन फक्त माझा निरोप सांग. मी सांगितला तसा—अगदी त्याच शब्दांत सांग. जा.

[बलराज निमूटपणे निघून जातो. तो गेलेल्या दिशेकडे पाहात विक्रम भारावलेल्या मनःस्थितीत स्वतःशीच बोलू लागतो—]

अवघ्या दहा महिन्यांपूर्वी—
पतीच्या प्रेतावर जी कोसळली होती
आसवांचा पाणलोट होऊन,
तिनं पतीला विसरून, पुत्राला झिडकारून
सरळ व्यभिचाराच्या पलंगाकडं धाव घ्यावी?
हे—हे कळेल तेव्हा या धरतीमातेलाही आपल्या मातृत्वाची शरम वाटेल.
कदाचित शरमेनं तोंड झाकून ती देखील उलट गतीनं फिरायला लागेल.
आणि मग अहोऽऽ—सगळी मजाच मजा होईल. (खदाखदा हसत)
म्हातारे तरुण होतील; तरुण कुमार होतील;
बोल बोल म्हणता कुमारांची बोबडी बालके होतील,
आणि ही बालके रांगता रांगता, पाळण्यात उडी मारून, हुंकार देत,
उलट गतीनं आईच्या उदरात विरघळून जातील.
पिढ्यांच्या पिढ्या सटासट अंतर्धान पावतील.
'इतिहास' म्हणून काही बाकीच उरणार नाही.
माणसे संपतील, माकडे संपतील, पशुपक्षी, जीवजंतूही आटोपतील.
उरेल ती केवळ निर्जीव निःस्तब्ध स्मशानशांतता.
जन्म घेण्यासाठी तरी आई नावाची एक मादी लागतेच लागते;
पण मरणाला मुळी आईच नाही.
मरणाला लागते सरणाचे सिंहासन आणि स्मशानाचे राज्य.
(थबकून) पण यांतलं काहीएक घडणार नाही.
सरितेप्रमाणंच धरतीलाही माघारी वळता येणार नाही.
घडायचं ते घडून गेलंय
काळजाचा चुराडा झाला तरी ओठ मिटून मी ते पत्करायचं आहे.
वयोवृद्धांच्या शृंगारक्रीडेत
एक स्वप्न चिरडले तर चिरडू देत.
एक सत्त्व करपले तर करपू देत.
तेवढ्यानं विश्वात प्रळय तर होणार नाही!

[विक्रम शून्यमनस्क होतो. त्याच वेळी बाहेरून एक तरुण, देखणी, अल्लड, स्वप्नाळू डोळ्यांची तरुणी लगबगीनं येते आणि दारातच थबकून विक्रमला पाहाताच उचंबळून

"विक्रम, मी आले रेऽ" असं उद्गारत धावते. विक्रम भानावर येत वळून पाहात "कोण? जाई तू?" असे म्हणतो, तोवर ती त्याचे हात हाती घेत लडिवाळपणे त्याला डोळा भरून पाहात, गडबडीनं बोलू लागते.]

जाई : केव्हा आलास? आत्ताच बंगल्यावर येऊन पोचला असशील ना? मला आहे ठाऊक. अरे मी सारखा एयरपोर्टवर फोन करतेय. विमान उतरल्याचं कळल्याबरोबर मी इकडं यायला निघाले बघ. एऽऽऽ, तू असा सुकल्यासारखा का दिसतो आहेस? प्रवासात काही त्रास झाला? कीऽऽऽ—मी एयरपोर्टवर दिसले नाही म्हणून रागावलास? ए बाबा, रागवायचं असलं तर माझ्यावर रागावू नकोस. तुझ्या बाल-मित्रावर रागाव. चांगला खडसून रागाव. अरे मी बलराजला पुन्हा पुन्हा म्हणत होते की—

विक्रम : (शुष्कपणे) ते सगळं त्यानं मला सांगितलंय जाई.

जाई : बघा बाई! आणि तरीही माझ्यावर एवढा घुस्सा?

विक्रम : (तिच्या मुद्रेवर टक लावून पाहात) घुस्साऽ? छे छे छे, घुस्सा वगैरे काही नाही. सगळा आनंद आहे. म्हणजे...म्हणजे...सध्या सर्वत्र आनंदोत्सव चाललाय ना? ते ठीकच आहे. पण बाईसाहेब, आपण मजेत आहात ना!

जाई : अग्गोबाईऽऽ! बाईसाहेब! (खुदकन् हसत) कधीपासून मी 'बाईसाहेब' झाले? आणिक 'मजेत आहात ना?' म्हणजे काऽय? बोला नाऽ? आज आल्या आल्या चेष्टा करून मला चिडवायचा बेत दिसतोय? होय ना? (हसते.) अय्याऽऽ विसरलेच की मी. (पर्स उघडत) पाहा तरी तुझ्यासाठी मी काय आणलंय ते. ओळख पाहू! ओळख ना! (पुडा काढून उलगडत) वास नाही आला? पहा तरी कसा पिवळाधमक आहे माझा चाफा. (वास घेत) काय धुंद आहे यांचा गंध, नाही? (ओंजळ पुढं करीत) घेऽ! घे ना? अहो राजे, असे टक लावून बघताय काय माझ्याकडं?

[त्याची शुष्क मुद्रा आणि एकटक रोखून पाहाणं बघून ती थिजते, गांगरते. आणि ओंजळ मागं घेत—चाचरत]

माझा राग आला? मी चुकले. या सहा महिन्यांत मी तुझ्या पत्रांना एक सुद्धा उत्तर घातलं नाही हे माझं चुकलं पण जरा मला समजून घे रे. दादा, बाबा आणि आई तिघांनी तुला पत्र पाठवायचं नाही म्हणून मला ताकीद दिली होती. तुझा विचार सुद्धा डोक्यातून काढून टाक म्हणून सारखे बजावत असतात मला. म...मी तुझ्याच येण्याची वाट बघत होते रे. गळ्याशपथ सांगते. आता इथलं सगळंच बदललंय. पण मी मात्र बदलले नाही हं.

विक्रम : तू मोठी प्रमाणिक मुलगी आहेस, नाही?

जाई : खरंच मी प्रामाणिक आहे. ते कितीही म्हणाले तरी—

विक्रम : आणिक तू सुंदरही आहेस, नाही का?

जाई : (दचकून, गांगरून) तुला काय म्हणायचंय विक्रम?

विक्रम : मला इतकंच म्हणायचंय की, सुंदर माणसं फार काळ प्रामाणिक राहू शकत नाहीत. कारण सौंदर्याच्या अंगी अशी काही विषारी शक्ती आहे की इमानदारीला ते बोल बोल म्हणता छिनाल करून सोडतं. मी त्याचा पुरेपूर अनुभव घेतलाय. तेव्हा तुझे दादा, बाबा आणि आई यांनी तुला दिलेला सल्लाच योग्य आहे. माझा विचार-सुद्धा तू डोक्यातून काढून टाक.

जाई : (गलबलून) नाही नाही विक्रम—

विक्रम : 'माझं तुझ्यावर प्रेम आहे' असं कधी काळी मी तुला म्हणालो होतो, नाही का?

जाई : म्हणजे काय?

विक्रम : म्हणजे इतकंच की, माझ्यावर तरी तू विश्वास ठेवायला नको होतास. कारण विश्वासघातकीपणाचा दुर्गुण माझ्या आईकडूनच माझ्या रक्तात आला असला पाहिजे; आणि असल्या रक्तात इमानासारख्या सद्‌गुणांचं कलम कधी रुजवता येत नाही.

जाई : विक्रम...विक्रम...

विक्रम : तेव्हा व्यवहारदृष्टीनं तू वेळीच माझा नाद सोडून दिलेला बरा. या राजेंद्रनगरात, लग्नाच्या बाजारात, तुझ्यासारख्या उपवर श्रीमंत सुंदर मुलीला, एखादा गलेलठ्ठ बकरा अजूनही गटवता येईल. कदाचित तुझे आईवडील त्याच खटपटीत असतील. पण—

जाई : तुला आज झालंय तरी काय विक्रम? माझी तू ही आणि एवढीच किंमत केली आहेस? तुला काय मी—

विक्रम : चूकभूल द्यावी-घ्यावी. प्रश्न माझ्या लेखी तुझी मूळ किंमत काय आहे, हा उरला नसून, लग्नाच्या बाजारात तुला आज काय भाव येईल, एवढाच बाकी राहिला आहे. तुझ्या आईबापांच्यापेक्षा तू अधिक शहाणी, म्हणजेच हुशार, म्हणजेच वस्ताद, म्हणजेच व्यवहारी ऊर्फ लबाड लुच्ची असलीस तर ठीकच आहे. पण तरी-देखील माझा सल्ला ऐक. लग्न करू नकोस. त्यापेक्षा एक ध्येयवादी, समर्पित, समाज-सेविका हो. समाजसेविका म्हणजे, परिचारिका, शिक्षिका, आश्रमवासी सेविका, ग्रामोद्धारक, अनाथमहिलाश्रम वा बालकाश्रमचालिका वगैरे वगैरे वगैरे. दाखवायपुरतं ब्रह्मचर्य पाळ, पण बौद्धिक भुकेसाठी मित्र बाळगायला हरकत नाही. काऽय? भूक भागव, पण लग्न करू नकोस. अग अखेर लग्न म्हणजे तरी काय? 'आईपण' मिळवण्याची आणि मिरवण्याची राजरोस सोय. आणि 'आईपण' म्हणजे उद्याच्या चांडाळांना आज जन्माला घालणं, बास्, दुसरं काही नाही. मला विचारशील तर दुनियेत आज आहेत तेवढे चांडाळ रगड झाले. नव्या चांडाळांची पैदास करण्या-पेक्षा, बये, तू अक्कलहुशारीनं वेळीच एका वन्यापैकी समाजसेवेला वाहून घे.

जाई : (व्यथित होत) विक्रम...विक्रम...काय तुझी अवस्था झालीय रे ही? अरे या धक्क्यानं तुला वेडबीड तर—

विक्रम : हां, तरी पण देखील तू एक स्त्री आहेस. तारुण्यानं पुरेपूर पिकलेली आहेस. त्यामुळंच तुला कोणा पुरुषाशी लग्न केल्यावाचून गत्यंतरच नाही. तुझं रक्तच मुळी तुला चैन पडू देणार नाही. अग माझ्या आईनं नाही का, एक नवरा मेल्या मेल्या दुसरा घरोबा केला ? तसं युद्धात आणि लग्नात सगळं काही मंजूर आहे. तात्पर्य, तुला लग्न करण्याची उबळ आलीच, तर एखाद्या मठ्ठ मूर्खाशी किंवा अर्धवट खुळ्याशी लग्न लाव; पण तरीदेखील कोणा निष्पाप बालकाला जन्म देऊ नकोस. काऽय ? त्या सगळ्याची आता राजरोस अद्ययावत सोय झालीय. त्यामुळं होईल काय, की छिनालपणा करायला तुझी तू मोकळी राहाशील; तुझ्या शय्यासोबत्यालाही सुरक्षित वाटेल आणि मुख्य म्हणजे कुणा सत्शील कर्तबगार पुत्राला तुझ्यासाठी शरमेनं मान खाली घालावी लागणार नाही.

जाई : (रडत) विक्रम...विक्रम, हे हे तू काय बोलतो आहेस ?

विक्रम : हे मी बोलत नाहीये, बये, जबरदस्तीनं माझ्या तोंडात कोंबलेलं शेण मी थुंकून टाकतोय. [ती आवेगानं त्याला बिलगू पाहाते तशी —] दूर होऽ! मला स्पर्श करू नकोस. शेणानं अंग बरबटेल तुझं. [जाऊ लागतो तशी—]

जाई : (आवेगानं हात धरू पाहात) कुठं—कुठं निघालास विक्रम ?

विक्रम : (आत जाताना थबकतो, वळतो आणि उपरोधानं) कुठं ? आंघोळ करायला. पाण्यानं नव्हेऽऽ, अत्तरानं. दुनियेतली उत्तमोत्तम उंची अत्तरं तरी माझ्या अंगाची दुर्गंधी नाहीशी करू शकतात का, ते पाहायचंय मला.

[भेदक हसत विक्रम आत जातो. जाई मटकन् बसून उसमून रडू लागते. त्याच वेळी बाहेरून प्रियरंजनदास, ललितागौरी, दयाळ आणि सर्वांत शेवटी बलराज येतात. ललितागौरी धावत जाऊन कळवळून जाईला जवळ घेत प्रेमभरानं —]

ललितागौरी : रडू नकोस ग जाई. रागाच्या भरात दुःखानं विक्रम काहीही बोलून गेला असला तरी अंतःकरणाचा तो एवढा निष्ठुर नाहीये.

दयाळ : (धुमसत्या रागानं) तुझ्यापुढं अगदी हद्द झाली जाई. तरी साहेब, मी सकाळपासून तिला तीनतीनदा बजावलं होतं की विक्रमसाहेब आज येणार असले तरी तू त्यांना भेटायचं नाहीस. बजावलं होतं की नाही तुला जाई ?

जाई : (थरथरत वर पाहात) हो...होय. बजावलं होतंत बाबा...म्हणून म...म...मी एयरपोर्टवर गेले नाही.

दयाळ : पण इथं तरी का तडफडलीस ?

जाई : म...म...मी नुसती बघायला आले त्याला. चुकलं माझं. रागावू नका हो बाबा...माझं किनई खरंच चुकलं असेल...

ललितागौरी : काहीही चुकलं नाही जाई तुझं. दयाळसाहेब, मला तुमचं नवल वाटतं, तुम्ही एवढे शहाणेसुरते, जाईचे बाप आहात. लग्न ठरलेल्या पोटच्या पोरीचं मन

तुम्हाला कळत नाही ?

**दयाळ** : (अजीजीनं) तसं नाही बाईसाहेब—

**ललितागौरी** : ही सोयरीक तुम्हाला मोडायची तर दुर्बुद्धी झालेली नाही ?

**दयाळ** : छे छे, भलतंच काय बाईसाहेब ? म...म...मी...मी...म्हणजे...

**ललितागौरी** : इतक्या दिवसांनी विक्रम परतला तर त्याला भेटल्याशिवाय तिचा जीव कसा स्वस्थ राहील ?

**दयाळ** : न...नाही नाही...ते खरं आहे...ते खरं आहे बाईसाहेब...प...पण म्हणजे...म्हणजे...

**प्रियरंजन** : ललिता, मीच दयाळसाहेबांना सुचवलं होतं की आणखी काही दिवस तरी जाईनं विक्रमला भेटता कामा नये.

**ललितागौरी** : (थक्क होत) तुम्हीऽऽ ? प्रियरंजन, तुम्ही सुचवलं होतंत तसं ?

**प्रियरंजन** : होय ललिता. दयाळसाहेबांना मीच तशा सूचना दिल्या होत्या. तो काय काय तिला बोलला हे आपण सर्वांनी आत्ताच ऐकलंय. अगदी शब्दन् शब्द ऐकलंय— होय ना बलराज ? [बलराज खाली मान घालून उभा आहे. तो माननेच 'होय' म्हणतो तशी—] त्याचं सगळं बोलणं, दटावणं हे खचित शहाणपणाचं नव्हतं.

**ललितागौरी** : तरी देखील प्रियरंजन, तो काही ठार वेडा झालेला नाही.

**प्रियरंजन** : (थंडपणे) नसावा. आय होप सो. पण मला तशी खात्री नाही.

**ललितागौरी** : (आवेशानं) मी सांगते. त्याला फक्त प्रचंड धक्का बसलाय. तीव्र दुःख झालंय. फार फार राग आलाय. आणि हे—हे सगळं होणार याची मला पूर्ण खात्री होती. प्रियरंजन, तुम्हाला देखील मी पूर्वीच कल्पना दिली होती. तुम्हाला मी त्या वेळी परोपरीनं विनवीत होते, पण तुम्ही माझं ऐकलं नाहीत. पाहा बरं आता केवढा अनर्थ समोर उभा राहिलाय. मला वाटतं—

**प्रियरंजन** : ललिता, मघाशी त्याचा तोल गेला होता; आता तुझा तोल जायला लागलाय. (तिला जवळ घेत) अग तुझ्या भावना मला कळत नाहीत असं का तुला वाटतं ? माझ्या डोळ्यात पाहा आणि सांग—पाहा, माझ्या डोळ्यात पाहा— [त्यांच्या नजरेत नजर मिसळताच ती भारावली जाते. मग...]

विक्रम तुझा आहे, पण तू माझी...माझीच आहेस, होय ना ? मग विक्रम मला आपल्या मुलासारखाच नाही का ? अग वेडे, हे—हे सगळं ऐश्वर्य अखेर कोणाचं आहे ? आपल्या विक्रमचंच ना ? झालं तर ! धरून चालू या, त्याला प्रचंड धक्का बसलाय. तो बसणारच होता. त्याची मनःस्थिती थोडीशी बिघडलीय. शक्य आहे. तरी पण आपण उभयतांनी धीर सोडायचा की अवसान राखून त्याला धीर द्यायचा ? डोन्ट यू वरी. ही विल बी ऑल राइट.

**ललितागौरी** : (सोडवून घेत) मला आधी जाऊन त्याला भेटलं पाहिजे. मला त्याच्याशी

बोललं पाहिजे.

**प्रियरंजन** : तसं का म्हणतेस? आपण दोघंही जाऊन त्याला भेटू या आणि त्याच्याशी बोलू या. काय बलराज?

**बलराज** : मला वाटतं, या क्षणी तरी आपण कोणीच त्याला भेटू नये.

**प्रियरंजन** : का?

**बलराज** : विक्रम तुमची भेट एक तर घेणार नाही. घेतलीच तर—(थबकतो.)

**ललितागौरी** : (व्याकळून) असं कसं म्हणतोस तू बलराज?

**बलराज** : आईसाहेब, विक्रमनं आपल्याला एक निरोप द्यायला मला सांगितला होता; पण माझंच धाडस होईना म्हणून मीऽऽऽ—(थबकतो.)

**प्रियरंजन** : काय निरोप होता?

[बलराज गप्प राहातो तशी—]

**ललितागौरी** : सांग ना! तूच गप्प राहिलास तर आम्ही काय समजायचं?

**बलराज** : त्याच्याच शब्दांत सांगू? त्यानं तशी मला आज्ञा केली होती; पण त्याचा निरोप ऐकून आईसाहेब, तुम्हाला फार फार दुःख होईल.

**प्रियरंजन** : तर मग मला वाटतं—

**ललितागौरी** : नाही. मला दुःख झालं तरी चालेल; पण त्याचं मन मला कळायलाच हवं.

**बलराज** : सांगतो. (मन घट्ट करीत) 'कैलासवासी शिवशंकर राजेंद्र यांचा पोरका पुत्र विक्रम दूर देशाहून परतला आहे. आपला आनंदोत्सव संपला म्हणजे सोयीसवडीनं त्याला येऊन भेटा. पण भेटीसाठी याल तेव्हा एकट्याच या. नव्या पतिराजांची ढाल घेऊन येऊ नका.'

**ललितागौरी** : (घात्र बसत) देवा...देवा...(तोंड झाकून हुंदका देते.)

[क्षणभर बोचक शांतता. प्रियरंजनदासांची मुद्रा शांत, निर्विकार...मग]

**प्रियरंजन** : ठीक आहे बलराज. तू म्हणालास ते बरोबरच होतं.

**ललितागौरी** : (डोळे पुसत उठत) नाही. मी एकटीच जाऊन भेटते त्याला. मला जाऊ दे प्रियरंजन.

**प्रियरंजन** : छे छे, आज, या क्षणी तरी आपण त्याला कोणीच भेटायचं नाही. तापलेली काच आपोआपच निवायला हवी.

**ललितागौरी** : अहो तो निवायचा नाही...तडकून जाईल. माझं ऐका...मला जाऊ द्या.

**प्रियरंजन** : ललिता, या क्षणी मला कोणताही धोका पत्करायचा नाहीये. मी सांगतो तसंच झालं पाहिजे! आपल्या महालात जाऊन तू आता स्वस्थ आराम कर. जाई, तू हिला घेऊन जा. बलराज, तूही जा आणि आपल्या मित्राला शांत करण्याचा प्रयत्न कर. हिरवळीवर मेजवानीसाठी जमलेल्या पाहुण्यांना निरोप देऊन आम्ही येतोच आहोत. जा ललिता—प्लीऽऽज...या वेळी तरी माझं ऐक. अगं तुझं सुख तेच

माझं सुख आहे, होय ना? यातून आपण फार चातुर्यानं मार्ग काढला पाहिजे. जा—

[जाई आणि बलराज ललितागौरीला घेऊन जातात. ती गेल्यावर—]

दयाळसाहेब, विक्रमचं बोलणं ऐकून तुम्हाला काय वाटलं?

दयाळ : खरं तेच सांगतो साहेब. हे काही शहाण्या माणसाचं बोलणं नव्हतं. मला तर ते चक्क वेड लागलेल्या माणसाचं बरळणं वाटलं.

प्रियरंजन : गफलत करू नका दयाळजी. त्याच्या बोलण्यात बरळण्याचा भास असला तरीही त्याला एक सूत्र होतं, एक संदर्भ होता. त्याच्या शब्दांची फेक फसवी असली तरी प्रत्येक उद्‌गारामागे जलाल दंश होता—आणि तो जाईसाठी नव्हता! माझा तर असा अंदाज आहे की आपण सगळे बाहेर आडोशाला उभे राहून ऐकतो आहोत हे जाणूनच, तो तिचं निमित्त करून, शब्द आम्हाला भोसकत होता. ठीक आहे. त्याचीही अटकळ आम्हाला होतीच. त्याच्यावर कडक लक्ष ठेवायला हवं. त्यासाठी जरूर तर जाईला मोकळीक द्या. वाटेल तेव्हा तिला त्याला भेटू द्या. पण त्याचा प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती तात्काळ मला कळायलाच हवी. वेड पांघरून, तो पेडगावला जायला निघाला असला, तरी आपण शहाण्यांनी तरी गाफील राहून चालणार नाही.

दयाळ : होय साहेब, त्याबद्दल आपण निश्चिंत राहावं. पण मला वाटतं, ते काही सोंग नसावं. कदाचित धक्का बसून—

प्रियरंजन : असेलही. पण आता एक गोष्ट तर निश्चितच : या राजेंद्रनगरात एक मी तरी नांदू शकतो, नाहीतर— (थबकतो.)

दयाळ : छे छे साहेब, आपण तर राहायलाच हवं. सगळे कामगार, त्यांचे पुढारी, अधिकारी आणि बोर्डावरले डिरेक्टर्स यांनी आपल्याला एकमुखी पाठिंबा दिलाय, नव्हे का?

प्रियरंजन : आता चित्र बदलतंय दयाळसाहेब, ते सगळं ठरायचंय. या ललितमहालात तो मूग गिळून फार काळ स्वस्थ राहील या भ्रमात तुम्ही तरी राहू नका. तरी पण—

[तेवढ्यात "दयाळजी...दयाळजी..." अशी हाक देत बलराज येतो.]

बलराज : विक्रम मागल्या दारानं निघून गेला.

प्रियरंजन : (विस्मयानं) निघून गेला? कुठं गेला? कधी गेला!

दयाळ : त्यांच्या महालात पाहिलंत? कुठं दुसऱ्या दालनात तर—

बलराज : नाही. तो गेला हे नक्कीच. त्याच्या बेडरूममधून खिडकीतून मी पाहिलं, तेव्हा रस्त्याच्या कोपऱ्यावर पाठमोरी आकृती दिसली मला त्याची. बघतो...बहुधा सापडेलच मला तो...(लगबगीनं जातो.)

प्रियरंजन : पाहिलंत दयाळ, माझे शब्द किती अचूक होते ते! तावडतोब तुम्ही याचा शोध घ्या. मागावर माणसं सोडा त्याच्या.

दयाळ : होय साहेब. मी स्वतःच निघतो.

प्रियरंजन : आणि इतक्यात तिला काही कळवू नका.

दयाळ : जाईला ?

प्रियरंजन : नव्हेऽऽ, ललितेला. उद्यानात पाहुणे वाट पाहात असतील. तिकडं निरोप द्यायला तरी मला गेलंच पाहिजे.

[दोघेही जाऊ लागतात, तोच अंधार.]

## प्रवेश दुसरा

[स्थळ : तोच दर्शनी हॉल. सुमारे पंधरा दिवसांनंतरची एक सायंकाळ. रंगमंच प्रकाशानं उजळतो तेव्हा ललितागौरी हताशपणे एका आसनावर बसली आहे. जाई प्रक्षुब्ध मुद्रेने एक पत्र हातात घेऊन वाचता वाचता थबकली आहे.]

ललिता : (अस्वस्थतेनं) वाच ना ग बाई. थांबलीस का तू ?

जाई : थांबले एवढ्यासाठीच आई, की पुढं विक्रमनं झोपडपट्टीचं, तिथल्या रोजच्या जीवनाचं, फारच ओंगळ घाणेरडं वर्णन केलंय. ते वाचून मला तर शिसारीच आली !

ललिता : झोपडपट्टीतल्या अमंगळ जिण्याबद्दल विक्रमचे वडील खूप खूप सांगत असत मला. ते वर्णन सोडून दे. त्यानंतर तो काय लिहितोय ते वाच. (थबकून) वाच ना.

जाई : लग्नानंतरच्या पहिल्या रात्री—(थबकते. निस्तेज होते.)

ललिता : अग वाच, काही हरकत नाही. आपण दोघीच आहोत इथं. (थबकून) फार शृंगारिक काही लिहिलंय का त्यानं ?

जाई : शृंगारिक ? (वाचते) 'हा सोहळा तुला कसा काय आवडेल ? चौपाईवर विवाहित वधूवर, चौपाईखाली म्हातारे आईबाप, फाटक्या लुगड्याचा मधे पडदा, पलीकडे दाटीवाटीने झोपलेली सहासात माणसं, भिंत नावाच्या पत्र्यापलीकडे दारूच्या गुत्त्यतली दंगल...'

ललिता : शीऽऽ...असल्या ठिकाणी जाऊन राहिला होता हा ? ही काय अवदसा आठवली त्याला ?

जाई : तेही लिहिलंय त्यानं. 'महालातल्या ऐषआरामाचं अजीर्ण झालेल्यानं दोन दिवस तरी झोपडीतल्या विश्वाचा पाहुणचार घ्यायलाच हवा. मरता येत नाही म्हणून माणूस नरकातही जगायला कसा सरावतो त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलाय मी. एकोणतीस वर्षांच्या जगण्यानं जे शहाणपण मला शिकवलं नाही ते या पंधरा दिवसांत मी शिकलो, पपांनी इतकी वर्षं मला जर्मनीत ठेवलं, त्यापेक्षा—'

ललिता : —या झोपडपट्टीत त्याला ठेवायला हवा होता, असं म्हणतोय की काय हा? तर मग नक्कीच त्याला खूळ लागलंय. हे पत्र केव्हा मिळालं तुला?

जाई : काल संध्याकाळी. पत्राच्या पेटीत कोणीतरी आणून टाकलं होतं म्हणे. पाकिटावर (पाकीट काढून वाचत) पत्ता एवढाच : 'जाई नावाच्या एका कुंडीतल्या फुलास'. आणि पत्राखाली सही : 'आपला निर्माल्य'.

ललिता : दयाळजींना दाखवलंस तू हे पत्र?

जाई : त्यांनीच तर ते आणून दिलं मला.

ललिता : मग त्यांनी तरी झोपडपट्टीत जाऊन शोध—

जाई : घेतला. त्यांच्या हाती पत्र दोन दिवस तरी आधी आलं असावं. सगळी झोपडपट्टी पालथी घातल्यावर बाबांनी हे पत्र मला दिलं.

ललिता : काही पत्ता लागला का त्याचा?

जाई : झोपडी सापडली. पत्र आणून पेटीत टाकणाराही भेटला. पण विक्रम चार दिवसां-पूर्वीच तेथूनही नाहीसा झालाय.

ललिता : त्यानंतर तो कोणालाही, कुठंही भेटला, दिसला नाही?

जाई : माझ्याशी कोणी स्पष्टपणे बोलत नाहीत आई, पण तो नक्कीच कुठं कुठं, कोणा-कोणाला दिसलाय. भेटलायसुद्धा.

ललिता : (सुस्कारून) हूंऽऽ! (थबकून) एवढ्या मोठ्या पत्रात माझ्याबद्दल एक शब्द-देखील लिहावासा वाटला नाही त्याला, नाही गं? बाकी त्याचंही बरोबरच आहे. मी काय केलंय त्याच्यासाठी? (डोळ्याला पदर लावतात.)

जाई : (कळवळून) असं का म्हणता आई? तुम्ही तर त्याचं सर्वस्व होता. पपा असताना तो मला नेहमी म्हणायचा ("तुझी माती उत्तम आहे, पण तुझी मूर्ती माझ्या आईच्याच हातून घडली पाहिजे. माझ्या आईसारखीच माझी बायको घडली पाहिजे. तसूभरही उणेपणा मला चालायचा नाही.')

ललिता : (तोंड झाकीत, दबलेला हुंदका देत) देवा... देवा...

[तेवढ्यात बाहेरून प्रियरंजन, पाठोपाठ दयाळसाहेब लगबगीनं बोलत येतात. त्यांच्याच पुढेमागे एक्झिक्यूटिव्हज्‌पैकी जितमलशेट, खानझोडेसाहेब आणि ब्रिगेडियर कीर्तिकर येतात. सगळीच मंडळी प्रचंड प्रक्षुब्ध. त्यातल्या त्यात प्रियरंजनच शांत आणि सावरलेले. ही माणसे येताना गलबल्यातले बोलणे कानावर येते : "हे हे धिस इज टू मच"..."नाही नाही, त्याचा बंदोबस्त करायची वेळ आलीय"..."माझं स्वच्छ मत आहे की साहेबांनी आता कोणीतरी कडवा शरीररक्षक ठेवायची वेळ आलीय." ..."ब्रिगेडियरसाहेब होते म्हणून वेळ निभावून गेली"..."अहो आर्मीमधे असताना असल्या शेकडो केसीस मी हँडल केल्या आहेत."..."पण हाऊ कुड ही डेअर... एक्झिक्यूटिव्हज्‌च्या मीटिंगमध्ये हा आलाच कसा?"..."असं काय करता खानझोडे-

साहेब...त्याचं डोकं ठिकाणावर आहे का?"... "इनफ, इनफ...काही फार मोठा अनर्थ तर घडला नाही ना?" असा शेवटचा उद्गार टाकीत प्रियरंजन पाठमोरे आत येत सर्वांना निर्वाणीचा गप्प बसण्याचा दारातूनच इशारा देतात.

दरम्यान घाबरून जाई आणि ललितागौरी उभ्या राहातात. ललितागौरी लगबगीनं पुढं होत—"क...काय झालं? काय झालं प्रियरंजन?" असं विचारू लागते. तशी—]

**प्रियरंजन :** (रुमालानं घाम पुशीत) काही विशेष नाही ललिता.

**खानझोडे :** विशेष नाही कसं साहेब?

**प्रियरंजन :** (जरबेनं) खानझोडेसाहेब—

**जितमलशेट :** कुनाचे तरी पेटमंदी सुरा खुपसेल ते वक्ताला तरी—

**प्रियरंजन :** (जरबेनं) जितमलशेट!

**ललिता :** पण झालं तरी काय? [सगळे प्रियरंजनदासांच्या मुद्रेकडे पाहात गप्प राहातात, तशी—] दयाळजी, तुम्ही तरी सांगा!

**दयाळजी :** बाईसाहेब, तुमचं कुंकू बळकट म्हणून—

**प्रियरंजन :** (जरबेनं) दयाळजी—

**ललिता :** (अधिकारवाणीनं) प्रियरंजन, तुम्ही त्यांना दटावू नका. माझ्या शब्दाला जर या घरात काही किंमत राहिली असेल तर प्रकार काय घडला ते मला कळायलाच हवं!

**प्रियरंजन :** (थबकून, माघार घेत) ठीक आहे. सांगा. [तशी सगळे एकदम सरसरून पुढे [सरत गिल्ला करीत सांगू लागतात, तशी हात वर करून सर्वांना रोखत, जरबेच्या स्वरात— मी फक्त दयाळजींना आज्ञा दिलीय. ॲज अ मॅटर ऑफ फॅक्ट, तुम्हांला सगळ्यांनाच कळायला हवं की हा आमचा घरातला गुंता आहे. तसा तो नसता, तर आपली मीटिंग चालली असताना दुसरा कोणीही आत पाऊल सुद्धा टाकू शकला नसता. फक्त तो होता म्हणूनच त्याला कोणी रोखलं नाही. खरं आहे ना जितमलशेट?

**जितमल :** नाय, ते बराबर आहे साहेब, पन—

**प्रियरंजन :** आता तुम्ही सगळे एवढ्या लंब्याचौड्या गप्पा मारताहात, पण त्याच्या हातातला सुरा पाहून तुम्ही सगळे घाबरलात. त्याचं सगळं बोलणं, बरळगं तुम्ही निमूटपणे ऐकून घेतलंत. जीवाच्या भयानं दोघेतिघे तर टेबलाखाली दडाले. तुम्ही तर पळायचा सुद्धा प्रयत्न केलात खानझोडेसाहेब.

**कीर्तिकर :** तरी पण साहेब, त्याच्या हातातला सुरा मीच काढून घेतला.

**प्रियरंजन :** एक्सक्यूज मी, ब्रिगेडियर रिटायर्ड कीर्तिकरसाहेब. थोडी गफलत करताहात तुम्ही. त्याच्या हातातून सुरा तुम्ही काढून नाही घेतलात. सगळं बोलायचं ते बोलून टाकल्यावर त्यानं सुरा टेबलावर फेकून दिला आणि तो तुम्ही चपळाईनं उचललात.

**कीर्तिकर :** आफकोर्स—बट आफ्टर ऑल आय ॲम—

प्रियरंजन : —अ रिटायर्ड आर्मी ऑफिसर. दॅट्स् ऑल. तेव्हा तुम्ही कोणीही अलौकिक शौर्याबद्दल, पदकासाठी पात्र आहात, या भ्रमात राहू नका. आज तो मला नक्कीच ठार मारू शकत होता. पण त्याच्या अंगात तेवढ्या गटस्‌च नव्हत्या. कदाचित त्याचा हेतूही तसा नसावा. त्याला फक्त मनातलं गरळ ओकायचं होतं. म्हणून बडबड करून तो चालता झाला. आमच्या घरातला हा गुंता सोडवायला मी समर्थ आहे. तुम्ही मला येथवर सोडायला आलात, थँक्स अ लॉट. दयाळजी थांबतील इथं. तुम्ही या आता.

[जितमलशेठ, ब्रिगेडियर कीर्तिकर आणि खानझोडे जातात. मग] दयाळजी—

दयाळ : मी सगळं सांगतो बाईसाहेबांना.

प्रियरंजन : मी स्नान करून तयार होऊन येतोय. साडेसातची दिल्लीची फ्लाइट मला गाठायलाच हवी. उद्या सकाळी नऊ वाजता उद्योगमंत्र्यांशी माझी अपॉइंटमेंट—

दयाळ : ते सगळं ओके झालंय साहेब.

प्रियरंजन : दॅट्स गुड. (एकदम वळून ललितागौरीचे खांदे धरून तिला प्रेमानं न्याहाळत) ललिता, तू मुळींच काळजी करू नकोस. मी उद्या रात्री परत येतोय.

ललिता : काळजी करू नको असं म्हणता तुम्ही ! तुमच्याबरोबरच मी माझी नाव देखील समुद्रात लोटली आहे, नाही का ?

प्रियरंजन : ती बुडणार नाही, मी बुडू देणार नाही, यावर विश्वास ठेव.

ललिता : हा मुलगा मला काय काय बघायला लावणार आहे—

प्रियरंजन : डोंट यू वरी. माझा अंदाज जर चुकत नसेल तर तो आज ना उद्या तुला येऊन भेटल्यावाचून राहाणार नाही. त्याशिवाय त्याला आता गत्यंतरच नाही. सगळ्या बाजूनं तो पराभूत झालाय. कालच्या कामगारांच्या सभेत तर त्याला मारहाणही झालेली दिसतेय.

ललिता : अगबाई...फार लागलंय का त्याला ?

दयाळ : आज भर मीटिंगमधे घुसून त्यांनी जी बडबड केली त्यावरून तरी—

प्रियरंजन : महत्त्वाचा मुद्दा तो नाहीये. तो जर तुला भेटलाच तर त्याच्याशी गोडीनं वाग. त्याचं डोकं फिरलंय यावर अजून माझा विश्वास बसत नाही. त्याला तू घरात थांबवून घे. त्याचा गैरसमज दूर करण्यासाठी आता त्याला काही कटू सत्यं मला सुनावली पाहिजेत. पण जे काय बोलायचं ते मी बोलेन. त्यानंतरही तो पिसाटपणा करणार असला तर मात्र आपल्याला वेगळा विचार करावा लागेल. पण त्याला एक संधी तरी मिळालीच पाहिजे. (वळून) जॉर्ज, माझं पाणी काढ. [हाकारत लगबगीनं आत जाऊ लागतात तोच दाराशी येऊन उभा राहिलेला विक्रम पुढं येत म्हणतो —"संधीची मला गरज नाहीये. पण मिस्टर स्टेपफादर, पण तुमची कटू सत्यं ऐकायला मी उत्सुक आहे. अर्थात् सत्याची आणि तुमची एव्हापावेतो काडीमोड झाली नसेल तर !"

शर्ट मळलेला, फाटलेला, पँटही चुरगळलेली, अस्तन्या अर्धवट वर केलेल्या, शर्टाच्या गुंड्या, निम्म्याअधिक तुटलेल्या, शर्ट पँटमधे खोचलेला, दाढीमिशा वाढलेल्या, केस अस्ताव्यस्त डोक्याला दोन ठिकाणी मलमपट्टी—असा विक्रमाचा अवतार. त्याला पाहताच ललिता "विक्रम—" अशी कळवळून हाक मारीत जवळ धावते, तशी तो—"दूर बाईसाहेब, आपली मुलाखत घ्यायला अजून मला अवधी आहे. प्रथम मिस्टर ललितागौरी काय म्हणताहेत ते मला ऐकायचंय." आणि जाईकडं पाहात—"अरे ही माझी कुंडीतली जाई एकदम सुकल्यासारखी?...आय सी...पत्रवाचनाचा कार्यक्रम चालला होता तर? घरी जा फुला, तुला तुझ्या आईच्या मायेची गरज आहे...इथली हवा फार गरम होणार आहे. गेट गोइंग..." जाई थरथरत निघून जाते. ललितागौरी निस्तेज होत मागे सरते. हताशपणे बसून राहते. तेवढ्यात—]

**प्रियरंजन** : ये. आलास, फार आनंद झाला.

**विक्रम** : (खिशातून काकडी काढून खात आत येत) आलो तर आहेच. आता कडू असलं तरी गोड मानून घेणं भाग आहे. (थुंकत) हत् साला. ही काकडी देखील पहिल्या घासाला कडू निघाली. (फेकून देतो) जाव. असली (खिशातून दुसरी काकडी काढीत) कडू माणसं अशीच भिरकावून देण्याची काही सोय आहे का हो दयाळसाहेब?

**दयाळ** : (दचकून) अं...अं? क...काय म्हणालात साहेब?

**विक्रम** : साहेब ते. मी नुसताच, सिंपल, विक्रम, पोरका! आपण बेट लावू या का? ही काकडी कडू निघणार का गोड? बोला दयाळजी. मी (खिशातून रुपया काढून उडवून झेलत) लावतो रुपया. तुम्ही लावा तुमची मुलगी. काऽय? बोला कडू की गोड? हांऽऽ पण खाणार मी आणि कडू की गोड ते सांगणारही मीच. हरलात तर जाई माझी, जिंकलात तर रुपया तुमचा. ॲग्रीड? बोला—कडू की गोड?

**दयाळ** : (गांगरून पाहात) साहेब, आपण चेष्टा करताहात माझी गरिबाची.

**विक्रम** : (खदखदून हसत) हांऽऽ दॅटस् इट! म्हणजे 'गरीब असूनही', पोटची पोर कोणत्याही जुगारात पणाला लावू नये, इतपत तरी तुम्ही 'निष्ठावान' आहात तर? नॉट बॅड! नॉट बॅड! बाकीच्या निष्ठांबद्दल आपण सवडीनं चर्चा करू. (काकडी खात) थोडीशी कडू आहे...पण कडवटपणातही चविष्ट आणि लज्जतदार आहे. एखाद्या जारिणीसारखी. तुमचा अनुभव काय आहे दयाळसाहेब? छोडो यार...तुम्ही नुसते बघे. एनीवे, तुम्ही थांबलात का साहेब? माझं तोंड पुरेसं कडू झालंय. आता ऐकवा तुमची कटू सत्यं. हूंऽऽ फायर!

**प्रियरंजन** : दयाळजी, संध्याकाळची माझी फ्लाइट कॅन्सल करा. मी पहाटेच्या कॅरॅव्हेलनं निघेन.

**दयाळ** : (तत्परतेनं) मी स्वतःच जाऊन ती व्यवस्था करतो साहेब.

**प्रियरंजन** : नको. तुम्ही इथंच थांबा. [विक्रम : (खाता खाता डोळे मिचकावीत) फॉर

सेक्युरिटी मेझर्स.] ऑफिस स्टाफपैकी कोणाला तरी फोन करून पाठवा.

**विक्रम** : (फर्रकन् एक टीपॉय ओढून बसू लागत) आणि जाण्यापूर्वी माझी पुरेपूर झडती घ्या. (हसत) पुन्हा उगाच सुरीबिरी सापडायला नको!

**प्रियरंजन** : माझं रक्षण करायला मी पुरेपूर समर्थ आहे. पण तू बसतो आहेस ते टीपॉय फार नाजूक आहे विक्रम.

**विक्रम** : देवी ललितागौरींच्या इतकं?

**प्रियरंजन** : अरे ते मोडेल...मोडेल...

**विक्रम** : माझ्यासारखं? (हसत उठतो.) नको रे बाप्पा...माणूस मोडला तरी चालेल... पण किमती नग मोडायला नको. पण मग आता बसायचं कुठंऽ?

**प्रियरंजन** : इतकी आसनं पडली आहेत इथं—

**विक्रम** : पण माझी 'जागा' कुठं आहे तेच सापडत नाही अजून. (हसतो.) भले दयाळजी, तुम्ही निश्चिंतीनं फोन करायला जा. अगदी निरुपद्रवी झुरळासारखा या भिंतीशी उभा राहीन मी.

**प्रियरंजन** : दयाळजी, जा तुम्ही. [दयाळजी जातात.] विक्रम, मला थोडंसं फार गंभीरपणानं बोलायचंय. अर्थात तू ऐकण्याच्या आणि समजण्याच्या अवस्थेत असलास तर.

**विक्रम** : जरूर जरूर...तुम्ही समजता इतकी माझी अवस्था काही फार खराब झालेली नाहीये.

**प्रियरंजन** : तू शांतपणे ऐकणार आहेस का?

**विक्रम** : आफकोर्स. मात्र एक शर्त आहे. शांतपणे ऐकण्याची किंमत म्हणून तुम्ही तुमची खास इम्पोर्टेड सिगरेट देऊन माझं तोंड बंद करायला हवं.

[प्रियरंजन सोन्याची सिगरेट-केस काढून फाटकन् उघडून पुढं करतात, तशी पाहून]

नो थँक्स. तुम्ही तुमची स्टेट एक्स्प्रेस ओढा; मी आमची (खिशातून बंडल काढीत) विडी शिलगावतो. गेल्या आठपंधरा दिवसांत विडीचीच सवय झालीय मला. अखेर बिडी काय अन् बाई काय, सगळा सवयीचाच मामला आहे! (शिलगावीत) वुइथ युवर परमिशन् मदाम...(झुरका घेत) हां...रेडी...नाऊ ॲटॅक.

**प्रियरंजन** : दुपारी एक्झिक्यूटिव्हज्च्या मीटिंगमध्ये तू अकारण घुसून जो तमाशा केलास तो फार गैर होता.

**विक्रम** : प्रकार गैर होता हे मान्य. पण ऑब्जेक्शन 'तमाशा' या शब्दाला. 'तमाशा' ही एक राजमान्य आणि लोकमान्य लोककला आहे.

**ललिता** : (उठत) प्रियरंजन, त्याच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही. तुम्ही—

**विक्रम** : (खोचून) बाईसाहेब, तुम्हा उभयतांची झोपायची तर वेळ झाली नाही?

**प्रियरंजन** : ललिता, तू आपल्या मनाचा तोल जाऊ देऊ नकोस. तो कितीही तिढ्यानं बोलणार असला तरी मी त्याच्याशी आज अगदी सरळ सरळ बोलणार आहे.

**विक्रम :** मीही तितकाच सरळ बोलायला आलोय साहेब, आय रिअली मीन बिझिनेस. मी केला तो प्रकार गैर होता हे सिद्ध करायला कोणी न्यायाधीश नेमायला नको. पण सगळे डिरेक्टर्स आणि एक्झिक्यूटिव्हज् यांना मला जाब विचारायचा होता आणि त्यासाठीच तुमच्या बैठकीत घुसण्यावाचून मला दुसरा मार्ग उरला नव्हता. एरवी ही सगळी गिधाडं मला एकत्र कुठे भेटली असती ?

**प्रियरंजन :** एकत्र भेटून तरी काय फायदा झाला ? तुझ्या गलिच्छ आरोपांना एकानं तरी तोंड उघडून जाबजबाब दिला का ?

**विक्रम :** तोंड उघडायला आधी तोंड असावं लागतं. तुम्ही मुळी सगळ्या बैलांच्या नाकाला वेसण लावून त्यांचे होयबा करून ठेवलेले, ते काय मला जाबजबाब देणार ?

**प्रियरंजन :** हा वारसा पपांच्याकडून माझ्याकडं आलाय! पपा हयात होते त्या वेळी हेच सगळे होयबा अधिकारावर होते. मुद्दा एवढाच आहे की तुझ्या आरोपांना उत्तर द्यायचंच असेल तर तो अधिकार मॅनेजिंग डिरेक्टर म्हणून फक्त माझा आहे.

**विक्रम :** आणि सम्राट कधी अन्याय वा अपराध करूच शकत नाही; तेव्हा तुमच्याकडून जाबजबाबाची मी अपेक्षा करणंच मूर्खपणाचं आहे !

**प्रियरंजन :** आणि तरीही मी तुला उत्तर देणार आहे.

**विक्रम :** म्हणजे पपा अपघातातच ठार झाले, तो खून मुळीच नव्हता, असं तुम्ही ठासून सांगणार आहात!

**प्रियरंजन :** नाही. तो अपघात होता असं पोलिसांच्या चौकशीत सिद्ध झालंय. पण तो खून असण्याची एकदोन टक्के तरी शक्यता मी नाकारू शकत नाही. फक्त पपांच्या मृत्यूचा जो संबंध दुरन्वयानं तू माझ्याशी लावण्याचा प्रयत्न करतो आहेस, तो साफ चुकीचा आहे एवढंच मी ठामपणानं तुला सांगणार आहे.

**विक्रम :** एरवी पपांच्या मरणात दुसऱ्या कोणाचे हितसंबंध गुंतले होते ?

**प्रियरंजन :** इतर कोणाच्या हितसंबंधांबद्दल आपण नंतर बोलू; पण माझे तर कोणतेच हितसंबंध गुंतले नव्हते. सत्तेबद्दल म्हणशील तर पपा हयात होते तेव्हाही सगळे निर्णय मीच घेत होतो. त्या वेळपेक्षा आज माझ्या वैभवातही तसूभर वाढ झालेली नाही. उलट नको होती ती जबाबदारी मात्र माझ्या शिरावर पडलेली आहे. पपांच्या मरणानंतर मॅनेजिंग डिरेक्टरची जागा मला देण्यात येईल हे कोणाच्याही स्वप्नात सुद्धा नव्हतं.

**विक्रम :** आणि तरीसुद्धा ते खरं घडलं, हा चमत्कार होता का ?

**प्रियरंजन :** कंपनी कायद्याप्रमाणं कारखान्याच्या सर्व शेअरहोल्डर्सनी माझ्यावर विश्वास टाकून माझी एकमतानं निवड केली, हा कदाचित चमत्कार असेल.

**विक्रम :** पण या चमत्कारासाठी तुम्हाला नमस्कारही घालावा लागलाय. कारखान्याला

होणाऱ्या नफ्यात कामगारांना सहभागी करण्याची पपांची योजना आपण सोडून देऊ, असं तुम्ही लिहून दिलंत तेव्हाच—

**प्रियरंजन** : मग त्यात गैर काय आहे? कामगारांचा संबंध केवळ त्यांच्या पगाराशी आहे, फार तर बोनसशी आहे, नफ्याशी मुळीच नाही हे माझं पूर्वीही मत होतं आणि आजही आहे.

**विक्रम** : पण पपा हयात असताना तुमचं मत वेगळं होतं.

**प्रियरंजन** : पपा हयात असताना मला मुळी मतच नव्हतं. असलं तरी ते खाजगी होतं. मी काही शेअरहोल्डर नव्हतो. मी कंपनीचा एक इमानी अधिकारी होतो.

**विक्रम** : पपा आपली योजना कार्यवाहीत आणतील म्हणून त्यांना पदच्युत करण्याचा एक अयशस्वी प्रयत्न काही लोकांनी केला होता.

**प्रियरंजन** : खरं आहे. पण त्याचा माझ्याशी काही संबंध नव्हता.

**विक्रम** : तो प्रयत्न फसला तेव्हाच पपांच्या अंगावर तुळई पाडण्यात आली.

**प्रियरंजन** : तो एक दृष्टिकोन आहे, पण सिद्ध झालेली गोष्ट वेगळी आहे.

**विक्रम** : सिद्ध झालेली गोष्ट एवढीच आहे की तुम्ही फार फार हुशार आहात!

**प्रियरंजन** : कारखान्याचा जनरल मॅनेजर हुशारच असावा लागतो.

**विक्रम** : पण तुम्ही वाजवीपेक्षा जास्तच हुशार निघालात.

**प्रियरंजन** : तुला नेमकं काय म्हणायचंय?

**विक्रम** : (शिडीचा आधार घ्यायचा आणि वर जाताच शिडी भिरकावून द्यायची— असल्या हुशारीला विश्वासघात म्हणतात.)

**प्रियरंजन** : तो मी पपांच्या बाबत कारखान्यात केला असं तुला वाटतं—

**विक्रम** : नुसता कारखान्यात नाही; घरातसुद्धा.

**प्रियरंजन** : कारखान्यातल्या घडामोडींबद्दल मी खुलासा केलाय. तुला तो पटला न पटला तरी—

**विक्रम** : आणि घरातल्याबद्दल?

**प्रियरंजन** : तो विश्वासघात असला तरी त्याचा तुझ्याशी संबंध पोचत नाही. पण जे काय घडलं त्यासाठी पपांची हत्या करायची काही मला गरज नव्हती. पपा हयात असतानाही त्यांची मला काही अडचण झाली नव्हती.

**विक्रम** : (खवळून धावून जात) यू ब्लास्टर्ड...बदमाश...

**प्रियरंजन** : (रोखत) ईझी...ईझी...नको तो प्रश्न विचारलास. आता त्याचं कडूजहर उत्तर मिळायची तुला तयारी ठेवायलाच हवी. तुला अधिक माहिती हवी असली तर तुझी आई आणि माझी प्रिय पत्नी ललिता तुझ्यासमोर उभी आहे, तिलाच विचार. मात्र एक लक्षात ठेव. माथेफिरूपणा करू नकोस. आम्ही कोणी आपुकमापुक नव्हत. लग्नाची नवराबायको आहोत. प्राप्त परिस्थिती शहाणपणानं पत्करलीस, तर या राजेंद्र-

नगरात तुझ्यासाठीही एक उच्चाधिकार निर्माण केला जाईल. मात्र माझ्या विरुद्ध तरवारच उपसणार असलास तर—

**विक्रम** : तुम्ही जा ना आता...आंघोळ करून मोकळे व्हा लवकरात लवकर.

**प्रियरंजन** : (न्याहाळत) तुझं लक्षण मला काही ठीक दिसत नाही.

**ललिता** : (मधे पडत) प्रियरंजन, तुम्ही जा. माझी काळजी करू नका. सगळं काही ठीक होईल.

**प्रियरंजन** : (त्याला पाहात) मला खात्री वाटत नाहीये. पण पाहू या.

[प्रियरंजन जातात. ललितागौरी विक्रमच्या जवळ येते तशी तो पाठ फिरवतो. ती मायेनं त्याच्या खांद्याला स्पर्श करते आणि—]

**ललिता** : विक्रम, बाळा माझं एक ऐकशील का रे ?

**विक्रम** : (खांद्यावरचा हात झटकत) देवीजी—

**ललिता** : (व्याकुळतेनं) अरे मी तुझी आई आहे आई.

**विक्रम** : (पाठ करून) आई होतीस. आता...कोण आहेस ते ठरायचंय. (स्तब्धता. मग प्रचंड आवेगानं वळून) आई, आई तू हे—हे का केलंस ! काऽ ? (एकदम थिजतो.) सॉरी ! ओ गॉड ! जुन्या सवयी जात नाहीत...नवी नाती तोंडवळणी पडत नाहीत. (पाठ वळवून स्वतःला प्रयासानं सावरतो. मग शुष्क कोरडेपणानं) देवीजी, तुम्ही हे—हे सगळं का केलंत ?

**ललितागौरी** : बाळा, हा प्रश्न आता निरर्थक आहे. माझी तुला—

**विक्रम** : (ओरडून) नाही. बाईसाहेब, या प्रश्नाइतकं जगात अर्थपूर्ण दुसरं काहीही उरलेलं नाहीये. निदान माझ्या दृष्टीनं आणिक माझ्यापुरतं !

**ललितागौरी** : विक्रम, तुला ते सगळं विसरून जायला हवं. प्रियरंजनशी मी लग्न केलंय एवढीच वस्तुस्थिती आहे आणि—

**विक्रम** : तर मग कधीकाळी शिवशंकर राजेंद्र यांच्याशी तुम्ही विवाह केला होतात, हे एक स्वप्नच होतं का ? त्यांच्याशी तुम्ही तीस वर्षे संसार केलात, एका मुलाला जन्म दिलात, त्याचं संगोपन करून त्याला लहानाचा मोठा केलात, हा देखील एक कल्पनाविलासच असला पाहिजे, नाही का ?

**ललितागौरी** : (व्याकळून) बाळा, तू मला जरा समजून घे—

**विक्रम** : (आवेगानं) होय होय, तुला समजून घेण्यासाठी मी जिवाचं रान करतोय. माझे प्राण कासावीस झाले आहेत, म्हणूनच मी तुला प्रश्न विचारतोय. सांग, तू हे का केलंस ? पपांनी तुझ्यावर काय अपरंपार प्रेम केलं नव्हतं ? ते तुझ्या आयुष्यात एकदा तरी बेइमान झाले होते ? त्यांनी कधी तुझा कसला छळ केला होता ? कधी जाच केला होता ? कधी कशाची झळ लागू दिली होती ? तुझ्या अर्ध्या वचनात ते वागत नव्हते ? तू म्हणशील ते तुझे लाड, तुझं कोडकौतुक पुरवत नव्हते ? तुझ्याकडं कधी

त्यांनी दुर्लक्ष केलं होतं? इतर कोणाचा मोह पडावा असं तुला अतृप्त ठेवलं होतं? सांग...सांग...काहीतरी उत्तर दे. हा विश्वासघात तू का केलास?

**ललिता** : विक्रम, या तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी तुला कधी देणार नाही. आणि चार भिंतीं-आड तुझ्या प्रिय पपांचं आणि माझं नवराबायकोचं नातं कशामुळं नासून गेलं, ते तुझी आई म्हणून मला कधीच सांगता येणार नाही.

**विक्रम** : ठीक आहे. पप्पा दुष्ट कधीच नव्हते. तुमच्या परस्परसंबंधात ते कुठे उणे पडलेही असतील. पण वयात आलेल्या मुलाची एक प्रौढ माता ज्या स्मशानवाईनं एका क्षुद्र, नीच आणि कपटी माणसाच्या गळ्यात पडते, त्याची शरम—

**ललिता** : थांब. पुष्कळ बोललास. तुझ्या पपांच्याबद्दल तुला गाढ आदर असणं स्वाभाविक आहे. पण म्हणून प्रियरंजनबद्दल इतकं वेडंवाकडं बोलायची गरजच आहे का? या घरात तू त्यांना शिव्याशाप दिलेले मला आवडायचे नाहीत.

**विक्रम** : (संतापाने) चुकताहात बाईसाहेब. आपण दुसरा घरोबा केला असलात, तरी हे घर माझ्या पपांचं आहे. माझ्या पपांच्या घरात उभं राहून मी तुम्हाला जाब विचारतोय.

**ललिता** : माझ्या लेखी तुझे पपा संपले.

**विक्रम** : (भडकून अंगावर धावून जाऊन तिचे खांदे धरून गदागदा घुसळत) संपले नाहीत चांडाळणी, तुम्ही दोघा जार-जारिणींनी त्यांना संपवले!

[ती 'धावा, धावा' किंचाळते. त्या क्षणी विक्रम तिला सोडतो. चकित, भयभीत होतो. दिवे फडफडतात. विचित्र सुरावटींचे संगीत. संथ पावलांचा ठप्प...ठप्प...आवाज. आणि शिवशंकर राजेंद्र यांचे पिशाच्च दारात उभे राहते. दरम्यान बाहेरून बलराज धावत येतो. आतून दयाळसाहेब आणि प्रियरंजन धावत येतात. त्यांच्यापैकी कोणालाही हे पिशाच्च दिसत नाही. दिसते फक्त विक्रमला. त्यामुळे सगळेच विक्रमचे वेडेचार आणि बडबड स्तिमित मुद्रेने बघत राहातात.]

**विक्रम** : (थरथरत मागे मागे सरत) पपा...पपा...तुम्ही इथं का आलात?

[पिशाच्च तोंड वर करून काही बोलल्यासारखे ओठ हलतात, तशी]

**विक्रम** : नाही नाही पपा...मी—मी तिला कधी अपाय करणार नव्हतो. पण ती—ती काय म्हणाली ते ऐकलंत ना? [पिशाच्च मान हलवून 'होय' म्हणते.] पपा...पपा... तुमचा मृत्यू कसा घडला ते सगळं कळून चुकलंय मला.

**ललिता** : (जवळ जात कळवळून) विक्रम, बाळा कोणाशी बोलतो आहेस तू?

**बलराज** : मित्रा, हे काय चालवलं आहेस तू? भ्रमिष्ट तर झाला नाहीस?

**विक्रम** : पपा, मला शंका आहे...नाही नाही, खात्रीच पटलीय, तुम्ही जिवंत होता त्या वेळीच आईचा त्याच्याशी संबंध जुळला होता. तेवढ्यासाठीच तिनं गेली सहासात वर्षं मला हट्टानं जर्मनीत दूर ठेवलं होतं. खरंय?...बोला...बोला पपा,

नगरात तुझ्यासाठीही एक उच्चाधिकार निर्माण केला जाईल. मात्र माझ्या विरुद्ध तरवारच उपसणार असलास तर—

**विक्रम** : तुम्ही जा ना आता...आंघोळ करून मोकळे व्हा लवकरात लवकर.

**प्रियरंजन** : (न्याहाळत) तुझं लक्षण मला काही ठीक दिसत नाही.

**ललिता** : (मधे पडत) प्रियरंजन, तुम्ही जा. माझी काळजी करू नका. सगळं काही ठीक होईल.

**प्रियरंजन** : (त्याला पाहात) मला खात्री वाटत नाहीये. पण पाहू या.

[प्रियरंजन जातात. ललितागौरी विक्रमच्या जवळ येते तशी तो पाठ फिरवतो. ती मायेनं त्याच्या खांद्याला स्पर्श करते आणि—]

**ललिता** : विक्रम, बाळा माझं एक ऐकशील का रे ?

**विक्रम** : (खांद्यावरचा हात झटकत) देवीजी—

**ललिता** : (व्याकुळतेनं) अरे मी तुझी आई आहे आई.

**विक्रम** : (पाठ करून) आई होतीस. आता...कोण आहेस ते ठरायचंय. (स्तब्धता. मग प्रचंड आवेगानं वळून) आई, आई तू हे—हे का केलंस ? काऽ ? (एकदम थिजतो.) सॉरी ! ओ गॉड ! जुन्या सवयी जात नाहीत...नवी नाती तोंडवळणी पडत नाहीत. (पाठ वळवून स्वतःला प्रयासानं सावरतो. मग शुष्क कोरडेपणानं) देवीजी, तुम्ही हे—हे सगळं का केलंत ?

**ललितागौरी** : बाळा, हा प्रश्न आता निरर्थक आहे. माझी तुला—

**विक्रम** : (ओरडून) नाही. बाईसाहेब, या प्रश्नाइतकं जगात अर्थपूर्ण दुसरं काहीही उरलेलं नाहीये. निदान माझ्या दृष्टीनं आणिक माझ्यापुरतं !

**ललितागौरी** : विक्रम, तुला ते सगळं विसरून जायला हवं. प्रियरंजनशी मी लग्न केलंय एवढीच वस्तुस्थिती आहे आणि—

**विक्रम** : तर मग कधीकाळी शिवशंकर राजेंद्र यांच्याशी तुम्ही विवाह केला होतात, हे एक स्वप्नच होतं का ? त्यांच्याशी तुम्ही तीस वर्षं संसार केलात, एका मुलाला जन्म दिलात, त्याचं संगोपन करून त्याला लहानाचा मोठा केलात, हा देखील एक कल्पना-विलासच असला पाहिजे, नाही का ?

**ललितागौरी** : (व्याकळून) बाळा, तू मला जरा समजून घे—

**विक्रम** : (आवेगानं) होय होय, तुला समजून घेण्यासाठी मी जिवाचं रान करतोय. माझे प्राण कासावीस झाले आहेत, म्हणूनच मी तुला प्रश्न विचारतोय. सांग, तू हे का केलंस ? पपांनी तुझ्यावर काय अपरंपार प्रेम केलं नव्हतं ? ते तुझ्या आयुष्यात एकदा तरी बेइमान झाले होते ? त्यांनी कधी तुझा कसला छळ केला होता ? कधी जाच केला होता ? कधी कशाची झळ लागू दिली होती ? तुझ्या अर्ध्या वचनात ते वागत नव्हते ? तू म्हणशील ते तुझे लाड, तुझं कोडकौतुक पुरवत नव्हते ? तुझ्याकडं कधी

त्यांनी दुर्लक्ष केलं होतं? इतर कोणाचा मोह पडावा असं तुला अतृप्त ठेवलं होतं? सांग...सांग...काहीतरी उत्तर दे. हा विश्वासघात तू का केलास?

**ललिता :** विक्रम, या तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी तुला कधी देणार नाही. आणि चार भिंतींआड तुझ्या प्रिय पपांचं आणि माझं नवराबायकोचं नातं कशामुळं नासून गेलं, ते तुझी आई म्हणून मला कधीच सांगता येणार नाही.

**विक्रम :** ठीक आहे. पप्पा दुष्ट कधीच नव्हते. तुमच्या परस्परसंबंधात ते कुठे उणे पडलेही असतील. पण वयात आलेल्या मुलाची एक प्रौढ माता ज्या स्मशानघाईनं एका क्षुद्र, नीच आणि कपटी माणसाच्या गळ्यात पडते, त्याची शरम—

**ललिता :** थांब. पुष्कळ बोललास. तुझ्या पपांच्याबद्दल तुला गाढ आदर असणं स्वाभाविक आहे. पण म्हणून प्रियरंजनबद्दल इतकं वेडंवाकडं बोलायची गरजच आहे का? या घरात तू त्यांना शिव्याशाप दिलेले मला आवडायचे नाहीत.

**विक्रम :** (संतापाने) चुकताहात बाईसाहेब. आपण दुसरा घरोबा केला असलात, तरी हे घर माझ्या पपांचं आहे. माझ्या पपांच्या घरात उभं राहून मी तुम्हाला जाब विचारतोय.

**ललिता :** माझ्या लेखी तुझे पपा संपले.

**विक्रम :** (भडकून अंगावर धावून जाऊन तिचे खांदे धरून गदागदा घुसळत) संपले नाहीत चांडाळणी, तुम्ही दोघा जार-जारिणींनी त्यांना संपवले!

[ती 'धावा, धावा' किंचाळते. त्या क्षणी विक्रम तिला सोडतो. चकित, भयभीत होतो. दिवे फडफडतात. विचित्र सुरावटींचे संगीत. संथ पावलांचा ठप्प...ठप्प...आवाज. आणि शिवशंकर राजेंद्र यांचे पिशाच्च दारात उभे राहते. दरम्यान बाहेरून बलराज धावत येतो. आतून दयाळसाहेब आणि प्रियरंजन धावत येतात. त्यांच्यापैकी कोणालाही हे पिशाच्च दिसत नाही. दिसते फक्त विक्रमला. त्यामुळे सगळेच विक्रमचे वेडेचार आणि बडबड स्तिमित मुद्रेने बघत राहातात.]

**विक्रम :** (थरथरत मागे मागे सरत) पपा...पपा...तुम्ही इथं का आलात?

[पिशाच्च तोंड वर करून काही बोलल्यासारखे ओठ हलतात, तशी]

**विक्रम :** नाही नाही पपा...मी—मी तिला कधी अपाय करणार नव्हतो. पण ती—ती काय म्हणाली ते ऐकलंत ना? [पिशाच्च मान हलवून 'होय' म्हणते.] पपा...पपा... तुमचा मृत्यू कसा घडला ते सगळं कळून चुकलंय मला.

**ललिता :** (जवळ जात कळवळून) विक्रम, बाळा कोणाशी बोलतो आहेस तू?

**बलराज :** मित्रा, हे काय चालवलं आहेस तू? भ्रमिष्ट तर झाला नाहीस?

**विक्रम :** पपा, मला शंका आहे...नाही नाही, खात्रीच पटलीय, तुम्ही जिवंत होता त्या वेळीच आईचा त्याच्याशी संबंध जुळला होता. तेवढ्यासाठीच तिनं गेली सहासात वर्षं मला हट्टानं जर्मनीत दूर ठेवलं होतं. खरंय?...बोला...बोला पपा,

खरंय?...[पिशाच्च पाठ फिरवतं, तशी तो त्याच्या भोवती फिरत फिरत विचारतो, "बोला...खरंय?...खरंय?"] हा प्रियरंजन आपल्या दूरच्या नात्यातला एक तरुण, सरकारी नोकरीत अफरातफर करून तुरुंगात गेलेला, सुटल्यावर दयाबुद्धीनं तुम्ही जवळ केलात, आधार दिलात, कर्तबगारीला वाव देऊन, शिकवून शहाणा करून मोठा केलात—त्यानं या घरात शेण खावं? [पिशाच्च केविलवाण्या दृष्टीनं पाहातं तशी—] नका...नकाऽ पपा, असे केविलवाण्या दृष्टीनं बघू नका. कोणी नाही तरी मी...मी आहे तुमच्या पाठीशी. तुम्ही मला का नाही सांगितलंत? मला थोडी कल्पना दिली असतीत तरी मी धावून आलो असतो. मी या घराचा कारभार हाती घेतला असता...

**प्रियरंजन** : दयाळसाहेब, त्याचं डोकं तर फिरलं नाही?

**दयाळ** : ते तर मी कधीचं म्हणतोय साहेब.

**ललिता** : विक्रम...विक्रम...बाळाऽ

**विक्रम** : पपा, एकच सांगा, हा उघड उघड व्यभिचार उघड्या डोळ्यांनी तुम्ही का सहन केलात? का, का, का? [पिशाच्च मान खाली घालतं, तशी जवळ जात] नाही नाही पपा, कुठे तिळाएवढी दगलबाजी दिसली तर तुम्ही कशी ढाण्या वाघासारखी झडप घालत होता हे मी पाहिलंय. मग हा विश्वासघात तुम्ही का सहन केलात? ही बेइमानी तुम्ही मुकाट्यानं का सोसलीत? [पिशाच्च मान हलवीत पाठ वळवून जाऊ लागतं, तशी—] नाही नाही पपा, आईनं माझ्याकडं पाठ फिरवलीय. तुम्ही तरी मला उत्तर द्यायलाच हवं, पपाऽऽ पपाऽऽ, माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हाला!

[पिशाच्च दारात थबकून वळून काही बोलून निघून जाते. प्रकाश पूर्ववत होतो. विक्रम हळूहळू भानावर येतो.]

**विक्रम** : आई, पपा काय म्हणाले ते ऐकलंस? पहारे ठेवूनच बायको पतिव्रता राहाणार असेल तर तात्काळ ती गमावलेलीच बरी!

**ललिता** : पपा? वेड्या, आता कोठले आले आहेत पपा?

**विक्रम** : तुला ते दिसले नाहीत? ते काय म्हणाले ते—

**ललिता** : नाही, तू हवेत पाहून काय बरळत होतास?

**विक्रम** : बलराज, तू तरी नक्कीच पाहिलं असशील त्यांना.

**बलराज** : नाही. विक्रम, तुला काहीतरी भास झाला असला पाहिजे.

**विक्रम** : भास? छे छे...नाही...नाही...भास नव्हता तो...

**दयाळ** : सगळ्या गोष्टी अगदी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट आहेत. हा—हा शुद्ध वेडाचार आहे.

**ललिता** : विक्रमची मनःस्थिती ठीक नाहीये प्रियरंजन, याला कोणा चांगल्या डॉक्टरलाच दाखवायला हवं.

विक्रम : (स्वतःशीच हरवत) भास?...छे छे, भास नाहीच...कोण जाणे.

प्रियरंजन : ही चर्चा करीत बसायची वेळ नाहीये ललिता. त्याला घेऊन जा, स्वस्थ आराम करू दे आजची रात्र त्याला. बलराज, जरूर तर डॉक्टर गिडवानींना फोन करून बोलावून घे. त्याला काहीतरी सेडेटिव्ह द्यावं लागेल असं मला वाटतं. कित्येक रात्री त्याला झोप मिळालेली दिसत नाहीये, त्याला कोणाला दाखवायचं आणि कुठं ठेवायचं ते आता मलाच ठरवायला हवं. जा तुम्ही.

ललिता : विक्रम, चल बाळा—

[बलराज आणि ललिता हरवून बसलेल्या विक्रमला घेऊन जातात. तो निमूटपणे जातो. मग—]

प्रियरंजन : दयाळसाहेब, आता अधिक काळ थांबणं म्हणजे विस्तवाशी खेळ होणार आहे.

दयाळ : होय साहेब. आपण सांगाल ते ताबडतोब होईल.

प्रियरंजन : यूरोप-अमेरिकेत उत्तमातली उत्तम वेड्याची हॉस्पिटल्स कुठं आहेत त्याचा तावडतोब शोध करा.

दयाळ : शोध आधीच केलाय साहेब.

प्रियरंजन : तसं नाही. आपल्याला सोयीची असायलम्स हवीत.

दयाळ : त्याचाच शोध घेऊन ठेवलाय साहेब. आपल्याला सोयीचं मेंटल असायलम्. स्वित्झर्लंडमधे.

प्रियरंजन : आय सीऽऽ. किती दिवसांत बरा होऊन तो परत येऊ शकेल इथं?

दयाळ : (साभिप्राय स्मित करीत) त्याची कोण कशी हमी देणार साहेब? वेड्याच्या इस्पितळात माणसं आपल्या पायानं गेली तरी ती बरी होऊन परत येणं म्हणजेऽऽऽ... तसं अशक्य काही नाही. पण म्हणजे माणसाला तिथं पाठवणाऱ्यानंच शेवटी ठरवायचं आहे ते!

प्रियरंजन : (स्मित करीत) हुशार आहात. तर आता मी काय सांगतो ते नीट ऐका—

[असे म्हणत दयाळसाहेबांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना काही सांगत प्रियरंजन जाऊ लागतात, त्याच वेळी—अंधार.]

## प्रवेश तिसरा

[तोच दर्शनी हॉल. मागील प्रवेशातील घडामोडीनंतर काही दिवस उलटले आहेत. एक सायंकाळ. दयाळसाहेब दाराशी उभे आहेत. आतून दोन नोकर एक एक अवजड पेटी घेऊन येतात आणि बाहेर नेऊ लागतात. ते पाहून—]

खरंय? ..[पिशाच्च पाठ फिरवतं, तशी तो त्याच्या भोवती फिरत फिरत विचारतो, "बोला...खरंय?...खरंय?"] हा प्रियरंजन आपल्या दूरच्या नात्यातला एक तरुण, सरकारी नोकरीत अफरातफर करून तुरुंगात गेलेला, सुटल्यावर दयाबुद्धीनं तुम्ही जवळ केलात, आधार दिलात, कर्तबगारीला वाव देऊन, शिकवून शहाणा करून मोठा केलात—त्यानं या घरात शेण खावं? [पिशाच्च केविलवाण्या दृष्टीनं पाहातं तशी—] नका...नकाऽ पपा, असे केविलवाण्या दृष्टीनं बघू नका. कोणी नाही तरी मी...मी आहे तुमच्या पाठीशी. तुम्ही मला का नाही सांगितलंत? मला थोडी कल्पना दिली असतीत तरी मी धावून आलो असतो. मी या घराचा कारभार हाती घेतला असता...

**प्रियरंजन** : दयाळसाहेब, त्याचं डोकं तर फिरलं नाही?

**दयाळ** : ते तर मी कधीचं म्हणतोय साहेब.

**ललिता** : विक्रम...विक्रम...बाळाऽ

**विक्रम** : पपा, एकच सांगा, हा उघड उघड व्यभिचार उघड्या डोळ्यांनी तुम्ही का सहन केलात? का, का, का? [पिशाच्च मान खाली घालतं, तशी जवळ जात] नाही नाही पपा, कुठे तिळाएवढी दगलबाजी दिसली तर तुम्ही कशी ढाण्या वाघासारखी झडप घालत होता हे मी पाहिलंय. मग हा विश्वासघात तुम्ही का सहन केलात! ही बेइमानी तुम्ही मुकाट्यानं का सोसलीत? [पिशाच्च मान हलवीत पाठ वळवून जाऊ लागतं, तशी—] नाही नाही पपा, आईनं माझ्याकडं पाठ फिरवलीय. तुम्ही तरी मला उत्तर द्यायलाच हवं, पपाऽऽ पपाऽऽ, माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हाला!

[पिशाच्च दारात थबकून वळून काही बोलून निघून जाते. प्रकाश पूर्ववत होतो. विक्रम हळूहळू भानावर येतो.]

**विक्रम** : आई, पपा काय म्हणाले ते ऐकलंस? पहारे ठेवूनच बायको पतिव्रता राहाणार असेल तर तात्काळ ती गमावलेलीच बरी!

**ललिता** : पपा? वेड्या, आता कोठले आले आहेत पपा?

**विक्रम** : तुला ते दिसले नाहीत? ते काय म्हणाले ते—

**ललिता** : नाही, तू हवेत पाहून काय बरळत होतास?

**विक्रम** : बलराज, तू तरी नक्कीच पाहिलं असशील त्यांना.

**बलराज** : नाही. विक्रम, तुला काहीतरी भास झाला असला पाहिजे.

**विक्रम** : भास? छे छे...नाही...नाही...भास नव्हता तो...

**दयाळ** : सगळ्या गोष्टी अगदी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट आहेत. हा—हा शुद्ध वेडाचार आहे.

**ललिता** : विक्रमची मनःस्थिती ठीक नाहीये प्रियरंजन, याला कोणा चांगल्या डॉक्टरलाच दाखवायला हवं.

विक्रम : (स्वतःशीच हरवत) भास?...छे छे, भास नाहीच...कोण जाणे.

प्रियरंजन : ही चर्चा करीत बसायची वेळ नाहीये ललिता. त्याला घेऊन जा, स्वस्थ आराम करू दे आजची रात्र त्याला. बलराज, जरूर तर डॉक्टर गिडवानींना फोन करून बोलावून घे. त्याला काहीतरी सेडेटिव्ह द्यावं लागेल असं मला वाटतं. कित्येक रात्री त्याला झोप मिळालेली दिसत नाहीये, त्याला कोणाला दाखवायचं आणि कुठं ठेवायचं ते आता मलाच ठरवायला हवं. जा तुम्ही.

ललिता : विक्रम, चल बाळा—

[बलराज आणि ललिता हरवून बसलेल्या विक्रमला घेऊन जातात. तो निमूटपणे जातो. मग—]

प्रियरंजन : दयाळसाहेब, आता अधिक काळ थांबणं म्हणजे विस्तवाशी खेळ होणार आहे.

दयाळ : होय साहेब. आपण सांगाल ते तावडतोब होईल.

प्रियरंजन : यूरोप-अमेरिकेत उत्तमातली उत्तम वेड्याची हॉस्पिटल्स कुठं आहेत त्याचा तावडतोब शोध करा.

दयाळ : शोध आधीच केलाय साहेब.

प्रियरंजन : तसं नाही. आपल्याला सोयीची असायलम्स हवीत.

दयाळ : त्याचाच शोध घेऊन ठेवलाय साहेब. आपल्याला सोयीचं मेंटल असायलम्. स्वित्झर्लंडमधे.

प्रियरंजन : आय सीऽऽ. किती दिवसांत बरा होऊन तो परत येऊ शकेल इथं?

दयाळ : (साभिप्राय स्मित करीत) त्याची कोण कशी हमी देणार साहेब? वेड्याच्या इस्पितळात माणसं आपल्या पायानं गेली तरी ती बरी होऊन परत येणं म्हणजेऽऽऽ... तसं अशक्य काही नाही. पण म्हणजे माणसाला तिथं पाठवणाऱ्यानंच शेवटी ठरवायचं आहे ते!

प्रियरंजन : (स्मित करीत) हुशार आहात. तर आता मी काय सांगतो ते नीट ऐका—

[असे म्हणत दयाळसाहेबांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना काही सांगत प्रियरंजन जाऊ लागतात, त्याच वेळी—अंधार.]

## प्रवेश तिसरा

[तोच दर्शनी हॉल. मागील प्रवेशातील घडामोडींनंतर काही दिवस उलटले आहेत. एक सायंकाळ. दयाळसाहेब दाराशी उभे आहेत. आतून दोन नोकर एक एक अवजड पेटी घेऊन येतात आणि बाहेर नेऊ लागतात. ते पाहून—]

दयाळ : अरे काय आहे काय एवढं जड त्या पेट्यांत?

पहिला नोकर : साहेब, पुस्तकं भरली आहेत.

दयाळ : पुस्तकंऽऽ? कमाल आहे. अरे छोटे साहेब ट्रीटमेंटसाठी व्हिएन्नाला जाताहेत; सुट्टीवर मौजमजा करण्यासाठी नाही. तिथं कोणी त्यांना पुस्तकाला हात तरी लावून देतील का?

दुसरा नोकर : छोट्या साहेबांना ते आम्ही कसं सांगायचं साहेब?

दयाळ : ठीक आहे. मेटॅडोरमधे पुस्तकांच्या पेट्या बाजूला रचून ठेवा. छोट्या साहेबांना काही सांगायची गरज नाही, पण त्या पेट्या परत आणायच्या आहेत एवढं तुम्ही लक्षात ठेवा म्हणजे झालं.

पहिला नोकर : छोटे साहेब आमच्यावर रागावतील साहेब.

दयाळ : परत आल्यावरच ना? फार लांबची गोष्ट आहे ती! त्यांना काय सांगायचं ते मी पाहीन. माझा हुकूम तुम्ही लक्षात ठेवा. एयरपोर्टवर तुम्ही आपली अक्कल चालवून काही गोंधळ करू नका, म्हणजे झालं. चला, घेऊन चला.

[दोघे चपराशी पेट्या उचलून घेऊन जातात. दयाळसाहेब पाहात विचारमग्न उभे राहातात. तोच आतून ब्रिगे. कीर्तिकर आणि खानझोडे बोलत येतात.]

कीर्तिकर : डेंजरस...व्हेरी डेंजरस मॅन...

खानझोडे : विमान काही सरळपणानं व्हिएन्नाला पोचेलसं वाटत नाही!

दयाळ : का? काय भानगड झाली कीर्तिकरसाहेब? छोटे साहेब भेटले ना तुम्हाला?

कीर्तिकर : हो, भेटले. पण आम्ही शुभेच्छा द्यायला लागलो तर त्यांनी कपाट उघडून आपलं रिव्हॉल्व्हरच बाहेर काढलं!

दयाळ : बापरे! आणि? ते तुमच्यावर रोखलं?

खानझोडे : रोखलं नाही. आमच्यासमोर पिस्तुलाची साफसफाई चालवली. मी विचारलं की—"हा काय प्रकार आहे साहेब?" तर साहेब म्हणतात—"दयाळजींच्या पावलावर पाऊल ठेवून उंटावरला शहाणा होण्याची तयारी करतोय मी."

दयाळ : माझ्या पावलावर पाऊल ठेवून? आणि उंटावरला शहाणा? म्हणजे?

खानझोडे : "उंटावरले शहाणे, इस्पितळातल्या वेड्यांचे थोरले भाऊ असतात." —साहेबांचा खुलासा आहे हा.

कीर्तिकर : मी विचारलं, "हे पिस्तुल बरोबर घेऊन प्रवास करणार आहात का आपण?" तर साहेब मलाच विचारतात—"त्याशिवाय विमान हायजॅक कसं करता येईल?"

दयाळ : विमान? हायजॅक?

कीर्तिकर : "विमान हायजॅक कशासाठी करायचं?" तर साहेब म्हणतात, "त्याशिवाय अरबस्तानातल्या वाळवंटात कसं उतरता येईल?" साहेब म्हणाले—"ते सगळं

ठरलंय. उद्या आमचा मुक्काम अरबी वाळवंटात आणि तेथून पुढचा प्रवास, दरमजल करीत उंटावरून. अगदी शहाण्यासारखा." एवढं बोलून खदाखदा हसले.

दयाळ : तुम्ही काय त्यांचं बोलणं मनावर घेताय कीर्तिकरसाहेब! साहेबांचं डोकं ठिकाणावर आहे का?

खानझोडे : पण अशी डोकं फिरलेली माणसंच विमानात दंगाधोपा उडवतात, दयाळजी.

दयाळ : विमानतळावर हल्ली कसून तपासणी होते हे ठाऊक आहे ना तुम्हाला खान-झोडेसाहेब? शिवाय मी बरोबर जातोच आहे त्यांच्या.

खानझोडे : पाहा बुवा. आम्ही आपला इशारा देऊन ठेवतोय. बी केयरफुल.

कीर्तिकर : चला चला खानझोडेसाहेब, साहेब वाट पहात असतील आपली ऑफिसात.

[कीर्तिकर, खानझोडे जातात. दयाळ क्षणमात्र विचारमग्न. मग दाराशी जाऊन हाकारतात— 'गफूर', तशी पहिला नोकर धावत येतो.]

दयाळ : ड्रायव्हरला गाडी मागल्या बाजूला घ्यायला सांग आणि सगळ्या बॅगा आणि पेट्या बाहेर काढून उघडून ठेवा. मला तपासायच्या आहेत त्या.

गफूर : जी साब. [गफूर सलाम करून जातो. दयाळसाहेब विचार करीत फोनपाशी जाऊन रिसीव्हर उचलतात, तोच "बोला दयाळजी, अरबी वाळवंटात उतरून उंटावरून पुढचा प्रवास करण्याची कल्पना कशी वाटली तुम्हाला? एकदम् फँटास्टिक की नाही?" असे म्हणत विक्रम येतो. पँट, बुशशर्ट आणि सुरेख अवतार. पाठोपाठ बलराजही येतो. त्याची मुद्रा गंभीर. दयाळ दचकून गांगरतात व रिसीव्हर खाली ठेवतात आणि—]

दयाळ : हे उंटावरल्या प्रवासाचं काय खूळ काढलंय आपण साहेब? चेष्टामस्करी तर नव्हे?

विक्रम : छे छेऽ चेष्टामस्करी नव्हे, खूळ नव्हे, तुमच्या चौकटीत बसणारी अगदी शहाणपणाची योजना आहे ही.

दयाळ : साहेब, विमानातून अगदी थेट प्रवास करता येतो; त्यासाठी एवढा आड-वळणाचा द्राविडी प्राणायाम—

विक्रम : दॅटस् इट. मलाही तोच प्रश्न पडलाय. आपल्या देशात इतकी चांगली मेंटल असायलम्स असताना तुम्ही व्हिएन्नाचं इस्पितळ कशासाठी निवडलंत? ज्या अर्थी निवडलंत, त्या अर्थी आपला प्रवासही त्या शहाणपणाला साजेसाच व्हायला हवा. म्हणजे उंटावरून. काय बलराज? (हसतो.)

दयाळ : साहेब, तुम्ही चेष्टा करा. पण ते ते सगळं पूर्ण विचार करून केवळ आपल्या भल्यासाठीच ठरवण्यात आलंय.

विक्रम : अरेऽऽच्या! माझ्याच भल्यासाठी, नाही का? हे—हे मी पाऽर विसरलोच्च होतो. तर मग दयाळजी, सगळ्या बॅगा आणि पेट्या तुम्ही स्वतः जातीनं जाऊन तपासा. माझ्या भल्यासाठी. आणि सगळा स्फोटक माल तुम्ही काढून टाका.

दयाळ : स्फोटक माल? त्यात पुस्तकं भरली आहेत असं—

विक्रम : मग? पुस्तकंदेखील फार स्फोटक असतात हे तुम्हाला ठाऊक नाही? [तेवढ्यात लगबगीनं जाई येते, तशी] हांऽऽ हियर कम्स माय प्रेशस जाई.

दयाळ : तू इथं का आलीस जाई?

विक्रम : तुम्ही नेमून दिलेली कामगिरी पार पाडण्यासाठी.

दयाळ : कामगिरी? मी नेमून दिलेली?

विक्रम : दयाळसाहेब, हा तुमच्या उंटावरल्या शहाणपणाचा आणखी एक पुरावा आहे. कोणाला कोणावर हेर म्हणून नेमावं याचं काही तारतम्य?

दयाळ : (गांगरून) स...स...साहेब...ग...गैरसमज...तुमचा काहीतरी...

विक्रम : छे छे, अगदी योग्य समजच झालाय माझा. आणि कोणी काही येऊन मला सांगितलं, तरी तेवढ्यानं तुमच्या ठरलेल्या योजनेत खो घालण्याइतका मी डांबरट नाहीये. चला, बॅगा-पेट्यांची झडती आटोपून घ्या तुम्ही. [दयाळ लगबगीनं जातात. विक्रम कोचावर अंग टाकीत, सिगरेट शिलगावीत धूर सोडत] सो...दॅट्स दॅट!

बलराज : तू हे काय चालवलं आहेस विक्रम?

विक्रम : शहाणे लोक ज्याला 'वेडेपणा' म्हणतात त्याचा स्वाद घेऊन बघतोय मी. रिअली बलराज, आय ॲम एन्जॉइंग माय मॅडनेस.

जाई : काहीतरीच बोलू नकोस विक्रम! तू वेडा नाहीयेस. तुला काहीही झालेलं नाहीये.

विक्रम : जाई, शहाणा आणि वेडा यांत उभी असते एक नागमोडी सीमारेषा. क्वचित इकडे, तर कधी तिकडे झुकणारी. त्या रेषेवरच चालली आहे माझी कसरत.

जाई : पण याचे परिणाम किती भयंकर होणार आहेत विक्रम—

विक्रम : भयंकरातलं भयंकर तर कधीच होऊन चुकलंय. जिवाभावानं जपलेलं घर वीज कोसळून एकदा भुईसपाट झालं की मग कितीही वणवण केली तरी पसरायला जमीन तीच—खडबडीत नाही तर बुळबुळीत आणि पांघरायला आकाशही तेच—विरविरीत नाही तर विसविशीत.

जाई : विक्रम, तू एकदा इथून गेलास की पुन्हा कधीही परत येऊ शकणार नाहीस. तुझं नखसुद्धा कधी मला पुन्हा दिसायचं नाही.

विक्रम : त्याबद्दल माझी काही तक्रार नाहीये जाई.

जाई : उभा जन्म तू एक वेडा म्हणून वेड्याच्या इस्पितळात घालवणार आहेस?

विक्रम : जाई, जगण्यातला हेतू संपला की जिद्दही मावळते. मग आपणच आपल्याला परके होऊन बसतो. या परकेपणातून पाहायची सवय झाली की सगळीकडं वेड्यांचाच बाजार भरलेला दिसतो. आत काय न् बाहेर काय, सगळीच गंमत बघायला मिळते. हे—हे सगळं खुशीनं पत्करायचं ठरवलंय मी.

जाई : एक तुझी आई बेइमान निघाली म्हणून जगातला सगळा चांगुलपणा उकिरड्या-

वर आलाय का ?

**विक्रम :** एक आईच म्हणू नकोस. पपांचे सहकारीदेखील कावेबाज आणि विश्वासघातकी ठरले. ज्यांच्या हितासाठी पपांनी प्राण पणाला लावले ते कामगार आणि त्यांचे पुढारी देखील मतलबासाठी मठ्ठपणानं किडून गेले. असल्या किडलेल्या दुनियेतला पुरुषार्थदेखील वांझ आहे.

**बलराज :** मित्रा, तू फार फार चुकीच्या दृष्टीनं विचार करतो आहेस. विचार करण्याची ही रीत, आईच्या बोटाला धरून चालणाऱ्या एका बालकाची आहे. आई-वडिलांच्यात आपलं रूप पाहाण्यात धन्यता मानणाऱ्या एका पोरसवदा किशोराची आहे. पण समर्थ आणि आणि स्वतंत्र तरुणाची नक्कीच नाही. विक्रम, वयानं तू कधीच वाढणार नाहीयेस का रे ?

**विक्रम :** (दचकतो. थबकून सिगेरट विझवीत) माझ्या दुःखाचा आणि माझ्या वयानं वाढण्याचा काय संबंध आहे बलराज ?

**बलराज :** तुझं दुःख मी समजू शकतो विक्रम, पण तुझं दुखणं मात्र अट्टाहासानं तुझं तूच ओढवून घेतलं आहेस. तेही केवळ वस्तुस्थितीला बावरून पळून जायच्या तुझ्या केविलवाण्या धडपडीमुळे.

**विक्रम :** कोणती वस्तुस्थिती ?

**बलराज :** तुझी आई आणि तुझे वडील, हा तुझा भूतकाळ आहे. किती दिवस हा भूतकाळच तू उकरत बसणार आहेस ? किती दिवस स्वतःच्या भविष्याला सामोरं जायचं तू टाळणार आहेस ?

**विक्रम :** तू विसरतो आहेस बलराज, भविष्याची पाळंमुळं अखेर माणसाच्या भूतकाळातच रुजलेली असतात. माझ्याच वाट्याला आलेली आई आणि वडील—

**बलराज :** थांब. गफलत करू नकोस. आई-वडील कोणालाच निवडता येत नाहीत. ते अखेर प्रत्येकाला पत्करायचेच असतात. पण म्हणूनच ते कोणाच्याही जीवनाचा हेतू होऊच शकत नाहीत. जगण्याचा हेतू ज्याचा त्यानं घ्यायचा असतो. हेतू निवडायचा असतो. हेतू कष्टानं घडवायचा असतो. तुझी दुर्वर्तनी आई तेवढी तुला झपाटून राहिली, पण तुझ्यावरून जीव ओवाळून टाकणारी ही निष्पाप जाई तुला दिसली नाही ? ही दुनियाच किडलीय असा शेरा मारताना राजेंद्रनगरातील फौजच्या फौज तुला आठवली, पण तुझ्या सतत पाठीशी राहाणरा हा तुझा भावडा मित्र तुला दिसला नाही ? विक्रम, हा कोणा घरचा न्याय आहे रे ?

**विक्रम :** (स्तब्धतेत येरझारा घालतो. मग) हूंऽऽ ! तू म्हणतोस त्यात जरूर अर्थ आहे, पण—(थबकतो आणि हरवतो.)

**बलराज :** (मायेनं जवळ जात) तुला काहीएक झालेलं नाहीये विक्रम. फक्त मनावरली मरगळ झटकून टाक आणि आपलं भविष्य घडवायला पुन्हा एकदा जिद्दीनं ताठ

उभा राहा. डोंगरासारखा.

**विक्रम** : होय होय. डोंगराएवढं बळ मला मिळवलंच पाहिजे. कारण भविष्य कोरायचं ठरलंच तर या राजेंद्रनगरात मी क्षणभरही थांबणार नाही की वडिलार्जित दौलतीतल्या एका दिडकीलाही मी शिवणार नाही. शून्यापासून मला सुरवात करावी लागणार आहे. जाई, पुढचा काळ फार फार कठीण येणार आहे!

**जाई** : तू मला अगदीच भोळीभाबडी आणि अल्लड समजू नकोस विक्रम. या क्षणी तू सांगशील तिकडं अशीच्या अशी यायला तयार आहे मी.

**विक्रम** : भ्रमात राहू नकोस. (उलट्या प्रवाहाशी झगडताना दमछाक झाली तरी कोणी मदतीला येणार नाही.) हे शिवधनुष्य पेललं नाही तर माझ्याबरोबर तूही चिरडून जाशील.

**जाई** : तुझ्याशिवाय मला मात्र दुसरं अस्तित्व तरी उरलंय का रे विक्रम? जे काय व्हायचं असेल ते आपल्या दोघांचं एकदम होऊ दे.

**बलराज** : ऊं हूं. दोघांचं नाही. तिघांचं!

**विक्रम** : अर्थात! मित्रा आता तू म्हणालास तरी मी तुला मागं राहू देणार नाही. जाई, तू स्वतः वर जाऊन आईला बोलावून आण. प्रियरंजनदासांशी मला काहीच कर्तव्य नाहीये, पण बलराज, निदान दयाळजींना तू बोलावून घे. मला सगळ्यांना सरळ सरळ सांगून, उजळ माथ्यानं या नगराचा निरोप घ्यायचाय.

[जाई आत जाते. बलराज बाहेर जातो. मग—]

(सभोवार पाहात...स्वतःशीच)

नमस्ते पपा, येतो मी आता!
भूतकाळाच्या मगरमिठीतून मुक्त होऊन,
भविष्याच्या पायथ्याशी मी उभा आहे,
एका डगमगत्या वर्तमानाच्या खडकावर.
समोर उभे टाकले आहे एक प्रचंड आव्हान
सरळसोट उभ्या कड्यासारखे!
कधीकाळी तुम्हीही याच डगमगत्या खडकावर उभे होतात.
कपरी कपरीने कडा तोडून वर चढलात,
पण टोकावर पोचल्याचा निःश्वास टाकायपूर्वीच खाली कोसळलात.
कोणी कोणी तुम्हाला हात दिला नाही.
केवड्याचं कणीस समजून तुम्ही हातात घेतलीत एक पिवळी जर्द नागीण
आणि प्रत्येक पावलागणिक निमूटपणे सोसलेत जलाल दंश.
मग उरली फक्त फरपट...अखेरच्या घटकेपर्यंत.
माझ्या ललाटात काय रेखाटले आहे?

चढणीच्या वाटेवर हातात मिळाला हात चंद्रमाधवीचा,
तर क्षितिजावरचा चंद्रही अलगद उतरतो एका हाकेवर.
मग ठेच लागली तरी तोल सुटत नाही,
घाव बसले तरी वाटचाल थांबत नाही,
अवघ्या वेदनाही होतात शीतळ, सौभाग्यसंपन्न!
हाच असेल का माझ्या जगण्याचा हेतू?
हाच असेल का अवघ्या आयुष्याचा अर्थ?

[स्वतःशी विचारात हरवतो. तेवढ्यात दचकून भानावर येतो; कारण त्याच वेळी आतून जाईबरोबर ललितागौरी येते. येताना ती जाईला विचारत असते—"पण हे केव्हा ठरलं?...कोणी ठरवलं...आणि जाणार आहात तरी कुठं?" त्याच वेळी बाहेरून बलराज, प्रियरंजन आणि दयाळ लगबगीने येत असतात. येताना प्रियरंजन म्हणत असतात—"सिली...नॉन्सेन्स! आता बेत कसा रद्द करता येईल? निदान डॉक्टरना विचारल्याशिवाय त्यात काही बदल करता येईल असं मला तरी वाटत नाही." आत येताच विक्रमची मुद्रा पाहून सगळे गप्प होतात. आपोआपच बलराज आणि जाई विक्रमच्या डाव्या-उजव्या बाजूला उभे राहातात, तर दयाळ आणि ललितागौरी यांच्या पाठीशी प्रियरंजनदास उभे राहातात. क्षणार्ध स्तब्धता. मग—]

**विक्रम** : मी बोलणार आहे, आई, तुझ्याशी आणि जाईचे वडील म्हणून दयाळजी तुमच्याशी. इतर, खाल्ल्याघरचे वासे मोजणारे या घडीला तरी माझ्या खिजगणतीत नाहीत. आई, माझी समजूत पटलीय असं नाही...ती कधीच पटायची नाही. तरी पण मी समजून घ्यायचं आणिक जरूर तेवढं पत्करायचं ठरवलंय. आणि एकदा मनानं ठरवल्यावर, रक्ताचं नातं तोडता येत नसलं तरी सहवास संपवता येतो. मग शत्रुत्वही धुमसत ठेवायचं कारण उरत नाही. तेव्हा आई, आपलं भांडण संपलंय. माझ्यापुरतं, माझ्या बाजूनं मी ते संपवलंय. मी तुला पुन्हा 'आई' म्हणून हाक मारलीय, हे तुझ्या लक्षात आलंय ना? मी तुला 'आई' म्हणतोय, कारण पुन्हा आपली भेट होणार नाहीये. आपलं भांडण संपलंय तसंच आपलं नातंही संपलंय. म्हणूनच हा वेडाचा बहाणा चालू ठेवायची मला काही गरज उरली नाहीये.

**ललिता** : (आवेगानं जवळ जात) अरे पण बाळा...विक्रमा—

**विक्रम** : हां ऽ (दूर होत) इथून पुढं आपण परस्थ होणार आहोत; परके तर झालोच आहोत. दयाळजी, वेडाचा बहाणा करून गेल्या काही दिवसांत मी तुम्हाला भरपूर भोसकलंय. तुमची येताजाता मनमुराद खिल्ली उडवलीय. पण मी फेकलेले बाण आणि भाले तुमच्या पाठीशी दडणाऱ्या तुमच्या धन्यावर रोखले होते, हे तुमच्या लक्षात आलं नसलं तरी तुमचा धनी पुरेपूर उमजला आहे. तुम्ही एक इमानी चाकर आहात. पण धनी बदलतो, तशा तुमच्या निष्ठाही बदलतात, ही एक मोठीच

गोम आहे. फेयर इनफ. एरवी मला तुमच्याशी बोलायचं काही कारण नव्हतं, पण मी तुमच्या कन्येशी, या जाईशी आज लग्न करतोय.

**दयाळ :** पण छोटेसाहेब—

**विक्रम :** छे छे, मी तुमची परवानगी वगैरे काही मागत नाहीये. कार्य सिद्धीस नेण्यास मी आणिक श्री, समर्थ आहोत. कधी काळी धनी बदलावासा वाटला, तर तुमच्या लेकीच्या चाकरीत जरूर या. सुस्वागतम्....तुम्ही आणिक तुमचे धनी, यांनी मला ठार वेडा ठरवून, जन्मभर दूर देशातल्या इस्पितळात, पोलादी पडद्याआड डांबून ठेवण्याचा व्यूह मोठ्या हुशारीनं रचला होता; पण मी तो उध्वस्त करून टाकलाय. तरी पण तुम्हाला वा तुमच्या धन्याला घाम फुटण्याची मुळींच गरज नाहीये. मी हे घरदार, धनदौलत सगळं सगळं सोडून एका वस्त्रानिशी राजेंद्रनगर सोडून जातोय. अगदी राजीखुशीनं, अक्कलहुशारीनं, नशापाणी न करता माझे सगळे जन्मसिद्ध हक्क सोडून जातोय. बरोबर नेणार आहे माझ्या जीवनाला अर्थ देणारी ही दोन हिऱ्या-सारखी माणसं. माझी जाई आणि माझा जिवलग मित्र बलराज.

**दयाळ :** छोटेसाहेब, आपण चूक करताहात. या अवस्थेत आपण एकटे जाण्याचं धाडस करू नये. जवळ पैशाचं आणि माणसाचं पाठबळ असल्याशिवाय या दुनियेत कोणाची धडगत लागत नाही आजकाल.

**प्रियरंजन :** कशाला अडवताय त्याला दयाळजी? जायचं म्हणतोय तर खुशाल जाऊ दे. जन्मभर छायेखाली वाढलेल्या या पाडसाला जरा दुनियादारीच्या कडत झळांची तर झलक अनुभवू देत!

**विक्रम :** दयाळजी, बायकोच्या वशिल्यावर आजच्या सिंहासनावर बसलेला हा कालचा कृतघ्न आश्रित, बराच वाचाळ झालेला दिसतोय! त्याला सांगा की माझे वडील शिव-शंकर राजेंद्र, कधी काळी त्यांच्या पित्याच्या भिक्षुकी घरातून नशीब काढण्यासाठी असेच एकाकी आणि निष्कांचन अवस्थेत बाहेर पडले होते. माझ्या आईच्या पोटी मी उपजलो असलो तरी या देहातलं रक्त माझ्या वडिलांचं आहे. ते रक्तच मला माझ्या भवितव्याचं शिल्प घडवायला शिकवील. डोन्ट यू वरी अबाउट मी. अखेर या महासागरात मी स्वतःला झोकून देतोय. असलो एक अस्सल लाकूड तर तरंगेन आणि घडलो असलो पथ्थराचाच तर बुडेन...नव्हे, बुडायलाच हवा, नव्हे काय? (हसतो.) चल जाई, चल बलराज, जाऊ या आपण.

[दोघांचे हात हातात घेऊन जाऊ लागतो, तेवढ्यात—]

**ललिता :** (आवेगानं) थांब बाळा...जाऊ नकोस...इथं राहून तू हवं ते कर. तुला कोणी कशाची आडकाठी करणार नाही. मी तुला शब्द देते. अरे त्यासाठी हे आपलं घर तुला सोडायलाच हवं का?

**विक्रम :** (थबकतो. वळून) होय. हे—हे शापित, भ्रष्ट आणि पित्याच्या तळतळाटानं

डागळलेलं घर मला सोडायलाच हवं. भले उभा जन्म मला रानावनात, वनवासात, उपाशीतापाशी झोपडीत घालवावा लागेल. भले या ललितमहालात ओघळणारं कोणतंही वैभव तिथं नसेलही. पण या इथल्या वैभवाला आडवा-उभा चिरणारा तो शापही तिथं कधी ऐकावा लागणार नाही!

ललिता : (किंचाळते) प्रियरंजन—

[ललितागौरी कोसळते. प्रियरंजन तिला सावरतात. पण त्यापूर्वीच विक्रम, जाई आणि बलराज पाठ फिरवून निघून गेलेले असतात. त्याच वेळी—पडदा.]

## अंक पहिला समाप्त

गोम आहे. फेयर इनफ. एरवी मला तुमच्याशी बोलायचं काही कारण नव्हतं, पण मी तुमच्या कन्येशी, या जाईशी आज लग्न करतोय.

दयाळ : पण छोटेसाहेब—

विक्रम : छे छे, मी तुमची परवानगी वगैरे काही मागत नाहीये. कार्य सिद्धीस नेण्यास मी आणिक श्री, समर्थ आहोत. कधी काळी धनी बदलावासा वाटला, तर तुमच्या लेकीच्या चाकरीत जरूर या. सुस्वागतम्....तुम्ही आणिक तुमचे धनी, यांनी मला ठार वेडा ठरवून, जन्मभर दूर देशातल्या इस्पितळात, पोलादी पडद्याआड डांबून ठेवण्याचा व्यूह मोठ्या हुशारीनं रचला होता; पण मी तो उध्वस्त करून टाकलाय. तरी पण तुम्हाला वा तुमच्या धन्याला घाम फुटण्याची मुळीच गरज नाहीये. मी हे घरदार, धनदौलत सगळं सगळं सोडून एका वस्त्रानिशी राजेंद्रनगर सोडून जातोय. अगदी राजीखुशीनं, अक्कलहुशारीनं, नशापाणी न करता माझे सगळे जन्मसिद्ध हक्क सोडून जातोय. बरोबर नेणार आहे माझ्या जीवनाला अर्थ देणारी ही दोन हिऱ्यासारखी माणसं. माझी जाई आणि माझा जिवलग मित्र बलराज.

दयाळ : छोटेसाहेब, आपण चूक करताहात. या अवस्थेत आपण एकटे जाण्याचं धाडस करू नये. जवळ पैशाचं आणि माणसाचं पाठबळ असल्याशिवाय या दुनियेत कोणाची धडगत लागत नाही आजकाल.

प्रियरंजन : कशाला अडवताय त्याला दयाळजी? जायचं म्हणतोय तर खुशाल जाऊ दे. जन्मभर छायेखाली वाढलेल्या या पाडसाला जरा दुनियादारीच्या कडत झळांची तर झलक अनुभवू देत!

विक्रम : दयाळजी, बायकोच्या वशिल्यावर आजच्या सिंहासनावर बसलेला हा कालचा कृतघ्न आश्रित, बराच वाचाळ झालेला दिसतोय! त्याला सांगा की माझे वडील शिवशंकर राजेंद्र, कधी काळी त्यांच्या पित्याच्या भिक्षुकी घरातून नशीब काढण्यासाठी असेच एकाकी आणि निष्कांचन अवस्थेत बाहेर पडले होते. माझ्या आईच्या पोटी मी उपजलो असलो तरी या देहातलं रक्त माझ्या वडिलांचं आहे. ते रक्तच मला माझ्या भवितव्याचं शिल्प घडवायला शिकवील. डोन्ट यू वरी अबाउट मी. अखेर या महासागरात मी स्वतःला झोकून देतोय. असलो एक अस्सल लाकूड तर तरंगेन आणि घडलो असलो पत्थराचाच तर बुडेन...नव्हे, बुडायलाच हवा, नव्हे काय? (हसतो.) चल जाई, चल बलराज, जाऊ या आपण.

[दोघांचे हात हातात घेऊन जाऊ लागतो, तेवढ्यात—]

ललिता : (आवेगानं) थांब बाळा...जाऊ नकोस...इथं राहून तू हवं ते कर. तुला कोणी कशाची आडकाठी करणार नाही. मी तुला शब्द देते. अरे त्यासाठी हे आपलं घर तुला सोडायलाच हवं का?


विक्रम : (थबकतो. वळून) होय. हे—हे शापित, भ्रष्ट आणि पित्याच्या तळतळाटानं

डागळलेलं घर मला सोडायलाच हवं. भले उभा जन्म मला रानावनात, वनवासात, उपाशीतापाशी झोपडीत घालवावा लागेल. भले या ललितमहालात ओघळणारं कोणतंही वैभव तिथं नसेलही. पण या इथल्या वैभवाला आडवा-उभा चिरणारा तो शापही तिथं कधी ऐकावा लागणार नाही!

ललिता : (किंचाळते) प्रियरंजन—

[ललितागौरी कोसळते. प्रियरंजन तिला सावरतात. पण त्यापूर्वीच विक्रम, जाई आणि बलराज पाठ फिरवून निघून गेलेले असतात. त्याच वेळी—पडदा.]

## अंक पहिला समाप्त



# अंक दूसरा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १९०७१८ नों. दि. ............
वि. ......आरठ्व......... क्र. ६।५।६३



## प्रवेश पहिला

[मागील अंकातील घडामोडींनंतर सुमारे चौदापंधरा वर्षांचा काळ उलटला आहे. या कालावधीत बरेच काही घडले आहे. 'विक्रम इंडस्ट्रीज' स्थापन होऊन या चौदा वर्षांत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत तिने बऱ्यापैकी बाळसे धरले आहे. कारखान्याचे प्रमुख भागीदार विक्रम, जाई आणि बलराज. बलराज अविवाहित आहे, पण त्याच्या घरी त्याने आपला पुतण्या उदय याचा प्रतिपाळ मुलासारखा केलाय. हा उदय विशीत असून कारखान्यात काम करू लागला आहे. विक्रम-जाई यांचं लग्न तर झालंच आहे, पण उभयतांना 'रूपाली' ही एकुलती एक मुलगी आहे. रूपाली नावाप्रमाणेच रूपसुंदर, तेरा वर्षांची, चमक्दार अल्लड किशोरी. विक्रमची विशेष लाडकी. विक्रमने या कालावधीत बांधलेल्या बंगल्याचे नाव सुद्धा 'रूपव्हिला' ठेवले आहे. या कालावधीत घडलेली आणखी एक घटना म्हणजे जाईचे वडील दयाळजी राजेंद्रनगरातील चाकरी सोडून विक्रमचे चिटणीस म्हणून रुजू झाले आहेत.

पडदा वर जातो तेव्हा समोर दिसतो 'रूपव्हिला'तील दर्शनी हॉल. सजावट अर्थातच राजेंद्रनगरातील ललितमहालमधल्या सजावटीशी स्पर्धा करणारी आणि स्पर्धा जिंकणारी-देखील. दुपारचे बारा वाजून गेले आहेत. हॉलमधे कोणीही नाही. क्षणार्धात बाहेर मोटार येऊन थांबल्याचा आवाज. तशी नोकर बाळाराम लगबगीने आतून येऊन ट्रेमधे ताजे टपाल जुळवून ठेवतो व दाराशी अदबीनं उभा राहातो. क्षणभरातच बाहेरून बोलत येतात जाई आणि दयाळजी. जाईच्या मस्तकावरील काही बटा पांढुरक्या झाल्या असल्या तरी ती काही आता पूर्वीसारखी साधीभोळी, भित्री-भाबडी राहिलेली नाही. वयाबरोबरच नव्हे, तर अधिकाराबरोबर चालण्याबोलण्यातली तिची ऐट, तिचा आत्मविश्वास, जिद्द, महत्त्वाकांक्षा यांची छाप प्रथमदर्शनीच कोणावरही पडते. दयाळजींचे मस्तक शुभ्र झालेले आहे, पण नव्या धनी-धनिणीपुढे वागण्याबोलण्यातली अदब मात्र पूर्वीचीच आहे. आत येता येता जाई—]

जाई : (प्रवेशत वैतागानं) प्रत्येक वेळेला आम्ही पड खायची...प्रत्येक वेळी "जाऊ दे ...भांडण नको" म्हणून आम्हीच माघार घ्यायची. प्रत्येक वेळी नुकसान सोसून त्यांच्या पदरात घबाड टाकायचं—हे का म्हणून? कशासाठी? आम्ही काय मिंधे आहोत का कोणाचे?

दयाळ : मी तेच म्हणत होतो बेटी. हे—हे आता फार झालं. फारच झालं.

जाई : (पर्स कोचावर भिरकावीत) आय ॲम फेड अप् वुइथ इट्. ॲबसोल्यूटली डिस्गस्टेड! वायरमन कंपनीचे एक्झिक्यूटिव्हज् इथं येतात. कोलॅबोरेशन्च्या टर्म्स ॲंड कंडिशन्स ठरतात आणि मग कुठून तरी किल्ली फिरल्याबरोबर—

दयाळ : कुठून तरी म्हणू नकोस. किल्ली फिरलीय राजेंद्रनगरातून.

जाई : आम्ही बरबाद होऊन धुळीला मिळावं, यातच आनंद होणार आहे का आईंना? तसं असेल तर—

दयाळ : मला तसं वाटत नाही जाई. कोणती आई आपल्या लेकराबद्दल अशी अमंगळ इच्छा करील? पण 'आईंना' तो विचारतोय कुठं? त्याचे सगळे डावपेच अगदी परस्पर चाललेत. विक्रमजींनीच त्याला एकदा धडा शिकवायला हवा.

जाई : यांच्याच मनाचा मला अजून पुरता थांग लागलेला नाही. एकदा म्हणतात, 'मला त्यांचं काहीएक नकोय'. तर पुन्हा म्हणतात, 'आहे ते सगळं माझंच आहे. आज ना उद्या मी ते कब्जात घेतल्याशिवाय राहाणार नाही'. यांनी ठामपणे मनावर घेतलं तर त्या मेल्याला धडा शिकवायला उशीर लागणार आहे का? (टीपॉयवरील टपाल फोडीत भराभर नजर फिरवीत, पेननं त्यावर नोंदी करीत पत्रं परत ट्रेमधे विभागून ठेवू लागते.)

दयाळ : आज चौदा वर्षं, म्हणजे विक्रम इंडस्ट्रीज स्थापन झाल्यापासून हेच चाललंय. म्हणजे त्यांनी अडचणी निर्माण करायच्या आणि आम्ही त्यातून मार्ग काढीत बसायचं. अरे स्पर्धाच करायची तर उघड उघड सामना द्या की! तिथं एक्स्पोर्टमधे दरवर्षी मार खाताहेत. आता तर काय, गेले सहा महिने राजेंद्रनगरात संपच चाललाय. तो डॉ. कृष्णा नाईक, हात धुवून मागं लागलाय प्रियरंजनदासांच्या.

जाई : (वाचता वाचता) बाळाराम, फोन आले होते का रे कोणाचे?

बाळाराम : नाही बाईसाहेब.

दयाळ : मी म्हणतो, त्यांच्या मालकीचं आहे ते तुम्ही नका घेऊ, पण थोरल्या साहेबांच्या वुईलप्रमाणे राजेंद्र उद्योगसमूहाचे जे शेअर्स विक्रमजींना मिळायला हवेत—

जाई : (वाचता वाचता, ताडकन् वर पाहात) हे मला कशाला सांगताय बाबा? त्यांना सांगा त्यांना...स्वारींना! (पुन्हा वाचू लागते.)

दयाळ : मी सांगून माझं ते कसं ऐकतील जाई?

जाई : आणि माझं तरी ऐकणार आहेत असं वाटतं तुम्हाला? विषय काढताच, मनात काहीही असलं तरी मला मात्र टणकावतात—'तुझ्यासाठी गेल्या चौदा वर्षांत जिवाचं

रान करून मी एक राज्य उभं केलंय; आता साम्राज्याची हाव धरू नकोस.' साम्राज्य मी काय माझ्यासाठी मागतेय? माझी चूल खोळंबलीय का त्यासाठी!

दयाळ : खरं म्हणजे राजेंद्रनगर सोडण्यापूर्वीच 'थोरल्या साहेबांचं मृत्युपत्र दाखवा' म्हणून जरी तुम्ही हट्ट धरला असतात तरी—

जाई : त्या वेळची परिस्थिती काय होती बाबा? तुम्ही सुद्धा त्या वेळी त्यांच्या चाकरीत होतात. नुसत्या चाकरीत होतात असं नाही, तर यांना उध्वस्त करण्यासाठी प्रियरंजनदासांच्या बरोबरीनं तुम्हीसुद्धा—

दयाळ : हे—हे असं म्हणू नकोस जाई. तू मला जरा समजून घे. मी संधी पाहात होतो—म्हणजे विक्रमजींच्या कर्तबगारीचा अंदाज घेत होतो. तो अंदाज येता क्षणीच, मी ताडकन् त्या नोकरीवर लाथ मारून 'विक्रम इंडस्ट्रीज'कडं आपण होऊन आलो नाही का?

जाई : त्या बाता पुरे झाल्या. तुम्ही आपण होऊन आला नाहीत बाबा, मी तुम्हाला आणलं. दुप्पट पगाराचं आमीष दाखवल्यावर तुम्ही आलात. मलाही डावपेच खेळता येतात हे मी तुम्हाला आणिक प्रियरंजनदासांना दाखवून दिलं. तेव्हा त्या गोष्टी आता आज मलाच सोयीस्करपणे फिरवून सांगू नका. (पुन्हा पत्रांत लक्ष घालते.)

दयाळ : (सुस्कारून) हूं ऽऽ! याचा अर्थ एकच आहे. विक्रमजीच एकदा म्हणाले होते, 'प्रियरंजनदास जिवंत आहेत तोपर्यंत ही डोकेदुखी संपायची नाही की आम्हाला फार मोठी झेप घेता यायची नाही.'

जाई : (मिस्कीलपणे हसून) मग प्रियरंजनदासांना ठार मारण्याची काही योजना आहे का तुमच्या पोतडीत?

दयाळ : मी कशाला मारायला हवा? तोच मरेल एक दिवस आपल्या कर्मानं. राजेंद्रनगरमधला संप चिघळलाय. डॉ. कृष्णा नाईकच्या युनियनमधल्या बिथरलेल्या कामगारांनी त्याला खलास करायचा विडा उचललाय...असं आपलं ऐकतोय होऽ.

जाई : (वाचता वाचता) त्यात काही तथ्य नाही. असली दुष्ट उपद्रवी माणसंच भुईला नाक टेकेपर्यंत जगतात.

दयाळ : तथ्य अगदीच नाही असं म्हणू नकोस. रुद्रेश्वर ज्योतिषी काय काय सांगत होते ते ऐकलं आहेस ना तू?

जाई : पुरे झालं तुमच्या त्या कुडबुड्या रुद्रेश्वर ज्योतिषाचं भविष्य. तो म्हणत होता की हे चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष होणार म्हणून. प्रत्यक्षात काय घडलं? प्रियरंजनदासांचा पित्या...तो सॉली सकलतवाला प्रचंड बहुमतानं निवडून आला. [तेवढ्यात टेलिफोन खणखणतो.] तेव्हाऽ त्या कुडबुड्या ज्योतिषाचं मला काहीएक सांगू नका. हे चेंबरचे अध्यक्ष झाले नाहीत, आणि होण्याची तिळमात्रही शक्यता नाही. तो फोन

घ्या बरं. यांचा असला तर जेवायसाठी मी वाट बघतेय घरी म्हणून आठवण करून द्या यांना.

**दयाळ :** (रिसीव्हर उचलीत) हॅलोऽऽ...येस येस...मी दयाळ, विक्रमजींचा पर्सनल सेक्रेटरी...हां, गुड आफ्टरनून मॅडम...माफ करा मॅडम...विक्रमजी कारखान्यातून परतले नाहीत अजून...हो हो, बाईसाहेब घरीच आहेत...(रिसीव्हरवर हात ठेवीत) रूपालीच्या शाळेतला फोन आहे जाई...हेडमिस्ट्रेस बोलताहेत...

**जाई :** (दचकून) रूपालीच्या शाळेतला ! कारटीनं पुन्हा काय भानगड करून ठेवलीय आणखी.! (धावून रिसीव्हर घेते आणि) हॅलोऽऽ...मी मिसेस राजेंद्र, रूपालीची आई... बरं...हूं...हूं...हूं...वेणीचा शेपटा कापून टाकला ? कसं शक्य आहे ते ?...हूं... हूं...हूं...कुठं सापडली कात्री ?...हूं...हूं...हूं...पण रूपालीनंच हे केलं असं म्हणायला...तेच म्हणतेय मी...मी चौकशी करते...खिडकीतून बाहेर टाकलेली कात्री केवढी आहे ?...हो हो, म्हणजे शिंप्याच्या कातरकामाचीच की...म्हणजे मुद्दाम कोणी तरी ठरवूनच...हे पाहा, पाठीमागच्या बाकावर रूपाली बसते म्हणून तेवढ्यावरून...त्या सगळ्या मागल्या गोष्टी झाल्या. त्या वेळी अगदी भरपूर शिक्षा झालीय तिला...हूं...हूं...सगळ्या विषयांत ?...प्रोग्रेस बुकवर मी नाही सही केली ...हूं...हूं...तुम्ही प्रोग्रेस बुक घेऊन तिला तावडतोब पाठवा घरी. हो, मी गाडी पाठवतेय...हो हो...उद्या मी स्वतःच येऊन भेटते तुम्हाला...थँक्स...(जडपणानं फोन बंद करीत) बाळाराम, ड्रायव्हरला गाडी घेऊन शाळेतून रूपालीला आणायला सांग. आणि हे पाहा, माडीवर माझ्या खोलीत शिवायचं मशीन ठेवलंय ना, त्याच्या ड्रॉवरमधे शिवणकामाची मोठी कात्री ठेवलीय, ती घेऊन ये. अगदी नवी कोरी आहे बघ...[बाळाराम जातो.] बाबा, रूपालीचं लक्षण काही मला ठीक दिसत नाहीये!

**दयाळ :** काय भानगड झाली ?

**जाई :** मुलं चांगली निघायला आईबापांचं नशीबच चांगलं असावं लागतं. प्रेमानं वागवा, गोडीगुलाबीनं सांगा, नाही तर धाकदपटशा दाखवा...काही उपयोग नाही. ही पोर केव्हातरी माझ्या गळ्याला फास लावणार आहे.

**दयाळ :** अगं पण झालं काय एवढं वैतागायला ? रूपाली भांडली का कोणाशी ?

**जाई :** भांडणतंटा तर रोजचाच आहे. मागच्या महिन्यात बाईच्या अंगावर खाजकुयली टाकण्याचं प्रकरण झालं. आता आज हे. कोणीतरी त्या गरुडांच्या मुलीचा वेणीचा शेपटा मागच्या मागे कातरून टाकलाय म्हणे. गरुडांची मुलगी आठवतेय का तुम्हाला ? परवा रूपालीच्या तेराव्या वाढदिवसादिवशी पार्टीला आली होती बघा. असे गुडघ्याखाली पोचणारे काळेभोर दाट केस आहेत बघा तिचे.

**दयाळ :** आणि ते केस कापून टाकले ? काय दुष्टपणा म्हणायचा तरी.

**जाई :** तर काय ! आणि कात्री खिडकीतून बाहेर ग्राउंडवर टाकलेली सापडली म्हणे.

बाईंचं म्हणणं आहे की रूपालीशिवाय हे दुसरं कोणी करणं शक्य नाही.

दयाळ : असा आरोप करायला पुरावा आहे का त्यांच्याजवळ?

जाई : पुरावा नाहीये म्हणूनच त्या जपून बोलत होत्या. पण मला खात्री वाटत नाहीये तिची.

[तेवढ्यात बाळाराम येतो आणि—]

बाळाराम : बाईसाहेब, कात्री नाहीये तिथं. सगळीकडं शोधलं मी.

जाई : आता शंकाच नको. या कारटीचंच काम हे. दुष्ट—दुष्ट आहे ती. तिची नियतच खराब आहे. आज ती मरेमरेतो माझा मार खाणार...

दयाळ : हे बघ जाई, सगळी शहानिशा झाल्याशिवाय—

जाई : आता कशाकशाची शहानिशा व्हायची राहिलीय बाबा? चार लोकांत अब्रूनं राहाणं कठीण करून टाकलंय या कारटीनं आम्हाला. सहामाही परीक्षेत सगळ्या विषयांत ही नापास झालीय. म्हणून मग घरात प्रोग्रेस बुक दाखवीत नाही. परस्पर माझ्या नाही तर वडिलांच्या खोट्या सह्या केल्या आहेत तिनं प्रगतिपुस्तकावर. ही पोर शाळा चुकवते, पैसे चोरते, चोरून सिनेमाला जाते, घाणेरड्या हॉटेलांत जाऊन चरते, मैत्रिणींच्यात लावालावी करते, भांडते, म्हणून हिच्या थाऱ्यामोऱ्याला कोणी उभं राहात नाही. ही सगळी तेराव्या वर्षापर्यंत तिची कमाई. पुढं काय होणार आहे या मुलीचं?

दयाळ : जाऊ दे...संताप करून घेऊ नकोस जाई...अजून लहान आहे रूपाली...

जाई : हे—हे तुम्ही सगळे लोक असं म्हणता ना, त्यानंच ती शेफारलीय. तिच्या वडिलांना वाटतं की त्रैलोक्यात सुंदर, बुद्धिमान आणि गुणी लेक आहे ती फक्त आपली!

[तेवढ्यात बाहेर मोटार वाजते. "मम्मीऽऽ..." अशी हाक ऐकू येते. तशी जाई कोपऱ्यात ठेवलेली वेताची काठी उचलून टीपॉयवर ठेवते, तशी—]

दयाळ : (गडबडीनं) राग आवर जाई...

जाई : आज तुम्ही कोणी मधे पडलेलं मला खपायचं नाही!

[तेवढ्यात रूपाली "मम्मी...मॉम्स, आमच्या वर्गात आज मज्जाच मजा झाली..." असं म्हणत खदाखदा हसत हसत येते. तशी—]

जाई : (नाराजीनं) एवढं खदखदून हसण्यासारखी कसली मजा झाली?

रूपाली : (हसत) अग आमच्या वर्गातली ती शोभा गरुड गऽऽ, तिची चांगली शोभा झालीय! अग, कोणीतरी तिच्या वेणीचा शेपटाच कापून टाकला. या खुळाबाईला पत्ताच लागला नाही म्हणे.

जाई : तिच्या वेणीचा कोणीतरी दुष्टपणानं शेपटा कापला यात तुला मजा झाली असं वाटतं? उद्या तुझ्या केसांवर कोणी कातरी चालवली तर?

रूपाली : ऊंऽऽ, अशी बरी कोणी कातरी चालवेल! मी तोंडावर ॲसिडच टाकीन त्याच्या!

जाई : (थक्क होत) ॲसिड ? हे कुठं पाहिलंस तू आणखी ?

रूपाली : परवाच्या एका फिल्ममधे पाहिलं होतं की, तो डाकू हिरॉइनला ॲसिड टाकण्याच्या कशा धमक्या देत होता आणि—

जाई : पाहा पाहा बाबा, कोठपर्यंत ही पोचलीय ती ! रूप, पुढल्या बाकावर बसलेल्या शोभाच्या वेणीचा शेपटा कोणी कापला आणि कशानं कापला हे समजलंय मला !

रूपाली : (चरकून) क...कोणी कापला ?

जाई : आपल्या घरातली शिवणकामासाठी परवाच मी आणलेली नवी कोरी कात्री नाहीशी झालीय. आज सकाळी. काल रात्री ती ड्रावरमधे होती. तीच कात्री तुमच्या वर्गाबाहेर खिडकीतून कोणीतरी फेकून दिलेली—

रूपाली : (किंचाळत) खोटं आहे...खोटं आहे...उगीच खोटानाटा आळ घेऊ नकोस तू माझ्यावर. मी...मी...मला काही ठाऊक नाही...माझा काही संबंध नाहीये.

जाई : तुझ्या बाईंचा फोन आला होता मघाशी !

दयाळ : जाई, मला वाटतं, ती कात्री तुझ्या हाती येईपर्यंत तरी तू—

जाई : बाबा, तुम्ही यात पडू नका ! सहामाही परीक्षेत तुला किती मार्क मिळालेत ?

रूपाली : मी...मी पास झालेय सगळ्या विषयांत.

जाई : असं ! तुझं प्रोग्रेस बुक कुठाय ?

रूपाली : ते मिळालं नाही अजून मला.

जाई : (रागानं) होय का ? (तिचं दप्तर हिसकून घेत) बघू—बघू या तरी—[रूपाली "माझ्या दप्तराला हात लावायचा नाही कोणी !" ओरडत जाईशी झोंबत असतानाच ती दप्तर पालथे करते व त्यातले 'प्रोग्रेस बुक' बाहेर काढते आणि दरडावते—] मुकाट्यानं बाजूला हो आता. खोटारडी ! (उघडून पाहात) या मार्कांत खोडाखोड कोणी केली ? तुझ्या बाईंनी, नाही का ? आणि डॅडींच्या सह्या कोणी केल्या ?

रूपाली : (चाचरत) ड... डॅडींनीच तर...

जाई : खोटं बोलायला शरम नाही वाटत तुला ? गेल्या महिन्यात डॅडी भारतात तरी होते ? सह्या तू केल्यास. डॅडींची सही गिरवून...कोणी शिकवले तुला हे धंदे ? (छडी घेऊन अंगावर धावून जाते.)

रूपाली : मारू नकोस...मारू नकोस मला मम्मीऽऽ

जाई : (किंचाळत) थांब, आज तुला जन्माची अद्दल घडवते मी !

[छडीने सप् सप् असे दोन फटके मारते तोच "हां हां...हे काय ? हे काय जाई ?" असे ओरडत बाहेरून येत असलेला विक्रम धावून जाईच्या हातातली छडी काढून घेतो आणि दूर फेकून देतो. रूपाली गळा काढून रडत "डॅडी...डॅडीऽऽ मी काही सुद्धा केलं नाही हो..." म्हणत विक्रमला मिठी मारते. विक्रम तिला जवळ घेत थोपटत..."नाही नाही रूप, बेटी तुला कोण्णी कधी मारणार नाही बरं. उगा उगा...रडू

नको..." असे समजावू लागतो. विक्रमच्या पाठोपाठ बलराज आणि वीस वर्षांचा तरुण उदय आत येतो. ते दोघेही भांबावून बघतच राहातात.]

विक्रम : उदय, ही छडी अगोदर बंगल्याच्या बाहेर भिरकावून दे.

[उदय छडी घेऊन जाऊ लागतो तोच—]

जाई : रूप माझीही मुलगीच आहे. तिला एवढ्यातेवढ्यासाठी मारहाण करायला मला खूळ नाही लागलेलं. प्रकार काय घडलाय तो तुम्ही समजून घेणार आहात का?

विक्रम : (उदयला) तू जा उदय. [उदय जातो व छडी टाकून परत येऊन उभा राहतो. दरम्यान] प्रकार काही घडला असला तरी गुरासारखं मुलांना झोडपून काढणं मला मंजूर नाही. अजाण, भाबड्या लहान मुलीबाबत तर ते अक्षम्य आहे.

जाई : तुमची मुलगी लहान नाही, अजाण नाही आणि भाबडी तर नाहीच नाही! ती लबाड आहे, दुष्ट आहे आणि तिचे तुम्ही असेच लाड चालवलेत तर—

विक्रम : काय बोलतेस तू हे जाई? तिला लबाड आणि दुष्ट ठरवायला तिनं काय असा कोणाचा अपराध केलाय?

जाई : विचारा—विचारा तिलाच! वर्गामधे पुढल्या बाकावर बसणाऱ्या एका मुलीचा वेणीचा शेपटा कापून टाकलाय आज तिनं.

रूपाली : (रडत) नाही हो डॅडी...मी काहीसुद्धा केलं नाही...ममी उगाचच माझ्यावर आळ घेतेय...

जाई : उगीचच आळ घेतेय मी? शिवणकामाची माझी कात्री तू आज शाळेत घेऊन गेली नव्हतीस?

रूपाली : नाही नाही...मुळ्ळीच नाही...मी पाहिलीसुद्धा नाही ती कात्री.

जाई : खोटं बोलू नकोस रूप...मग कात्री काय झाली? तुझ्या शाळेत खिडकीबाहेर जाऊन कशी पडली ती कात्री?

विक्रम : वेट, वेऽट...हिनं त्या मुलीच्या वेणीचा शेपटा कापताना कोणी पाहिलंय का डोळ्यानं? काही पुरावा आहे का त्याबद्दल?

जाई : अहो ती कात्री—

विक्रम : तू तरी डोळ्यांनी पाहिली आहेस का? आणि कात्रीसारखी दुसरी कात्री असू शकते. तेवढ्यावरून—

जाई : मागल्या वेळी ते खाजकुयलीचं प्रकरण—

विक्रम : त्याची चौकशी केलीय मी सगळी. कोणीतरी हिला भरीला घातलं आणि हिनं ती पूड टाकली बाईंच्या अंगावर.

रूपाली : (भाबड्या मुद्रेनं) डॅडी, ती पूड कसली होती हे मला ठाऊक सुद्धा नव्हतं...

जाई : अहो हा प्रोग्रेस रिपोर्ट पाहा हिचा. सगळ्या विषयांत ही नापास तर झालीच आहे, पण हिनं मार्कांची खाडाखोड केलीय आणि तुमची सही गिरवून—

विक्रम : त्याला सुद्धा तू जबाबदार आहेस जाई. अष्टौप्रहर मुलीला छडीच्या धाकात ठेवायला लागलं की ती लबाडी करणारच.

जाई : (दुखावून) ठीक आहे, मला नाही तिचा संभाळ करता येत. तुम्हीच तिला संभाळा यापुढं. उद्या तिच्या शाळेत तिला घेऊन जा आणि तुम्हीच निस्तरा ते प्रकरण!

विक्रम : तू गप्प राहिलीस तर मी सगळं काही निस्तरीन. निस्तरायलाच हवं. अगं आपली मुलगी आहे रूपाली. चुकलंमाकलं तरी तिला संभाळूनच घ्यायला हवं. तिला रस्त्यावर फेकून द्यायचंय का?

जाई : ते मलाही कळतंय. पण—

बलराज : (पुढं होत) ड्रॉप दॅट सब्जेक्ट. या गोष्टीवर या मुलीसमोर चर्चा करू नका. विक्रम, उदयला आणि मला आजचा आनंद साजरा करण्यासाठी घरी जेवायला बोलावून आणलं आहेस ना?

जाई : आनंद? कसला आनंद?

बलराज : कसला आनंद म्हणून काय विचारतेस? ए ग्रेट डे फॉर विक्रम इंडस्ट्रीज! विक्रम चेंबर ऑफ कॉमर्सचा अध्यक्ष झालाय. मघाशीच टेलिग्रॅम आलाय.

जाई : हे? चेंबरचे अध्यक्ष? कसं शक्य आहे?

दयाळ : आणि सॉली सकलतवाला?

बलराज : त्यांना पॅरॅलिसिस्चा ॲटॅक आला म्हणून त्यांनी राजीनामा दिलाय. म्हणून मग एक्झिक्यूटिव्हनं एकमतानं—

जाई : पण हे कसं झालं? प्रियरंजनदासांनी—

विक्रम : —भरपूर कारवाया केल्या. खूप आदळआपट केली. पण ते स्वतःच एक्स्पोज झाले. राजेंद्रनगरमधला संप त्यांना भोवला बलराज.

बलराज : अरे तुम्ही काही लोकांना काही काळ फसवू शकाल; पण म्हणून सगळ्यांना सर्वकाळ फसवू शकाल काय? शेवटी बाजी उलटली.

विक्रम : बाजी उलटली म्हणजे इतकी उलटली जाई, अनदर गुड न्यूज फॉर यू, वायमर कंपनीच्या प्रेसिडेंटशी फोनवरून बोललो आज मी. एक चान्स घ्यावा म्हणून. तिथंही प्रियरंजनदास एक्स्पोज झाले. त्याला मुळी मधला प्रकार ठाऊक नव्हता.

बलराज : फोन चालू असताना जी. एम्. ला बोलावून सणसणीत झापला त्यांनी.

दयाळ : नेट रिझल्ट काय?

बलराज : कोलॅबोरेशनचा करार करायला पुढल्या आठवड्यात जर्मनीला बोलावलंय त्यांनी.

विक्रम : ते काम झालंय म्हणून समजून चला तुम्ही!

दयाळ : मला वाटतं, विक्रमजींचे ग्रहयोगच बदलले असावेत.

जाई : (हर्षभरानं) फॅंटॅस्टिक! म्हणजे तुम्ही आता तीन वर्षांसाठी—

**विक्रम** : तीन नाही, पाच वर्षं मी चेंबरचा प्रेसिडेंट राहाणार आहे.

**जाई** : (हस्तांदोलन करीत) कॉंग्रेच्युलेशन्स! माझं एक स्वप्न आज साकार झालं. किती आनंद झालाय म्हणून सांगू मला! आता असेच तुम्ही थोडे डावपेच लढवलेत तर राजेंद्र उद्योगसमूहाचा कारभार देखील आपल्याकडं—

**विक्रम** : सबूर, सबूर...ते इतकं सोपं नाहीये जाई. माझ्या हक्काचे शेअर्स मागितले आणि मिळवले तरी तेवढ्यानं भागणार नाही. बाकीचे शेअर-होल्डर्स आहेत, आणि प्रियरंजनदासांची त्यांच्यावर पक्की पकड आहे. अजून तरी.

**दयाळ** : तीही सुटायला लागलीय विक्रमजी!

**विक्रम** : म्हणूनच वाट पाहायला हवी आपल्याला. कदाचित—(थबकतो.)

**जाई** : बाबा, रुद्रेश्वर ज्योतिषाचं पहिलं भविष्य खरं झालं की!

**दयाळ** : तसं दुसरंही खरं होईल एक दिवस!

**बलराज** : दुसरं भविष्य काय वर्तवलं होतं त्यानं?

**दयाळ** : प्रियरंजनदासांच्या ग्रहयोगात अपघाती मरण आहे; आणि त्यानंतर राजेंद्र उद्योगसमूह—

**बलराज** : छे, छे त्यात काही अर्थ नाही. हे आहे एवढं आपलं राज्य आपल्याला पुरेसं आहे. आपण तृप्त आहोत.

**जाई** : तिथं आपले मतभेद आहेत बलराज!

**विक्रम** : तू आहेस ब्रह्मचारी बाबा, तुला तृप्त व्हायला काय जातंय?

**बलराज** : आणि तुझ्यामागं पाचदहा पोरांचा लबेदा थोडाच आहे?

**जाई** : हा नुसता पैशाचा सवाल नाहीये बलराज. भारतात उद्योगपतींची जी थोडी घराणी आहेत, त्यांत यांचं नाव—

**बलराज** : पुरे पुरे बाईसाहेब, एकदम रॉकेटवरून उड्डाण करू नका! मिळालंय तेवढ्यावर आमचं तोंड गोड करणार आहेस की नाही आज? का थंडा फराळच—

**जाई** : अगबाई! नादात विसरलेच मी. अहो, मला फोन करून थोडं आधी कळवायचंत तरी? आता—

**रूपाली** : आंबरसाचे डबे फोडू का ममी?

**विक्रम** : दॅटस् लाइक अ गुड गर्ल! [तिला शाबासकी देतो. रूपाली आत पळते.]

**जाई** : पाच मिनिटांत निरोप पाठवते तुम्हाला. (आत जाते.)

**विक्रम** : बघ कशी किचन्‌कडं धावली रूप. सच अ फाइन गर्ल...

**बलराज** : तिच्याकडं लक्ष द्यायला हवं विक्रम. एम्टी माइंड इज डेव्हिल्स वर्कशॉप! या वयात तिला अभ्यासात आणि खेळात बुडवून टाकायला हवं.

**विक्रम** : हो, पण ते कोण करणार? आम्ही दोघंही किती गुरफटून गेलो आहो कारखान्यात—

**बलराज** : दॅटस् नो एक्स्क्यूज. उदय हे काम तुला अंगावर घेता येईल. सकाळ-संध्याकाळ तू मोकळाच असतोस. सकाळी तिचा अभ्यास करून घ्यायचा आणि संध्याकाळी—

**उदय** : जिमखान्यात टेबल टेनिस...असंच ना ? डन्.

**विक्रम** : ए बाबा, मात्र छडीबिडी वापरायची नाही हो.

**बलराज** : तो कसचा छडी वापरतोय ? गुरकावून बोलायचं सुद्धा त्याला जमत नाही. फार गोड वागून तिला डोक्यावर बसवून घेऊ नकोस हं ! [उदय स्मित करतो.]

**विक्रम** : बलराज, आता चेंबरच्या सदस्यांना एक थाटाची मेजवानी द्यायला हवी आपल्याला. मला वाटतं, ताजमहालमधे—

**बलराज** : ताज कशाला ? इथं तुझ्या या रूपव्हिलात लॉन पार्टी देऊ या एखाद्या सायंकाळी.

**विक्रम** : इथं नको. एरवी माझी काही हरकत नव्हती; पण इथं मला तो यायला नकोय !

**बलराज** : प्रियरंजनदास ?

**विक्रम** : होय. आई आली एक वेळ तरी चालेल; पण तो मात्र इथं मुळीच येता कामा नये !

**बलराज** : अरे बाबा, आता तू चेंबरचा अध्यक्ष झाला आहेस !

**विक्रम** : चेंबरचा अध्यक्ष म्हणून राजेंद्रनगरातला संप मिटवण्यासाठी मी पुढाकार घ्यायचं ठरवलंय, पण—

**दयाळ** : संप मिटवायचं आपल्या हातात का आहे ? मान्यताप्राप्त युनियन लिडर्स-बरोबर वाटाघाटी केल्या तर बहुसंख्य कामगार ऐकणार नाहीत. त्यांना वाटाघाटी व्हायला हव्यात डॉ. कृष्णा नाईकशी, आणि डॉ. कृष्णा नाईक हे काय प्रस्थ आहे ते तुम्ही जाणता !

**बलराज** : कधीतरी हा भस्मासूर गाडून टाकलाच पाहिजे विक्रम, नाही तर एक दिवस तो आपल्याही टाळक्यावर हात ठेवील !

**विक्रम** : हूंऽ. राजेंद्रनगरात त्यानं बरीच दहशत बसवलीय, नाही ?

**दयाळ** : दहशत ? खून पाडलेत खून. अगदी राजरोस. दिवसाढवळ्या.

**विक्रम** : डॉ. कृष्णा नाईकचा कामगारांवरला प्रभाव कमी करायलाच हवा. पण ती ही वेळ नाहीये. पहिल्यांदा हा संप मिटायला हवा. जरूर तर कृष्णा नाईकशी वाटाघाटी करून.

**दयाळ** : पण ते कसं शक्य आहे ? प्रियरंजनदास मॅनेजिंग डायरेक्टर आहेत तोपर्यंत ते तसूभरही माघार घेणार नाहीत.

**विक्रम** : हूंऽ, बघू या. (विचारात पडत) दयाळजी, चेंबरच्या अध्यक्षपदाबद्दल तुमच्या रुद्रेश्वर ज्योतिषाचं भविष्य असं अकल्पित रीतीनं खरं होईल असं वाटलं नव्हतं, नाही ?

**दयाळ** : तुम्ही काहीही म्हणा, पण त्याला काहीतरी सिद्धी प्राप्त आहेत. त्याचं प्रत्येक भविष्य खरं ठरत आलंय.

**विक्रम** : अजून इथंच आहे का त्यांचा मुक्काम?

**दयाळ** : हो, इथंच आहेत.

**विक्रम** : त्यांना काहीतरी खास बक्षीस द्यायला हवं.

**दयाळ** : मग बंगल्यावर घेऊन येऊ का त्यांना?

**विक्रम** : हूं. पण बंगल्यावर नको. ऑफिसमधे माझ्या केबिनमधे घेऊन या. मला आणखीही काही विचारायचंय त्याला.

**बलराज** : आणखी काय विचारणार आहेस? प्रियरंजनदास कधी आणि कसे मरणार आहेत याबद्दल?

**विक्रम** : (चकारून) छे छे...त...त...त्याचा माझ्याशी काय संबंध? म...मी म्हणत होतो...आपलं जनरल...म्हणजे असंच इतर काही...म्हणजे रूपबद्दल...

**बलराज** : (रोखून पाहात) मित्रा, एक विसरू नकोस : वाईज मेन रूल देयर स्टार्स; फूल्स ओबे देम्!

**विक्रम** : मी काय म्हणतोय ते नीट समजावून घे बलराज. मला...मला...आज एक निनावी पत्र आलंय. राजेंद्रनगरमधल्या एका कामगाराचं. डॉ. कृष्णा नाईकचा हस्तक असावा तो. आय ॲम अफ्रेड, प्रियरंजनदासांचा जीव धोक्यात आहे.

**बलराज** : काय लिहिलंय काय त्यानं पत्रात?

**विक्रम** : (विचारात पडत) तसं म्हणजेऽऽ...प्रियरंजनदास ठार झाले आणि राजेंद्र उद्योगसमूह आपल्याकडं आला तर डॉ. कृष्णा नाईकशी वाटाघाटी करण्याबद्दल आपलं धोरण काय राहील—ते विचारलंय त्यानं. आणिक—(थबकतो.)

**बलराज** : आणिक काय?

**विक्रम** : आणिक काही नाही.

**बलराज** : ते पत्र तू सरळ पोलिसांना पाठवून दे.

**दयाळ** : पण आपल्याला त्याच्याशी काय कर्तव्य आहे? त्यांचं ते बघून घेतील. त्यांनी कुठं कधी चांगूलपणा दाखवलाय आपल्याला?

**विक्रम** : बरोबर आहे. शिवाय डॉ. कृष्णा नाईकशी मला इतक्यात तरी वाकड्यात जायचं नाहीये.

**बलराज** : मग तू काय करायचं ठरवलं आहेस?

**विक्रम** : मी गप्प बसायचं ठरवलंय. समजा—(थबकतो. विचारात पडतो.)

**बलराज** : मग एवढ्या विचारात कसल्या पडला आहेस तू?

**विक्रम** : विचारात म्हणजे...समजा, तसं काही घडलंच तर त्याचे काय काय परिणाम होतील...(भानावर येतं गडबडीनं) म्हणजे तसं काही घडेल असं मी धरून चाललेलो

नाहीये...तसं घडावं अशी मी इच्छाही करीत नाहीये...पण समजाऽऽ...

**बलराज** : समजायची गरज काय विक्रम ? राजेंद्र उद्योगसमूह तुझ्या स्वाधीन होईल, त्या वेळी तुझ्या कर्तबगारीला फक्त आकाशाचीच सीमा उरेल हे सांगायला ज्योतिषी कशाला हवाय ? तरीदेखील मित्रा, माझा एक सल्ला ऐक : भलत्या रोखानं भविष्याचं उदर उकरीत बसू नकोस. मनातल्या मनात सुद्धा.

**विक्रम** : तुला काय सुचवायचंय बलराज ?

**बलराज** : माझ्या मनात एक पाल चुकचुकलीय. तुझ्याच मनातली.

[तेवढ्यात रूपाली येते आणि—]

**रूपाली** : चला चला डॅडी...काका, आजोबा, उदय...बघा तरी मी टेबल डेकोरेशन करून डिशेस कशा लावल्या आहेत ते...

[“चल चल...बघू दे मला...चल रे उदय.” असे म्हणत बलराज जातो. उदय जातो. पाठोपाठ दयाळजी जाता जाता थबकून—]

**दयाळ** : ते पत्र बघायला मिळेल का मला ?

**विक्रम** : (दचकून) पत्र ? हां हां, पत्र...ते पत्र म्हणता होय ? (चाहूल घेत) तुम्हाला सांगायला हरकत नाही. पत्र वगैरे काही नाही. तो कामगार मला भेटायलाच आला होता !

**दयाळ** : वाटलंच मला. मीच पाठवला होता त्याला.

**विक्रम** : तो निर्लज्ज माणूस शहाजोगपणे पैसे मागत होता मला. मी त्याला सांगितलं, ‘म...मला या घोळात पडायचं नाहीये, तू जा आधी इथून !’

**दयाळ** : त्यात तसा घोळ वगैरे काही नाहीये विक्रमजी...नाही, तुम्ही केलंत ते बरोबरच केलंत, पण...

**विक्रम** : मला ते तसलं काही जमायचं नाही...पटायचंही नाही...मला कबूल आहे, कोणीतरी ठार मारण्याच्याच लायकीचा आहे तो चांडाळ...पण मला तरी बुवा तसल्या त्या लफड्यात गुंतायचं नाही. उगाच गाजावाजा करू नका, पण रुद्रेश्वर ज्योतिषाला मात्र न विसरता घेऊन या माझ्या केबिनमधे.

**दयाळ** : तुम्ही कसलीच चिंता करू नका. (जातात.)

**विक्रम** : (थबकून स्वतःशीच)

हे काय चाललंय ?
भविष्याच्या वारुळापाशी मी कशासाठी थबकलोय ?
कोणत्या फण्यावरल्या मण्याने मी दिपाळलो आहे ?
एकच एक भविष्यवाणी या घुमटात पुन्हा पुन्हा का घुमतेय ?
तसं काही घडेल असं मी धरून चाललो नाहीये
तसं काही घडावं अशी मी इच्छाही करीत नाहीये
पण समजाऽऽ...

[तेवढ्यात रूपाली आतून गडबडीनं 'डॅडी...डॅडी' अशी हाक मारीत येते आणि—]

रूपाली : हे हो काय डॅडी? सगळी माणसं तुमच्यासाठी पानावर खोळंबून बसली आहेत, तरी तुम्ही आपले इथंच? चला चला...आधी चला!

[विक्रमच्या हाताला धरून ती घेऊन जात असतानाच—अंधार.]

## अंक दुसरा

[सुमारे सहा महिन्यांचा काळ उलटला आहे. 'रूपव्हिला'तील तोच दर्शनी हॉल. वेळ सकाळी दहा वाजण्याची. एका टीपॉयवर बऱ्याचशा फायलींचा गठ्ठा ठेवला आहे आणि शेजारी एका आसनावर बसून जाई एक एक फाइल उघडून चाळत, त्यावर ठिकठिकाणी नोंदी करते आहे. वरकरणी शांत मुद्रा, पण अंतर्यामी ती प्रचंड अस्वस्थ आणि तंग आहे. दयाळजी फोनमधे बोलताहेत. मधेच ते रिसीव्हरवर हात ठेवून जाईकडे वळून विचारतात—]

दयाळ : प्रेसचे लोक येताहेत. इथंच यायला सांगू ना त्यांना?

जाई : मुलाखतीत यांनी भाग घ्यायचा म्हणजे कॉन्फरन्स इथंच व्हायला हवी.

दयाळ : (फोनमधे) कॉन्फरन्स इथं—रूपव्हिलातच होणार आहे बरं का...ऑफिसमध्ये नाही...हो हो...आणि हे पाहा, प्रेसच्या मंडळींना एक सूचना देऊन ठेवा. आपली खाजगीत बरं का...साहेबांची प्रकृती अजून म्हणावी तितकी बरी नाहीये...हो ना ...प्रियरंजनदासांचं एवढं नाही, पण त्यांच्याबरोबर खुनी हल्ल्यात माताजीसुद्धा ठार झाल्या ना, तो शॉक...नाही, त्या प्रकरणाला चारसहा महिने होत आले तरीही साहेब त्या टेन्शनमधून अजून बाहेर पडू शकत नाहीत...नाही नाही, घरच्या घरी काम पाहायला सुरुवात केलीय त्यांनी...काय करणार? राजेंद्रनगरचा कारभार घ्यावा लागल्यापासून काम चौपट झालंय आणि माणसं तेवढीच, अशी परिस्थिती आहे... बलराज येतीलच इतक्यात राजेंद्रनगरहून...हो, एक दिवसाआड जावंच लागतं त्यांना, मला किंवा मग जाईला....हां...तर मुख्य गोष्ट अशी की मुलाखतीच्या वेळी तुम्ही कोणी साहेबांना त्या खुनी हल्ल्याच्या संदर्भात उगीच इरीटेट करणारे प्रश्न विचारू नका...हां हां...दॅटस् इट...नव्या योजनांबद्दल विचारा, सहा महिने चाललेला राजेंद्रनगरमधला संप कसा मिटला ते विचारा...हूं...हूं...ॲडमिनिस्ट्रेशनच्या बाबतीत विक्रमजी अगदी परफेक्ट आहेत...वडिलांचाच वारसा आलाय त्यांच्याकडं ...अहो एवढा मोठा धक्का बसला त्यांना...अगदी मुळापासून माणूस हादरून गेला, तरी रोजचं रूटीन वर्क आणि प्लॅनिंग यावरची पकड काही सुटली नाही त्यांची...हो

हो...या तुम्ही केव्हाही...आम्ही वाट पाहातो आहोत. ओके...ओऽऽके.
(रिसीव्हर खाली ठेवतात.)

जाई : 'या तुम्ही केव्हाही' म्हणून तुम्ही त्यांना सांगितलंत खरं, पण बलराज परत यायला नको का? त्याच्याशिवाय प्रेसच्या लोकांना तोंड कोण देणार? मला नाही हो ते जमायचं. आणि यांच्याबाबतीत ती रिस्क घ्यायला मी मुळीच तयार नाही.

दयाळ : प्रेसचे लोक आले तर थांबतील वेटिंगरूममधे. आधी चहा-फराळ उरकून घेऊ. आपली सगळी सिद्धता झाली म्हणजे त्यांना बोलावून घेऊ इथं. मग तर झालं?

जाई : (काम करता करता) आजची प्रेस कॉन्फरन्स कशी काय सुरळीत पार पडणार आहे देव जाणे!

दयाळ : कमाल आहे. तुला एवढी कसली धास्ती वाटतेय जाई? अगं ही प्रेस कॉन्फरन्स म्हणजे काही पोलीस एन्क्वायरी नाहीये!

जाई : एक वेळ पोलीसचौकशी परवडली. काय मनात असेल ते सरळ विचारतात तरी. पण हे प्रेसचे लोक म्हणजे गिधाडं आहेत गिधाडं. केवळ सनसनाटी बातमीसाठी टोची मारमारून ते कशातून काय निर्माण करतील—

दयाळ : ते तू माझ्यावर आणि बलराजवर सोपव! तू फक्त साहेबांना सांभाळ. साहेबांनी आपलं तोंड आवरलं...नाही, मी म्हणतो, ते अगदी जरी गप्प बसले, तरी—

जाई : तेच महाकठीण आहे बाबा! पोलीसचौकशीच्या वेळी यांनी आपल्या सगळ्यांना कसा वात आणला होता ते आठवतंय ना तुम्हाला?

दयाळ : वात? मला तर घाम फुटायची पाळी आली होती! खरं म्हणजे मामला अगदी साधा आणि सरळ होता : एका संध्याकाळी राजेंद्रनगरमधला एक कामगार ललितमहालमधे चोरपावलानं घुसतो आणि प्रियरंजनदासांना भोसकून ठार मारतो. ललितागौरी मधे पडल्या म्हणून त्यांचाही तो निकाल लावतो. त्यांच्या किंकाळ्या ऐकून बंदूकधारी गुरखा धावत येतो आणि धडाधड गोळ्या टाकून पळणाऱ्या कामगाराला खलास करतो. बास, सगळं प्रकरण इथं परस्पर संपलं! पोलिसांना अगदी रास्तपणे शंका आली ती युनियन-लिडर डॉ. कृष्णा नाईकची. त्या कामगाराचा आणि डॉ. कृष्णा नाईकचा संबंध जोडण्याच्या खटपटीत होते पोलीसअधिकारी. त्यासाठी चौकशीला आले ते 'रूपव्हिला'वर. कानावर हात ठेवून यांनी मोकळं व्हायचं की नाही? तो कामगार आपल्याला कसा भेटला, मी त्याला कसा आणला, हे सांगून चिखल आपल्याच अंगावर उडवून घ्यायची काय गरज होती यांना? बरं तर बरं, विक्रमर्जांच्याच सांगण्यात संगती राहिली नाही, ते एक मनोरुग्ण आहेत याची खात्री पोलीसअधिकाऱ्यांना परस्पर पटली, म्हणून मी सुटलो!

जाई : तुम्ही सुटलात, पण या बंगल्यातच माझी जन्मठेप सुरू झालीय! सहा महिने झाले या प्रकाराला, पण ते काही म्हटल्या काहीएक विसरायला तयार नाहीत. अक्षरशः

गेल्या सहा महिन्यांत त्यांना एक रात्रसुद्धा निवांतपणे झोप नाही. त्यांना नाही म्हणून मग मला नाही. मरणारे मरून गेले आणि जिवंत मरण आलंय माझ्या वाट्याला! सारखे प्रश्न. सारखी तगमग, तडफड आणिक तळमळत प्रश्न, प्रश्न आणि प्रश्न!

**दयाळ** : पण प्रश्न तरी काय विचारतात विक्रमजी?

**जाई** : 'तो कामगार नेमका मलाच भेटायला कसा आला? दयाळजींचा आणि त्याचा काय संबंध? तो तुला भेटला की नाही? तुझं नि त्याचं काय काय बोलणं झालं? तू त्याला काय दिलंस?'...एक ना दोन. पुन्हा पुन्हा हेच प्रश्न ऐकून कान किटले माझे.

**दयाळ** : मला वाटतं, आईसाहेबांचा खून झाला नसता तर—

**जाई** : ते तुम्ही मला सांगू नका बाबा. लोकांच्यापुढं ते शोकप्रदर्शन ठीक आहे; पण आईचं मरण यांनी एवढं जिवाला लावून घ्यावं असं काय मोठं वात्सल्य, माया-ममता उतू गेली होती? त्या जिवंत होत्या तेव्हा "तिचं या जन्मात कधी मी तोंड बघणार नाही" ही भाषा कोणाची होती? यांचीच ना?

**दयाळ** : (अस्वस्थ सावधपणे) ते जाऊ दे. पण तो तुला भेटून गेला हे तू त्यांना बोलली नाहीस ना कधी?

**जाई** : मला एवढी खुळी समजलात की काय बाबा?

**दयाळ** : तसं नाही...नवराबायको खाजगीत बोलताना कधी कधी सहज जातात बोलून.

**जाई** : खरं म्हणजे मी बोलले असते. न बोलण्यासारखं त्यात काय होतं? तो त्यांना भेटला, तसा मलाही भेटला. सगळं सांगूनही टाकणार होते मी. पण आई ठार झाल्याचं कळल्यावर यांनी जी पलटी खाल्ली तिथं मी हबकलेच. म्हटलं धर्म सांगता सांगता कर्म उभं राहायचं!

**दयाळ** : हळू बोल जाई —

**जाई** : आईचं मरण सोडून द्या. पण खरं सांगा बाबा, प्रियरंजनदास यांना ठार व्हायला काय नको होते? आता हे साम्राज्य मिळालंय त्याचे स्वामी कोण झालेत? मी तर नव्हे?

**दयाळ** : विक्रमजींनी हा विषय आता बंद करून टाकायला हवा.

**जाई** : कानीकपाळी सारखं मी तेच ओरडतेय; पण का त्यांचं मन त्यांना खातंय, ते मला तरी कळेनासं झालंय. (एकदम दचकून उठत दाराकडं पाहात) रूप? रूपालीऽऽ मला ठाऊक आहे तू आडून ऐकते आहेस! (पळालेल्या पावलांचा आवाज) शी इज गोइंग फ्रॉम बॅड टू वर्स. तो उदय इतकं जिवाचं पाणी पाणी करून शिकवतोय—

**दयाळ** : जाई जाई, अगं लहान आहे अजून ती.

**जाई** : बाबा, ती वयानं लहान असली तरी तिची दुष्ट बुद्धी अकाली वयात येतेय. मला धास्ती वाटतेय तिची. [तोच बाहेरून बलराज शीळ घालीत येतो.]

**बलराज** : (खुशीत घब्याळ पाहात) अगदी वेळेवर आलो की नाही जाई? आणि आमचा जीनियस मित्र कुठाय?

**जाई** : मगाशी ते आंघोळीला म्हणून बाथरूममधे गेलेत. शॉवरखाली बसले असतील. हल्ली दिवसातून दोनदोन, तीनतीन वेळा तासंतास बाथरूममधे शॉवरखाली बसतात ते.

**बलराज** : ते समजण्यासारखं आहे. आपण तरी समजून घ्यायलाच हवं. आईच्या मृत्यूचा जबरदस्त धक्का बसलाय त्याला.

**जाई** : जशा काही कोणाच्या आया मरतच नाहीत या जगात!

**बलराज** : विक्रमच्या बाबतीत 'आई' हे एक विश्व होतं जाई.

**जाई** : म्हणूनच इतकी वर्षं सतत तिच्या नावानं तळतळाट चालला होता!

**बलराज** : तो तळतळाट देखील प्रेमाची दुसरी बाजू होती. आईच्या खुनाला कुठंतरी आपण जबाबदार आहोत, हे अपराधशल्य त्याला कुरतडतंय...

**जाई** : पण त्यात सत्याचा अंश तरी आहे का? आपणच आपल्या मनात भुतं निर्माण करायची आणि छळ करायचा. स्वतःचा आणि लोकांचा.

**बलराज** : या अपराधशल्यातून त्याला बाहेर ओढून काढायला हवा जाई. नुसतं चिडून, टीका करून तो ताळ्यावर यायचा नाही. फरगेट इट्. दयाळजी, कॉन्फरन्ससाठी प्रेसचे लोक—

**दयाळ** : येतीलच्च एवढ्यात. मी गेस्टरूममधे त्यांचं स्वागत करतोय. सगळे जमले की इंटरकॉमवरून कळवतो तुम्हाला. या म्हणालात की घेऊन येतो. (जातात.)

**जाई** : राजेंद्रनगरमधल्या कामकाजाचा वृत्तांत काय?

**बलराज** : सांगतो. (हाकारत) बाळाराम... [बाळाराम येतो.] साहेबांना सांग, मी ताबडतोब बोलावलंय म्हणून. [तो जाऊ लागतो तशी—] थांब. तसा तो सरळ सांगून यायचा नाही. सांग त्याला की राजेंद्रनगरमधे फार मोठे प्रश्न निर्माण झालेत; तू लवकर खाली ये.

**जाई** : (थक्क होत) मोठे प्रश्न? म्हणजे बलराज—

**बलराज** : जस्ट वेट जाई. जा बाळाराम, माझा निरोप सांग त्याला. अगदी बाथरूमचं दार ठोठावून सांग त्याला.

[बाळाराम जातो. मग]

**जाई** : (फायली आपटीत) हे—हे काम माझ्या जिवापाड व्हायला लागलंय बलराज.

**बलराज** : (शीळ घालीत, मिस्कीलपणे)

प्राप्त जाहले ते तुजला। तू मागितले जे देवाला.

**जाई** : समजलं! कळलं! खरं काय काय झालंय ते मला तरी सांगशील का बलराज?

**बलराज** : मघाशी मी आमचा जीनियस मित्र कुठाय, असं विचारलेलं आठवतंय ना

तुला? त्यातला 'जीनियस' हा शब्द काही उगीचच वापरला नव्हता मी. अग इथं बसून राजेंद्रनगरमधल्या कारखान्याबाबत, या अशा मनःस्थितीत, त्यानं धोरणविषयक जे निर्णय घेतले, ते एकशे एक टक्के अचूक ठरले. म्हणजे काही बाबतींत माझे अंदाज चुकले, पण—

**जाई** : ते आजारी झाले, वा मनःस्थिती खराब झाली तरी एकदा कामाला लागले की वाघ आहेत वाघ. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या इतरांची फरपट होते.

**बलराज** : एक्झॅक्टली. म्हणून मी असं सुचवतोय की तुम्ही दोघांनी राजेंद्रनगरमधे परत ललितमहालात राहायला जावं. आणि—

**जाई** : आम्ही दोघांनी? राजेंद्रनगरला? ललितमहालात? बाई ग बाई!

**बलराज** : का? त्यात एवढं चमत्कारिक आणि अशक्य काय वाटलं तुला? इथं राहून विक्रम इंडस्ट्रीजकडं मी पाहीन, तुम्ही दोघं मिळून—

**जाई** : तू त्यांना सुचवून पाहा. ते तयार झाले तरी त्यांच्या मनाच्या या अवस्थेत त्यांनी राजेंद्रनगरला ललितमहालात राहावं असं मला वाटत नाही. मी तर त्यांच्या एकट्याच्या संगतीत तिथं मुळीच राहायची नाही!

**बलराज** : प्रियरंजनदास आणि आईसाहेब यांचा ललितमहालात खून झालाय म्हणून? कम् कम्...डोन्ट बी चिकनहार्टेड. सहा महिने होऊन गेले त्या प्रकाराला. यू मस्ट गेट ओव्हर इट् नाऊ.

**जाई** : ते तुम्ही तुमच्या मित्राला सांगा.

[तेवढ्यात संथ पावलानं घरगुती वेशात विक्रम येतो. मुद्रा थिजलेली, दृष्टी हरवलेली.]

**विक्रम** : राजेंद्रनगरमधे काय गोंधळ झालाय बलराज?

**बलराज** : गोंधळ वगैरे काही नाही. तुझे सगळे निर्णय अचूक ठरले आहेत. फक्त तुला आंघोळीतून लवकर ओढून काढावं म्हणून मी तसा निरोप धाडला तुला.

**विक्रम** : असे खोटे निरोप पाठवू नकोस पुन्हा कधी मला! छातीत धस्स झालं माझ्या एकदम. राजेंद्रनगरचा एवढा डोंगर डोक्यावर घेतलाय मी—

**बलराज** : तुझी तरी कमालच आहे यार. एवढ्यातेवढ्यानं धस्स व्हायला काय झालं? आता तुझ्या मनासारखं झालंय, तेव्हा तू तर छातीठोकपणे—

**विक्रम** : मनासारखं झालंय? कोणाच्या, माझ्या? नाही नाही...तुझा काहीतरी गैर-समज झालाय...म्हणजे त्या दोघांची हत्या व्हावी, अशी माझी—

**जाई** : पाहा पाहा बलराज...कसं तिढीनं लावून घेऊन बोलताहेत हे! त्या दोघांच्या हत्येचा काय संबंध आला यात? राजेंद्र उद्योगसमूहाचा कारभार आपल्या हातात यावा असं तुम्हाला वाटत नव्हतं?

**विक्रम** : हो हो...ते खरंय...थोडंसं...म्हणजे...

**बलराज** : मी फक्त तेवढ्यापुरतं म्हणत होतो. हे बघ विक्रम, आपण सर्वांनी सगळी

मरगळ झटकून कंबर कसून कामाला उभं राहायला हवं. त्यासाठी तुम्ही दोघांनी राजेंद्रनगरला जाऊन ललितमहालात मुक्काम ठोकायला हवा. मी इथं राहून—

**विक्रम** : (किंचाळत) ललितमहालात? नाही नाही, कदापि नाही! संधी मिळेल त्या क्षणी मी ललितमहाल जमीनदोस्त करून टाकीन.

**जाई** : काहीतरीच काय बोलता? एवढी सुंदर वास्तू—

**विक्रम** : (ओरडून) मूर्खासारखं काहीतरी बरळू नकोस. ती वास्तू आता नुसती सुंदर राहिली नाहीये. तिथलं सौंदर्यदेखील जलाल विषारी झालंय. अगदी अल्पकाळसुद्धा जो कोणी तिथं राहिला, त्याच्या नसानसांत ते विष भिनल्याखेरीज राहायचं नाही. ललितमहालच्या हवेतच विश्वासघात, भरून ओसंडून राहिलाय. तिथल्या गाद्या-गिरद्यांवर व्यभिचार कसा मस्त फोफावलाय. तिथं पावलोपावली, रोमरोमात एकच आग भडकून उठते. दुसऱ्याचं सगळं सगळं ओरबाडून घ्यावं...त्यासाठी बेशक् खून करावा...आपल्या अंगात हिंमत नसेल तर रस्त्यावरल्या कोणा हिंमतबहाद्दराला सुपारी द्यावी...थोडीफार बक्षिसीही द्यावी. बक्षिसीच्या लालचेनं हल्ली कोणीही ही सुरामारी अगदी खुषीनं आणि हां हां म्हणता करून जातात.

**जाई** : (घाबरून किंचाळत) विक्रम...

**विक्रम** : शिवाय आपणही नामानिराळे राहून—

**जाई** : हे—हे तुम्ही काय काय बडबडता आहात?

**विक्रम** : मी तुम्हाला एवढंच पटवून देतोय की ललितमहाल ही आता राहण्या-लायक वास्तू उरलेली नाही. ती पाडून जमीनदोस्तच करायला हवी.

**बलराज** : ठीक आहे. त्याचा पुढं केव्हातरी सवडीनं जरूर विचार करूया. पण तूर्त, तुम्हा दोघांना राजेंद्रनगरमधल्या गेस्ट हाउसमधे तर जाऊन राहायला काही हरकत नाही ना तुझी?

**विक्रम** : हरकत नाही कशी? छे छे...राजेंद्रनगरमधे मी पाऊलसुद्धा टाकणार नाही.

**जाई** : असं म्हणून कसं चालेल? तिकडचा कारभार कोण बघणार?

**विक्रम** : का? तुम्ही दोघं आहातच की! रोज सकाळी तुम्ही दोघं बरोबर जात जा आणि कामकाज आटोपल्यावर सायंकाळी परत येत चला. जरूर पडलीच तर मुक्काम करा. (हसत) म्हणजे, हिंमत असेल तर ललितमहालच्या 'घोस्ट हाउस'मधे, नाही-तर कारखान्याच्या गेस्ट हाउसमधे! (हसतो.)

**बलराज** : विक्रम, ही थट्टा करण्याची गोष्ट नाहीये. तू ठामपणे 'नाहीच' म्हणून बसलास तर आम्हाला तो पर्याय पत्करावा लागेलच. पण तेवढ्यानं भागणार नाहीये. पावलोपावली तुझ्या सल्लामसलतीची गरज लागणार. तुला तिथं सतत माणसं भेटायला येणार, मुलाखती मागणार. प्रत्येक वेळी तुझे निर्णय आम्हांला कसे घेता येतील?

**विक्रम** : मग टेलिफोन कशासाठी आहे?

जाई : सगळींच बोलणी टेलिफोनवर बोलता येतात का ?

विक्रम : बघू. विचार करू. ते सगळं होऊन जाईल.

जाई : मी राजेंद्रनगरला गुंतून पडले तर रूपकडं कोण बघणार ?

विक्रम : त्याचा विचार आधीच केलाय मी. रूपालीची सगळी जबाबदारी यापुढं मी स्वतः घ्यायची ठरवलीय. मुलांना कसं वागवावं ते तुला मुळीच कळत नाही अशी खात्री पटलीय माझी !

जाई : रूप जे जे सांगते त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवता काय तुम्ही ?

विक्रम : मी इतक्या हलक्या कानाचा नाहीये !

जाई : कोणास ठाऊक. तरीदेखील रूपाली—

बलराज : बास. पुरे. यावर आत्ता इथं वादंग नकोय. [तेवढ्यात इंटरकॉमचा बझर वाजतो. बलराज स्विच दाबीत] बोला दयाळजी. [दयाळ : (इंटरकॉममधून) प्रेसची मंडळी जमली आहेत सगळी.] एक पाच मिनिटांनी घेऊन या मंडळींना इकडं. (स्विच ऑफ करीत) येऊ देत ना रे ?

विक्रम : येऊ देत की ! कर नाही त्याला डर कसली ? खुशाल येऊ देत आणिक वाट्टेल ते विचारू देत. माय कॉन्शन्स इज क्लीयर...

जाई : उगीच वाकड्यात शिरू नका. ती माणसं काही तुम्हाला कशाचा जाब विचारायला येत नाहीयेत.

बलराज : विक्रम, मागल्या सगळ्या घटनांच्यावर आता पडदा पडलाय. आता प्रेसचे जे लोक येताहेत ते फक्त राजेंद्र उद्योगसमूहातला संप तुम्ही कसा मिटवला, विक्रम इंडस्ट्रीज आणि राजेंद्र इंडस्ट्रीज यांचं एकीकरण, आपले नवे संकल्प आणि नव्या योजना यांबद्दल माहिती विचारायला येताहेत. प्रश्नांची नेमकी उत्तरं तू दिलीस तरी चालेल.

जाई : तसं नको. शक्य तो तुम्ही काही बोलूच नका. बलराज आणि मी सगळी उत्तरं देऊ. फार तर एखाद्या प्रश्नाबद्दल—

विक्रम : (उपरोधाने खोचून) तू आणिक बलराज या काही दिवसांत फारच बुद्धिमान, कर्तबगार आणि धोरणी झालात हे मला ठाऊक आहे; पण मी अगदीच मठ्ठ, मूर्ख किंवा वेडसर झालोय असं मानायचं—

बलराज : हे तू कोणाला काय बोलतो आहेस विक्रम ?

जाई : प्रत्येक वेळी हे असं मुद्दाम वाकड्यात शिरतात बघ. यांच्याशी कसं वागायचं तेच कळेनासं झालंय मला.

विक्रम : प्रेस कॉन्फरन्स मी हाताळतो आज. तुम्ही दोघं मिळून एक वर्षभर राजेंद्र उद्योगसमूह सांभाळून दाखवा मला.

बलराज : हे—हे आव्हान तू मला देतो आहेस विक्रम ? माझ्यावरचा तुझा विश्वास

उडालाय? माझी मदत तुला नकोय? ठीक आहे. आजच्या प्रेस कॉन्फरन्सला तूच उत्तरं दे. मी चाललो. (जाऊ लागतो.)

**विक्रम :** (व्याकूळ होत त्याला रोखत) नाही नाही...थांब बलराज...माघारी फीर... तुला शपथ आहे! [बलराज थबकतो. वळून बघतो.] बलराज, तुला ठाऊक आहे... मी...मी हा असा नाहीये...आणि तरीदेखील मी...मी असा झालोय. माझ्या पायाखालची वाळू सरकतेय...अरे मला कळतंय...एखाद्या जीर्ण वस्त्रासारखं माझं मन विरायला लागलंय...जागजागी धस लागलीय त्याला...खरंच...मला झालंय तरी काय?

**बलराज :** (जवळ जात मायेनं) छे छे विक्रम, गड्या, तुला काहीएक झालेलं नाहीये. उगीचच केवळ कल्पनेनं निर्माण केलेल्या एका खोड्यात तू अडकला आहेस. तुला जे वाटतंय ते सगळं सगळं खोटं आहे. निव्वळ तू पाहिलेलं एक दिवास्वप्न आहे.

**विक्रम :** (हात धरून दाबीत) तुला खरंच असं वाटतं बलराज?

**बलराज :** नुसतं वाटतं असं नाहीये, माझी खात्री पटलीय. कोणीही कामगार तुला येऊन भेटला नव्हता...तू कोणालाही ठार मारण्यासाठी पैसे वा चिथावणी दिली नव्हतीस—

**विक्रम :** शक्य आहे...तसंच असलं पाहिजे...पण मग—(विचारात हरवतो.)

**बलराज :** (क्षणार्धं थांबून) छोड दो यार (पाठीवर थाप मारतो.)

**विक्रम :** (भानावर येत) ऊं?...हो हो...नाही नाही...मी हे—हे सगळं विसरायचं ठरवलंय. पण यदाकदाचित मला...म्हणजे माझं...म्हणजे कुठं थोडाफार तोल सुटतोय असं तुला वाटलंच तर—

**बलराज :** डोन्ट यू वरी विक्रम, मी तुझ्या पाठीशी डोंगरासारखा उभा आहे.

**विक्रम :** (उचंबळून येत) कसं अगदी माझ्या मानातलं बोललास. खरं म्हणजे बलराज, ज्या मायाममतेनं तू मला जपतो आहेस त्याला मी पात्र नाहीये. माझं मन म्हणजे गलिच्छ, हिंस्र, कावेबाज, स्वार्थी, संशयी विचारांची एक अंधारी गुहा झालीय. आणि एक अजाण, भाबडा बालक कुतूहलानं पाहात पाहात या गुहेत आत आत जातोय—

**बलराज :** (बाहेरचा गलबला ऐकून) सावधान! प्रेसचे लोक येताहेत. जाई, विक्रम स्वागतासाठी तुम्ही दोघंही पुढे व्हा.

[दयाळांच्या पाठोपाठ वार्ताहर घोळक्याने आत येतात. प्रत्येकाच्या हातात पेन, नोटबुक, खांद्याला शबनम पिशवी. काही जणांच्या हातात कॅमेरे. "या याऽऽ मित्रहो, सुस्वागतम्" असं म्हणत हस्तांदोलन करीत सुहास्यमुद्रेनं विक्रम आणि नमस्कार करीत जाई सर्वांचं स्वागत करतात. बलराज आणि दयाळ सर्वांना बसायला जागा देतात. बसाबस झाल्यावर—]

**विक्रम** : मित्रांनो, तुम्ही तुमचे प्रश्न मला विचारण्यापूर्वी मी एक छोटंसं निवेदन करून आम्ही काय करतो आहोत ते मी तुम्हाला थोडक्यात सांगणार आहे. टीक आहे ना बलराज ?

**बलराज** : नक्कीच. गो अहेड.

**विक्रम** : मित्रांनो, राजेंद्र उद्योगसमूहाचा कारभार आमच्या हाती आल्यापासून अवघ्या महिनाभरात, सहा महिने चाललेला संप मिटला. कसा मिटला ? ही पुण्याई आणि प्रेरणा माझे वडील कै. शिवशंकर राजेंद्र यांची. 'उद्योगसमूहाला होणाऱ्या नफ्यात कामगारांना वाटा मिळालाच पाहिजे' असं माझे वडील म्हणत. त्यासाठी—(बलराजकडे पाहात) मी हे सांगावं की नाही मला समजत नाही—[बलराज खुणेनं 'सांग, सांग—' म्हणतो, तशी] माझ्या वडिलांनी चौदा वर्षांपूर्वी तसा हट्ट धरला म्हणून त्यांना आपला जीव गमवावा लागला. त्या तपशीलात आज मी शिरत नाही. पण ते धोरण अंमलात आणायचं ठरवून मी कारभार हाती घेतल्याबरोबर संप मिटायला काही अडचण पडली नाही. मात्र कामगारांना मिळणारा नफ्याचा वाटा दारूच्या गटारात वाहाणार नाही किंवा सोन्याचांदीच्या साखळ्यांत अडकून पडणार नाही या हेतूनंच आम्ही नवे संकल्प केले आहेत. उदाहरणार्थ—[थबकतो. दारात त्याला आणि फक्त त्यालाच ललितागौरीचे पिशाच्च दिसते. तशी गडबडून] तू ? तू इथं कशी आलीस ? का आलीस ? [ती पुढं पुढं येताना दिसते, तशी] थांब...(ओरडून) थांब ! तिथंच उभी राहा...[वार्ताहरांत कुजबूज.]

**जाई** : (जवळ जात) काय झालं ? कोण आलं ? तुम्ही कोणाशी बोलताहात ? असे का बघताहात ? [ललितागौरी संथ पावलांनी पुढं येऊ लागते, तशी—]

**विक्रम** : (तिचा हात दूर करून मागे मागे सरत) थांब...पुढं येऊ नकोस. तुला काय हवंय ?

**बलराज** : (जवळ जात) विक्रम, कोण दिसतंय तुला ? भानावर ये मित्रा, अरे इथं तर या वार्ताहरांच्या शिवाय दुसरं कोणीही आलं नाहीये.

[विक्रमला दिसणारी ललितागौरी पाठीकडे हात नेऊन, खुपसलेला रक्त ठिबकणारा सुरा काढून दाखवते, तशी—]

**विक्रम** : (भेदरून मागे सरत किंचाळत) सुराऽऽ ? नाही नाहीऽऽ माझा काही संबंध नाहीये त्याच्याशी...खरं म्हणजे तू मधे का पडलीस ? कशासाठी दाखवते आहेस मला सुरा ?...(चाचपडत) बलराज...तो सुरा काढून घे आधी. दयाळजी, तो सुराऽऽ...

**दयाळ** : (सभोवार पाहात) सुरा ? इथं कुठला आलाय सुरा ?

**जाई** : (लगबगीनं बलराजजवळ येत) बलराज, फार अनर्थ होण्यापूर्वी ही कॉन्फरन्स रद्द करायला हवी !

**बलराज** : (गडबडीनं) मलाही तेच वाटतंय ! तू विक्रमला घेऊन आत जा.

**जाई :** (विक्रमचा हात धरीत) चला...अगोदर आत चला...तुम्हाला बरं वाटत नाहीये...तुम्ही विश्रांती घ्यायला हवी...

**बलराज :** मित्र हो, विक्रमजींची प्रकृती बरी नाहीये. त्यांना पुन्हा सिझोफ्रेनियाचा ॲटॅक आलाय. आजची कॉन्फरन्स रद्द केलीय. आपण सर्वांनी माफ करायला हवं. दयाळजी—

**दयाळ :** (तत्परतेनं) हो, होय. चला मंडळी...बाहेर गेस्ट हाउसमधे चहाफराळासाठी सगळी तयारी झालीय. [दयाळ आपसात कुजबुजणाऱ्या सगळ्या वार्ताहरांना घेऊन जातात. वार्ताहर जाताजाताही वळून विक्रमकडे पाहात पाहात जातात. त्या गर्दीतच ललितागौरींचे पिशाच्च निघून जाताना विक्रमला दिसते, तशी—]

**विक्रम :** (प्रक्षोभानं बोट दाखवीत) ती बघ...ती पाहा...निघाली...चालली...गेली... (हताशपणे अंग कोचावर धपकन् टाकतो.)

**जाई :** असं का करताहात तुम्ही ? कोणी आली नाही न् गेली नाही; सगळे तुमच्याच मनाचे खेळ आहेत. तुम्ही काय चालवलं आहे हे ?

**विक्रम :** स्वतःच्या घरात सुद्धा ही...ही...मला सुखानं जगू देणार नाहीये का रे बलराज ?

**बलराज :** कोणाबद्दल बोलतो आहेस तू ? कोण दिसलं तुला ?

**विक्रम :** (चिडत) कोण म्हणून काय विचारतोस ? आई. मी बोलत होतो तेव्हा ती आली. या दारातून आली. पुढे येत, पाठीतून सुरा काढीत—

**जाई :** हूं ! भास...निव्वळ भास झालाय तुम्हाला...दुसरं काहीएक नाही.

**विक्रम :** (आवेगानं) त...त...तुम्हाला कोणालाच दिसली नाही का ती ?

**जाई :** नाही, नाही, नाही ! मी पुन्हा सांगते ते ऐकून ठेवा—

**बलराज :** त्याची चर्चा आज नकोय जाई. विक्रम, आज तू बरा स्वस्थ चित्तानं बिछान्यावर पडून विश्रांती घे. जाई, मला वाटतं, डॉक्टरना बोलावून विक्रमला काहीतरी सेडेटिव्ह द्यायला सांगू या.

**विक्रम :** त्याची काही गरज नाहीये बलराज. अरे मी खरोखरीच चांगला आहे...उत्तम आहे...फक्त ती दिसली आणि...(थबकून त्याला न्याहाळत) खोटं नाही बलराज... अरे ती खरोखरीच दिसली मला...

**बलराज :** मी कुठं तुला खोटं ठरवतोय ? तू अगदी खणखणीत बरा असलास, तरीसुद्धा आज विश्रांती घे. आज आम्ही दोघंच राजेंद्रनगरला जाऊ.

**विक्रम :** नुसतं आज म्हणू नकोस. आता रोजच तुला आणि जाईला राजेंद्रनगरला जायला हवं. मी तिथं येणार नाही. कधीही नाही.

**जाई :** हा निव्वळ भित्रेपणा आहे.

**विक्रम :** हाडामासाच्या माणसांना मी डरत नाही जाई, पण भुताखेतांना तोंड कसं

द्यावं ते कोणी शिकवलं नाही मला. मी...मला...(थबकतो.)

[तेवढ्यात दारापाशी इतका वेळ बहुधा उभी असलेली रूपाली टेबलटेनिसची रॅकेट आणि चेंडू घेऊन "डॅडीऽ डॅडीऽ काय झालंय तुम्हाला? कसली भुतंखेतं?..." असं विचारीत धावते आणि विक्रमच्या जवळ बसत बिलगते, तशी——]

**विक्रम :** (तिला जवळ घेत) छे छे...तसं काही नाही गं पोरी. तू तरी तिला पाहिलेस ? अशी सुरा घेऊन ती—

**रूपाली :** छेऽ मी नाही पाहिलं. मला नाही कोणी दिसलं.

**जाई :** (रागानं) म्हणजे इतका वेळ तू पुन्हा आडून ऐकत उभी होतीस ?

**रूपाली :** हो. होते मी उभी. काळजी वाटली मला डॅडींची. वाटू नये का ?

[दोघीही एकमेकांच्या नजरेत रागानं बघतात. तोच दयाळ येतात.]

**दयाळ :** प्रेसचे लोक निघताहेत. मला वाटतं, तुम्ही दोघांनी बाहेर येऊन त्यांना निरोप दिलात तर ते बरं दिसेल.

**विक्रम :** हो, निरोप द्यायलाच हवा. बलराज, माझ्या वतीनं तुम्ही दोघं निरोप द्या त्यांना. माझी दिलगिरी कळवा. जा जाई, रूपकडं रागानं बघत उभी राहू नकोस. माझ्या काळजीनं ती आडून ऐकत उभी राहिली असली, तर तो काही फार मोठा गुन्हा केला नाहीये तिनं.

[बलराज, जाई आणि दयाळ जातात. रूपाली उठते आणि चोरपावलांनी दाराजवळ जाऊन चाहूल घेऊन माघारी फिरत]

डॅडी, हे काय चाललंय ? तो माणूस तुम्हाला भेटून गेल्यापासून कसले भास होताहेत तुम्हाला ?

**विक्रम :** (चपापून) तो माणूस ? (तिला न्याहाळत) तुला काय ठाऊक तो माणूस ? तो तर मुकाट्यानं मला भेटून गेला होता माझ्या केबिनमधे येऊन. तुला कसं कळलं ? कोणी सांगितलं तुला ?

**रूपाली :** (जवळ बसत लाडिकपणे) अय्याऽऽ ! त्यात काय...! अहो त्याच माणसाला घेऊन नंतर आजोबा ममीकडं आले होते की...ते बोलत असताना मी ऐकलं... म्हणजे आपलं सहज....

**विक्रम :** (तिला न्याहाळीत) आय सीऽऽ! दयाळजी नंतर त्याला घेऊन जाईकडं आले होते तर ? आणिक काय काय ऐकलंस तू ?

**रूपाली :** (उठून टेबलटेनिसच्या रॅकेटनं चेंडू झेलीत) मी नाही हो चहाड्या सांगायची. आधीच ममी मला 'चहाडखोर' म्हणते. त्यात—

**विक्रम :** म्हणू देत. तिच्याकडं लक्ष देऊ नकोस. सांग मला तू काय काय ऐकलंस ते ! माझ्याबद्दल काळजी वाटते ना तुला ? मग तुला ठाऊक आहे, ते सगळं सगळं मला कळायलाच हवं. सांग बेटा—

**जाई :** (विक्रमचा हात धरीत) चला...अगोदर आत चला...तुम्हाला बरं वाटत नाहीये...तुम्ही विश्रांती घ्यायला हवी...

**बलराज :** मित्र हो, विक्रमजींची प्रकृती बरी नाहीये. त्यांना पुन्हा सिझोफ्रेनियाचा ॲटॅक आलाय. आजची कॉन्फरन्स रद्द केलीय. आपण सर्वांनी माफ करायला हवं. दयाळजी—

**दयाळ :** (तत्परतेनं) हो, होय. चला मंडळी...बाहेर गेस्ट हाउसमध्ये चहाफराळासाठी सगळी तयारी झालीय. [दयाळ आपसात कुजबुजणाऱ्या सगळ्या वार्ताहरांना घेऊन जातात. वार्ताहर जाताजाताही वळून विक्रमकडे पाहात पाहात जातात. त्या गर्दीतच ललितागौरींचे पिशाच्च निघून जाताना विक्रमला दिसते, तशी—]

**विक्रम :** (प्रक्षोभानं बोट दाखवीत) ती बघ...ती पाहा...निघाली...चालली...गेली .. (हताशपणे अंग कोचावर धपकन् टाकतो.)

**जाई :** असं का करताहात तुम्ही ? कोणी आली नाही न् गेली नाही; सगळे तुमच्याच मनाचे खेळ आहेत. तुम्ही काय चालवलं आहे हे ?

**विक्रम :** स्वतःच्या घरात सुद्धा ही...ही...मला सुखानं जगू देणार नाहीये का रे बलराज ?

**बलराज :** कोणाबद्दल बोलतो आहेस तू ? कोण दिसलं तुला ?

**विक्रम :** (चिडत) कोण म्हणून काय विचारतोस ? आई. मी बोलत होतो तेव्हा ती आली. या दारातून आली. पुढे येत, पाठीतून सुरा काढीत—

**जाई :** हूं ! भास...निव्वळ भास झालाय तुम्हाला...दुसरं काहीएक नाही.

**विक्रम :** (आवेगानं) त...त...तुम्हाला कोणालाच दिसली नाही का ती ?

**जाई :** नाही, नाही, नाही ! मी पुन्हा सांगते ते ऐकून ठेवा—

**बलराज :** त्याची चर्चा आज नकोय जाई. विक्रम, आज तू घरी स्वस्थ चित्तानं बिछान्यावर पडून विश्रांती घे. जाई, मला वाटतं, डॉक्टरना बोलावून विक्रमला काहीतरी सेडेटिव्ह द्यायला सांगू या.

**विक्रम :** त्याची काही गरज नाहीये बलराज. अरे मी खरोखरीच चांगला आहे...उत्तम आहे...फक्त ती दिसली आणि...(थबकून त्याला न्याहाळत) खोटं नाही बलराज... अरे ती खरोखरीच दिसली मला...

**बलराज :** मी कुठं तुला खोटं ठरवतोय ? तू अगदी खणखणीत बरा असलास, तरीसुद्धा आज विश्रांती घे. आज आम्ही दोघंच राजेंद्रनगरला जाऊ.

**विक्रम :** नुसतं आज म्हणू नकोस. आता रोजच तुला आणि जाईला राजेंद्रनगरला जायला हवं. मी तिथं येणार नाही. कधीही नाही.

**जाई :** हा निव्वळ भित्रेपणा आहे.

**विक्रम :** हाडामासाच्या माणसांना मी डरत नाही जाई, पण भुताखेतांना तोंड कसं

द्यावं ते कोणी शिकवलं नाही मला. मी...मला...(थबकतो.)

[तेवढ्यात दारापाशी इतका वेळ बहुधा उभी असलेली रूपाली टेबलटेनिसची रॅकेट आणि चेंडू घेऊन "डॅडीऽ डॅडीऽ काय झालंय तुम्हाला? कसली भुतंखेतं?..." असं विचारीत धावते आणि विक्रमच्या जवळ बसत बिलगते, तशी--]

**विक्रम** : (तिला जवळ घेत) छे छे...तसं काही नाही गं पोरी. तू तरी तिला पाहिलंस? अशी सुरा घेऊन ती--

**रूपाली** : छेऽ मी नाही पाहिलं. मला नाही कोणी दिसलं.

**जाई** : (रागानं) म्हणजे इतका वेळ तू पुन्हा आडून ऐकत उभी होतीस?

**रूपाली** : हो. होते मी उभी. काळजी वाटली मला डॅडींची. वाटू नये का?

[दोघीही एकमेकांच्या नजरेत रागानं बघतात. तोच दयाळ येतात.]

**दयाळ** : प्रेसचे लोक निघताहेत. मला वाटतं, तुम्ही दोघांनी बाहेर येऊन त्यांना निरोप दिलात तर ते बरं दिसेल.

**विक्रम** : हो, निरोप द्यायलाच हवा. बलराज, माझ्या वतीनं तुम्ही दोघं निरोप द्या त्यांना. माझी दिलगिरी कळवा. जा जाई, रूपकडं रागानं बघत उभी राहू नकोस. माझ्या काळजीनं ती आडून ऐकत उभी राहिली असली, तर तो काही फार मोठा गुन्हा केला नाहीये तिनं.

[बलराज, जाई आणि दयाळ जातात. रूपाली उठते आणि चोरपावलांनी दाराजवळ जाऊन चाहूल घेऊन माघारी फिरत]

डॅडी, हे काय चाललंय? तो माणूस तुम्हाला भेटून गेल्यापासून कसले भास होताहेत तुम्हाला?

**विक्रम** : (चपापून) तो माणूस? (तिला न्याहाळत) तुला काय ठाऊक तो माणूस? तो तर मुकाट्यानं मला भेटून गेला होता माझ्या केबिनमधे येऊन. तुला कसं कळलं? कोणी सांगितलं तुला?

**रूपाली** : (जवळ बसत लाडिकपणे) अय्याऽऽ! त्यात काय...! अहो त्याच माणसाला घेऊन नंतर आजोबा ममीकडं आले होते की...ते बोलत असताना मी ऐकलं... म्हणजे आपलं सहज....

**विक्रम** : (तिला न्याहाळीत) आय सीऽऽ! दयाळजी नंतर त्याला घेऊन जाईकडं आले होते तर? आणिक काय काय ऐकलंस तू?

**रूपाली** : (उठून टेबलटेनिसच्या रॅकेटनं चेंडू झेलीत) मी नाही हो चहाड्या सांगायची. आधीच ममी मला 'चहाडखोर' म्हणते. त्यात--

**विक्रम** : म्हणू देत. तिच्याकडं लक्ष देऊ नकोस. सांग मला तू काय काय ऐकलंस ते! माझ्याबद्दल काळजी वाटते ना तुला? मग तुला ठाऊक आहे, ते सगळं सगळं मला कळायलाच हवं. सांग बेटा--

रूपाली : सांगितलं तर मला काय द्याल ?

विक्रम : तू मागशील ते.

रूपाली : (क्षणभर खेळत) डॅडी, राजश्रीची आई राजश्रीला शूटिंग बघायला कारवारला घेऊन जाणार आहे. मला पाठवाल तिच्याबरोबर ? खूप धमाल असते म्हणे. मोठे मोठे सुपर स्टार्स येणार आहेत. पाठवाल ?

विक्रम : पाठवीन. त्यात काय मोठंसं ?

रूपाली : ममी नको म्हणाली तरी ?

विक्रम : ममी कशाला नको म्हणेल ? आणि तिचा काय प्रश्न आहे ? एकदा मी ठरवलं की ठरलं.

रूपाली : बघा हंऽऽ...नाहीतर मग मागून काहीतरी उकरून काढाल. म्हणाल, राजश्रीची आई एक्स्ट्रॉ नटीच आहे, हे आहे आणिक ते आहे...(म्हणत उठते आणि अल्लडपणे दारापर्यंत जाऊन चाहूल घेऊन येते आणि) डॅडी, ममीला तुम्ही सारखं काकांच्या बरोबर कशी पाठवता हो ?

विक्रम : का ? त्याला काय झालं ?

रूपाली : जेव्हा पाहावं तेव्हा ममी आणि काका ! ऑफिसात जातायेताना बरोबर, शॉपिंगला बरोबर, कुठं पार्टीला नाहीतर शोला जायचं तेव्हाही—तेव्हाही बरोबर. हे काय बाई ? मला नाही आवडत ! (त्याची मुद्रा बघते.)

विक्रम : अग पण बिघडलं काय त्यात ? मी माझ्या कामात किती व्यग्र असतो ते तू पाहिलंस ना ?

रूपाली : म्हणून काय झालं ? ममीनं तुमच्याबरोबर काम करावं. नेहमी नेहमी काकांच्या बरोबरच काय काम असतं हो तिचं ?

विक्रम : (हसत) पुरे पुरे आजीबाई...तू काय ऐकलंस ते सांग अगोदर.

रूपाली : (रॅकेटनं चेंडू झेलीत, दाराकडं फेरी मारून येत) म्हणेऽऽ की—"तो माणूस तुम्हाला मरायलाच हवाय...पण तसं तोंडानं स्वच्छ कबूल करायची गट्स् नाहीयेत तुम्हाला..." गट्स्—गट्स्...गट्स् म्हणजे काय हो डॅडी ?

विक्रम : (तंग होत) असं कोण कोणाला म्हणालं ? तुझी ममी म्हणाली ? त्या—त्या राऊला—होय ?

रूपाली : (घाबरून) बघा हं डॅडी...मला बाई भीती वाटतेय तुमची. ममीला तुम्ही काही बोललात तर ती मला फोडून काढील.

विक्रम : कोणी तुझ्या अंगाला यापुढं हात लावणार नाही, आणि मी तुझ्या ममीला काहीएक सांगणार नाही. आणखी काय ऐकलंस तू ? सांग, ममीनं राऊला काय दिलं ? किती पैसे मोजले ? सांग सांग...

रूपाली : (खेळत, दारातून पाहून मागे वळत) पुन्हा केव्हा तरी ? आत्ता नाही !

**विक्रम :** (तिला न्याहाळीत...विचारात हरवत) हूं ऽऽ (फेऱ्या घालू लागतो.)

**रूपाली :** (खेळत, दारापाशी जात, पाहात) डॅडी, राजेंद्रनगरला जायचं तर ममीबरोबर तुम्हीच जात जा. काकांच्या बरोबर ममीला नका पाठवू. आधीच लोक काय काय म्हणतात—

**विक्रम :** (फेऱ्या घालताना थबकून) कोण लोक, काय म्हणतात? अगदी स्पष्ट स्पष्ट सांग बघू बेटी!

**रूपाली :** (गांगरून) न...नाही...नाही...तसं काही नाही...काही नाही...खररंच काही नाही डॅडी...तुम्ही उगाच माझ्यावर ओरडू नका...

[विक्रम पुन्हा येरझारा घालू लागतो. रुपाली खेळू लागते. क्षणभराने—]

**रूपाली :** आमच्या बाई अशा वाईट आहेत...म्हणे ऽऽ..."रूपालीची आई आताशा बलराजबरोबर असते!"...ड्रॉइंग टीचरना सांगत होत्या बाई. आणि म्हणेऽऽ "सासूबाईंचंच वळण गिरवतेय ती!"...म्हणजे काय हो डॅडी?

**विक्रम :** (धाव बसत थबकून) काही नाही!

**रूपाली :** (पुन्हा खेळत) मला आला राग. दिली खाजकुयली टाकून. बसल्या मग टो टो टो करीत. [खदाखदा हसते. तेवढ्यात तिला चाहूल लागते आणि] डॅडी, ती दोघं येताहेत. मी अभ्यासाला जातेय वर. मी तुम्हाला काहीएक सांगितलेलं नाहीये हं!

[रूपाली पटकन् जाते. विक्रम अजून स्तंभित होऊन उभा आहे. तेवढ्यात बाहेरून जाई आणि बलराज बोलत येतात.]

**बलराज :** आता प्रेसच्या लोकांची काही भीती उरली नाही. पुढल्या आठवड्यात मीच त्यांना ताजमधे डिनर देऊन सगळी माहिती देईन.

**जाई :** तू होतास बलराज, म्हणून हे प्रकरण सहीसलामत निभावलं! आता राजेंद्र-नगरला जायला केव्हा निघायचं?

**विक्रम :** (शुष्क स्वरात) राजेंद्रनगरला आपण दोघं जाणार आहोत जाई. बलराज इथल्या ऑफिसकडं पाहील. आजच नव्हे; यापुढं ही कायमची व्यवस्था ठरवलीय मी!

**बलराज :** फेयर इनफ. मी तर तेच सुचवीत होतो. पण तुझी प्रकृती...

**जाई :** पण म्हणजे काऽय? याचा अर्थ काय? आत्ता तर तुम्ही—

**विक्रम :** (कडाडत) याचा अर्थ इतकाच की, मी सगळीं सगळी भुतं गाडून टाकायचं ठरवलंय! ललितमहालातली नव्हेत, तर या—या रूपव्हिलातली सुद्धा! अँड नाऊ नो मोअर अर्ग्युमेंटस्. गेट रेडी.

[आवेगाने निघून जातो. बलराज आणि जाई थक्क होऊन बघतच राहातात. आणि त्याच वेळी अंधार.]

**रूपाली** : सांगितलं तर मला काय द्याल ?

**विक्रम** : तू मागशील ते.

**रूपाली** : (क्षणभर खेळत) डॅडी, राजश्रीची आई राजश्रीला शूटिंग बघायला कारवारला घेऊन जाणार आहे. मला पाठवाल तिच्याबरोबर ? खूप धमाल असते म्हणे. मोठ्ठे मोठ्ठे सुपर स्टार्स येणार आहेत. पाठवाल ?

**विक्रम** : पाठवीन. त्यात काय मोठ्ठंसं ?

**रूपाली** : ममी नको म्हणाली तरी ?

**विक्रम** : ममी कशाला नको म्हणेल ? आणि तिचा काय प्रश्न आहे ? एकदा मी ठरवलं की ठरलं.

**रूपाली** : बघा हंऽऽ...नाहीतर मग मागून काहीतरी उकरून काढाल. म्हणाल, राजश्रीची आई एक्स्ट्रॉ नटीच आहे, हे आहे आणिक ते आहे...(म्हणत उठते आणि अल्लडपणे दारापर्यंत जाऊन चाहूल घेऊन येते आणि) डॅडी, ममीला तुम्ही सारखं काकांच्या बरोबर कशी पाठवता हो ?

**विक्रम** : का ? त्याला काय झालं ?

**रूपाली** : जेव्हा पाहावं तेव्हा ममी आणि काका ! ऑफिसात जातायेताना बरोबर, शॉपिंगला बरोबर, कुठं पार्टीला नाहीतर शोला जायचं तेव्हाही—तेव्हाही बरोबर. हे काय बाई ? मला नाही आवडत ! (त्याची मुद्रा बघते.)

**विक्रम** : अग पण बिघडलं काय त्यात ? मी माझ्या कामात किती व्यग्र असतो ते तू पाहिलंस ना ?

**रूपाली** : म्हणून काय झालं ? ममीनं तुमच्याबरोबर काम करावं. नेहमी नेहमी काकांच्या बरोबरच काय काम असतं हो तिचं ?

**विक्रम** : (हसत) पुरे पुरे आजीबाई...तू काय ऐकलंस ते सांग अगोदर.

**रूपाली** : (रॅकेटनं चेंडू झेलीत, दाराकडं फेरी मारून येत) म्हणेऽऽ की—"तो माणूस तुम्हाला मरायलाच हवाय...पण तसं तोंडानं स्वच्छ कबूल करायची गट्स् नाहीयेत तुम्हाला..." गट्स्—गट्स्...गट्स् म्हणजे काय हो डॅडी ?

**विक्रम** : (तंग होत) असं कोण कोणाला म्हणालं ? तुझी ममी म्हणाली ? त्या—त्या राऊला—होय ?

**रूपाली** : (घाबरून) बघा हं डॅडी...मला बाई भीती वाटतेय तुमची. ममीला तुम्ही काही बोललात तर ती मला फोडून काढील.

**विक्रम** : कोणी तुझ्या अंगाला यापुढं हात लावणार नाही, आणि मी तुझ्या ममीला काहीएक सांगणार नाही. आणखी काय ऐकलंस तू ? सांग, ममीनं राऊला काय दिलं ? किती पैसे मोजले ? सांग सांग...

**रूपाली** : (खेळत, दारातून पाहून मागे वळत) पुन्हा केव्हा तरी ? आत्ता नाही !

**विक्रम :** (तिला न्याहाळीत...विचारात हरवत) हूं ऽऽ (फेऱ्या घालू लागतो.)

**रूपाली :** (खेळत, दारापाशी जात, पाहात) डॅडी, राजेंद्रनगरला जायचं तर ममीबरोबर तुम्हीच जात जा. काकांच्या बरोबर ममीला नका पाठवू. आधीच लोक काय काय म्हणतात—

**विक्रम :** (फेऱ्या घालताना थबकून) कोण लोक, काय म्हणतात? अगदी स्पष्ट स्पष्ट सांग बघू बेटी!

**रूपाली :** (गांगरून) न...नाही...नाही...तसं काही नाही...काही नाही...खरररंच काही नाही डॅडी...तुम्ही उगाच माझ्यावर ओरडू नका...

[विक्रम पुन्हा येरझारा घालू लागतो. रुपाली खेळू लागते. क्षणभराने—]

**रूपाली :** आमच्या बाई अशा वाईट आहेत...म्हणे ऽऽ...“रूपालीची आई आताशा बलराजबरोबर असते!”...ड्रॉइंग टीचरना सांगत होत्या बाई. आणि म्हणेऽऽ “सासूबाईंचंच वळण गिरवतेय ती!”...म्हणजे काय हो डॅडी?

**विक्रम :** (घाव बसत थबकून) काही नाही!

**रूपाली :** (पुन्हा खेळत) मला आला राग. दिली खाजकुयली टाकून. बसल्या मग टो टो टो करीत. [खदाखदा हसते. तेवढ्यात तिला चाहूल लागते आणि] डॅडी, ती दोघं येताहेत. मी अभ्यासाला जातेय वर. मी तुम्हाला काहीएक सांगितलेलं नाहीये हं!

[रूपाली पटकन् जाते. विक्रम अजून स्तंभित होऊन उभा आहे. तेवढ्यात बाहेरून जाई आणि बलराज बोलत येतात.]

**बलराज :** आता प्रेसच्या लोकांची काही भीती उरली नाही. पुढल्या आठवड्यात मीच त्यांना ताजमधे डिनर देऊन सगळी माहिती देईन.

**जाई :** तू होतास बलराज, म्हणून हे प्रकरण सहीसलामत निभावलं! आता राजेंद्रनगरला जायला केव्हा निघायचं?

**विक्रम :** (शुष्क स्वरात) राजेंद्रनगरला आपण दोघं जाणार आहोत जाई. बलराज इथल्या ऑफिसकडं पाहील. आजच नव्हे; यापुढं ही कायमची व्यवस्था ठरवलीय मी!

**बलराज :** फेयर इनफ. मी तर तेच सुचवीत होतो. पण तुझी प्रकृती...

**जाई :** पण म्हणजे काऽय? याचा अर्थ काय? आत्ता तर तुम्ही—

**विक्रम :** (कडाडत) याचा अर्थ इतकाच की, मी सगळी सगळी भुतं गाडून टाकायचं ठरवलंय! ललितमहालातली नव्हेत, तर या—या रूपव्हिलातली सुद्धा! अॅंड नाऊ नो मोअर अर्ग्युमेंटस्. गेट रेडी.

[आवेगाने निघून जातो. बलराज आणि जाई थक्क होऊन बघतच राहातात. आणि त्याच वेळी अंधार.]

## प्रवेश तिसरा

[रूपव्हिलातील तोच हॉल. मागील प्रवेशातील घडामोडींनंतर सुमारे तीनचार महिने उलटले आहेत. वेळ सायंकाळची. अंधार पडला आहे. पावसाळी हवेमुळे बाहेर अंधारून आले आहे. ढगांचा गडगडाट होतोय आणि विजाही चमकताहेत. तरी पण वातावरण कुंदच आहे.

रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा टीपॉयवर भेटीदाखल आणून दिलेले खूपसे पुष्पगुच्छ पडले आहेत. दयाळजी टेलिफोनवर कोणाशी तरी बोलताहेत.]

**दयाळ** : (रिसीव्हरमध्ये) छे छे, तशी आम्हाला कोणालाच कल्पना नव्हती. संमती घेण्यासाठी साहेबांनाच दिल्लीहून काही खास खलिता आला असल्यास कोण जाणे...हांऽ सहा महिन्यांपूर्वी कलेक्टर-कचेरीतून एक अधिकारी विक्रमजींचा बायोडाटा नेण्यासाठी आला होता म्हणे राजेंद्रनगरच्या ऑफिसमधे. पण एकदम 'पद्मविभूषण'साठी त्यांचं नाव रेकमेंड होईल अशी आज पहाटेपर्यंत कोणालाच अटकळ नव्हती...हो हो... कळवतो विक्रमजींना. बराय. [रिसीव्हर ठेवतात, तेवढ्यात पुन्हा फोन खणखणतो. त्रासिक मुद्रेनं उचलत] हॅलोऽऽ मी दयाळ...साहेब मीटिंगसाठी गेलेत...बाईसाहेबही घरात नाहीयेत...कशाबद्दल, पद्मविभूषण म्हणूनच ना? साहेबांनी आभार कळवायला सांगितलेत. बराय. [रिसीव्हर ठेवतात. तेवढ्यात बाहेरून जीन्स, गुरुशर्ट घातलेली रूपाली "हाई...मझा आया...बहोत मझा आया..." असं हसताखिदळत म्हणत येते. पाठोपाठ अमळ गांगरलेला उदयही येतो.]

**उदय** : 'मझा' कसली रूप? माझ्या तोंडचं पाणी पळालं होतं, ठाऊक आहे? इतक्या भन्नाटपणे शहरातून कोणी मोटरसायकल चालवतात? तू चिमुरडी पोरगी, कुठं ॲक्सिडेंट झाला असता म्हणजे मी लटकलो असतो, ठाऊक आहे? पोलिसांनी माझा गळा धरला असता सरळ!

**रूपाली** : हत् साला! उदय, यार तू डरपोक आहेस. अरे डॅडी असताना पोलिसांच्या गमज्याऽ? विचार आजोबांना, मी डॅडींची मर्सीडीझ चालवलीय; जिपवरून फेरफटका केलाय; इतकंच काय, अरे कारखान्याचा ट्रकदेखील घुमवलाय...

**दयाळ** : आणिक ट्रकचा ॲक्सिडेंटदेखील केलाय!

**रूपाली** : तो मी नाही; ड्रायव्हरनं. खरं की नाही? (खदखदते.)

**दयाळ** : ड्रायव्हर बिचारा हकनाक् बळी गेला.

**रूपाली** : त्याला कोण काय करणार? इंजिन चालू ठेवून मरायला गेला कशाला तो तंबाखू चघळायला? असंच पाहिजे! (खदखदते.)

**उदय** : आता पुन्हा कधी तुला माझ्या बुलेटला हात लावून देणार नाही मी!

रूपाली : अरे जा जाऽ, डॅडी मला डीलक्स होंडा घेऊन देणार आहेत!

उदय : बरं बरं, कळलं. आता आज तरी अभ्यासाला बसणार आहेस का?

रूपाली : (लडिवाळपणे, नखरा करीत) ऊंऽऽऽऽ...मी बोअर झालेय.

उदय : रूप, अग तुझी सहामाही पंधरा दिवसांवर आलीय!

रूपाली : मी मुळी परीक्षेला बसणारच नाहीये. मी जाणार आहे राजश्रीबरोबर फिल्मचं शूटिंग पाहायला कारवारला. अरे धम्माल येणार धम्माल. [खुषीत "ला...ला...ला ला..." करीत गिरकी घेत उदयला खट्याळपणे आंगठा दाखवते. तेवढ्यात बाहेरून जाई येते.]

जाई : हद्द आहे तुझ्यापुढं! रूप, तू केव्हा घरी परतलीस?

रूपाली : ही काय आत्ताच...तुझ्यापुढंच येतेय. उदयच्या मोटरसायकलवरून 'थडाडाडाडा' करीत आले.

जाई : उदय, तू तिचे भलभलते हट्ट पुरवीत जाऊ नकोस. मोटरसायकल चालवायचं तिचं वय तरी आहे का?

उदय : ती कशी आली ते तिलाच विचारा ताई. मला न विचारता गाडी स्टार्ट केली तिनं. गेटमधून ती बाहेर पडत होती तेव्हा धावत जाऊन मी उडी मारून मागं बसलो. ताई, तुम्ही तिला रागावू नका, पण परवापासून तीन वेळा घडलाय हा प्रकार.

जाई : ते तिच्या वडिलांना सांग! त्याचाही काही उपयोग व्हायचा नाहीये. कुठं तरी एकदा हातपाय मोडून घेतलेस म्हणजे—

रूपाली : अग जा जाऽऽ, हातपाय मोडून घ्यायला एवढी हळुबाई नाहीये मी.

जाई : कळला तुझा पराक्रम! मला न सांगता निघून का आलीस? मी तुला थांबायला सांगितलं होतं ना? थांबली असतीस थोडा वेळ—

रूपाली : किती वेळ थांबायचं गं? तुझं आणि काकांचं बोलणं काही लवकर संपेना आणिक मी तर अगदी बोअर झाले होते.

जाई : निघायच्या आधी फोन कोणाला केला होतास?

रूपाली : (चपापून) प...प...फोन? नाही नाही...फोन नाही केला मी...

जाई : खोटं बोलू नकोस रूप! तू फोन केला होतास हे मला कळलंय. बलराजच्या बंगल्यावरल्या वॉचमननं सांगितलंय मला.

रूपाली : हां हांऽ...आत्ता आठवलं. म...मी डॅडींना फोन केला होता. मला ते आपलं हे...म्हणजे सहजच केला होता मी फोन.

जाई : तू काय सांगितलं असशील त्यांना, त्याचा मला अंदाज आहे!

रूपाली : म...मी मी काहीसुद्धा सांगितलं नाही. विचार वाटलं तर डॅडींना...फक्त तुझ्याबरोबर मी बलराजकाकांच्या बंगल्यावर आलेय, एवढंच—

जाई : हो हो, तेवढंच! तुझं जे काय चाललंय ते बरं चाललेलं नाहीये, एवढंच मी तुला बजावून ठेवतेय!

रूपाली : पण मी काय केलंय ममी? (पुटपुटत) उगाच आळ घ्यायचे म्हणजे काय?

जाई : बाबा, तुम्ही जरा वर चला. मला बोलायचंय तुमच्याशी. (रूपालीला) आणिक तू लागलीच आम्ही काय बोलतोय ते आडून ऐकायला वर येऊ नकोस! [जाई आणि पाठोपाठ दयाळ जातात. मग—]

रूपाली : नाही येत. अडलंय माझं खेटर! डॅडी येऊ देत बंगल्यावर परत म्हणजे समजेल. मग बसेल तासंतास मुळूमुळू रडत! (हसते.)

उदय : हा काय प्रकार चालला आहे रूप?

रूपाली : काही नाही रेऽऽ आपली गंमत...ममीची फिरकी घेतली मी...(हसते.)

उदय : ममीला रडायला लावणं याला तू गंमत समजतेस? ही तुझी फिरकी आहे?

रूपाली : मग? मला झोडपून काढताना कसं वाटतं तिला? हात शिवशिवतात नाही का?

उदय : म्हणून त्याचा तू असा सूड घेतेस? हे चांगलं नाही रूपाली.

रूपाली : ए बाबा, आता तू मला उपदेश करणार आहेस का?

उदय : मी उपदेश नाही करीत रूप तुला, पण—

रूपाली : नाही नाही, करून पाहाच तू मला उपदेश! तुझी मोटारसायकल तुला डोक्यावरून घरी न्यायला लागेल—कच्...कच् दोन्ही चाकांवर ब्लेड मारली की बाऽस! [खदखदू लागते. उदय हताश होऊन बघू लागतो. तेवढ्यात तिला चाहूल लागते. तिचा चेहरामोहराच बदलतो आणि—] डॅडी आणि तुझे काका येताहेत. माझा अभ्यास पुरा झालाय म्हणून सांगायचं! मी गेले...[पटकन् जाते. उदय बघतच राहातो. तेवढ्यात बाहेरून बोलत विक्रम आणि पाठोपाठ बलराज येतात. विक्रम बोलत आत येतो. बलराज उंबऱ्याबाहेरच उभा. विक्रम येता येता म्हणतो—]

विक्रम : मला मूर्ख आणि टोणपे लोक डायरेक्टर म्हणून नको आहेत. ज्यांचा आपल्याला उपयोग आहे, जी माणसं कामाला कंटाळत नाहीत आणि मुख्य म्हणजे या इंडस्ट्रीत जे लोक रुपये-आणे-पैपेक्षा वेगळ्या बाबींचा विचार करू शकतात—

बलराज : तुझं धोरण लक्षात घेऊनच मी नावं निवडली आहेत. आज रात्री ही फाइल तू स्वतः लक्षपूर्वक वाच आणि—

विक्रम : हो हो...पण उंबऱ्यावर उभा राहून का सांगतो आहेस मला तू हे? आत तरी येशील?

बलराज : नको. मी आता निघतोच आहे. उदय, तू कसा आला आहेस? आपली गाडी—

उदय : काका, मी माझ्या मोटरसायकलवरून आलोय. गाडी अजून गराजमधून आली नाहीये. मी घेऊन येऊ का?

बलराज : काही नको. मी फिरत फिरत जाऊन घेऊन येईन.

**विक्रम** : रूपालीचा अभ्यास वगैरे छान चाललंय ना रे उदय? बाकी तू असलास म्हणजे बघायलाच नको. बलराज, याला एकदा एक्झियूटिव्हच्या केडरमधे घेऊन टाकायला हवा.

**बलराज** : त्याला अवकाश आहे अजून. तू गेलास तरी चालेल उदय. [उदय जातो. मग] धंद्याची बोलणी घटकाभर सोडून दे. दोन गोष्टींबद्दल बोलणार आहे मी तुझ्याशी!

**विक्रम** : आत येणार आहेस की बाहेरूनच बोलणार आहेस?

**बलराज** : (रोखून पहात) मी खरंच आत यावं असं मनापासूत वाटतंय का तुला?

**विक्रम** : (खोचून) शुद्ध मनानं येणार असलास तर सुस्वागतम्.

**बलराज** : तितक्याच स्वच्छ मनानं पाहाणार आहेस का तू?

[क्षणमात्र दोघेही परस्परांना रोखून बघतात. मग—]

**बलराज** : (हसून आत येत) तुझ्या घरात पाऊल टाकायचं नाही असा मी निश्चय केला होता. पण आज तू पद्मविभूषण झाला आहेस. ए ग्रेट डे फॉर अस. या वेळीं तरी मला बाहेर राहून चालणार नाही. (हस्तांदोलन करीत) अभिनंदन मित्रा, मनःपूर्वक अभिनंदन.

**विक्रम** : (कडवटपणे) आज सकाळीं उठल्या उठल्या फोनवरून एवढं बोलला असतास तरी मला धन्य वाटलं असतं!

**बलराज** : तुला ही बातमी काल रात्री कळली. माझा दोस्त पूर्वीचा राहिला असता तर तो तात्काळ धावत माझ्याकडं आला असता. पण—ऐनी वे, बेटर लेट दॅन नेव्हर.

**विक्रम** : तसा पूर्वीचा कोण जसाच्या तसा राहिलाय? मी नाही, हे तर खरंच आहे, पण तू सुद्धा पूर्वीचा राहिला नाहीयेस. उलट—

**बलराज** : स्टॉप इट! माझ्याबद्दल तुझं मन डागळलंय...नासलंय. तुझ्या तोंडून माझ्यावर चिखलफेक झालेली मला सहन होणार नाही. माझ्या शब्दावर विश्वास ठेव, शुद्ध मैत्रीशिवाय जाईकडं मी कधीही वाकड्या दृष्टीनं पाहिलेलं नाहीये.

**विक्रम** : (शुष्कपणानं) आय होप सो.

**बलराज** : होप सोऽ? (थसकून, दुखावून) याचा अर्थ तुला खात्री वाटत नाहीये, माझ्या शब्दावरही तुझा विश्वास राहिलेला नाहीये.

**विक्रम** : (उद्वेगाने) शब्द! शब्द! शब्द! शब्दातून अंतःकरणाचा तळ दिसण्याचे दिवस संपलेत बलराज, आता शब्द उरलेत फक्त विषारी मतलबावर गोंडस गवसणी घालण्यासाठी!

**बलराज** : तुझ्या गाढ विश्वासाला मी एकदम अपात्र व्हावं असं एकाएकी काय घडलंय, ते तर सांगशील?

**विक्रम** : व्यभिचार हा कधी एका रात्रीत एकदम घडत नाही. तो कधीतरी एकाएकी

उघड झाला, तरी त्याची पाळंमुळं फार दूरवर पसरलेली असतात. या बाबतीतला विश्वासघात हा मैत्रीचंच सोज्वळ रूप घेऊन चोरपावलानं घरात शिरतो.

**बलराज** : असा ठामपणानं आरोप करायला—

**विक्रम** : पुरावा! तुला पुरावा हवाय—तो देता आला असता तर तू इथं उभाच राहू शकला नसतास. व्यभिचाराला आणि विश्वासघातालाही एक उग्र दर्प असतो. ज्याचा त्याला त्याचा बरोब्बर वास येतो. माझ्यावर झालेले आघात आणि माझी दुबळी मनःस्थिती याचा तू पुरेपूर फायदा उठवला आहेस. तू नुसता मित्र राहिला नाहीस. तूच काय तो आमचा त्राता, रक्षक, मार्गदर्शक...तुझ्याशिवाय आम्ही निराधार, पांगळे, असाहाय्य...तूच काय तो पराक्रमी, कर्तबगार, अद्भुत शक्तीचा राजपुत्र... तिचं तर साक्षात दैवत...

**बलराज** : (थक्क होत) हे तू काय बोलतो आहेस विक्रम?

**विक्रम** : मी फक्त वस्तुस्थिती सांगतोय. मित्र म्हणून दुसऱ्याच्या संसारात पदार्पण करून, जो माणूस घरादाराचा देव होऊन बसतो, तो अखेर बायकोचा नैवेद्य घेतल्याशिवाय तृप्त होत नाही. जाईला माझ्याबद्दल प्रेम उरलेलं नाही, आकर्षण राहिलेलं नाही. तिचं अवघं मन तू व्यापून टाकलं आहेस. घरापासून मी तुला तोडला तरी तिच्या मनात फक्त तूच घट्ट रुजला आहेस. माझं अस्तित्वच तू शून्यवत करून टाकलं आहेस. पुन्हा एकदा मी एकाकी...एकटा राहिलोय!

**बलराज** : तू सांगतो आहेस त्यांतलं काहीएक खरं नाहीये विक्रम. पण ते तुला पटणार नाही. कारण ही सगळी भुतं तुझी तूच उभी केली आहेस. तुझ्या रूपालीनं तुझे कान भरले असले, तरी इतक्या हलक्या कानाचं असणं तुला शोभत नाही. अरे इतकं टार वेडं वात्सल्य परिणामी सर्वनाशालाच निमंत्रण देईल. जागा हो मित्रा, अजून तरी जागा हो. (खांद्यावर हात ठेवतो.)

**विक्रम** : (रागानं हात दूर करीत) समजलो. शेवटी रूपाली, माझे हलके कान आणि वेडं वात्सल्य यांवर ठपका ठेवून तू निसटून जाणार आहेस. जागाच झालोय मी. अगदी सताड उघडे आहेत माझे डोळे. गुडबाय. (पाठ फिरवतो.)

**बलराज** : (हताशपणे) आपल्यांतला संवादच संपलाय तेव्हा इथंच थांबणं मला भाग आहे. तुझे डोळे उघडणार आहेत, पण त्या वेळी फार उशीर झालेला असेल. येतो मी.

[बलराज निघून जातो. विक्रम स्वतःशीच धुमसत बोलू लागतो—]

**विक्रम** :

इतकं टार वेडं वात्सल्य परिणामी सर्वनाशालाच निमंत्रण देणार असेल,
तर जगबुडीपासून मला कोण वाचवणार आहे!
एक विश्वासघातकी मित्र की ही बदफैली बायको?
"जागा हो...डोळे उघडून पाहा ऽऽ"—

म्हणून कोणी शंखनाद करायची गरज नाही.
डोळे उघडेच आहेत. अगदी सताड उघडे.
या उघड्या डोळ्यांनी जेवढे रंगढंग पाहिले, तेवढ्यानेच दृष्टीचे पारणे फिटले.
बा ऽ स ! आता आंधळा होईन, तर दृष्टीआड तरी होईल ती छिनाल सृष्टी.
इतकी सरळ, इतकी निष्पाप, इतकी भाबडी पोर,
ओठ पिळले तर दूध निघेल इतकी कोवळी, इतकी अजाण—
काय तिचा अपराध ?
तर यांचे निर्लज्ज प्रणयचाळे तिलाही उमगले
आणि जे जळजळीत चटके बसले ते ती कळवळून बापाजवळ बोलून गेली.
आणि बाप तरी केवढा नतद्रष्ट चांडाळ ?
हलके कान त्यानं फोडून घेतले नाहीत की डोळ्यावर कातडं ओढलं नाही.
जाग येऊनही उघड्या डोळ्यानं तो पाहात बसलाय.
देवा...देवा...याही घरात पुन्हा एकदा तोच विषारी अनुभव ?
बेशरम विश्वासघात ! निर्लज्ज व्यभिचार !
बेइमानीची चाहूल लागताच कोणत्याही पुरुषानं, मित्राला आणि
बायकोला सरळ भिरकावून देऊन, आपला पुरुषार्थ सिद्ध केला असता.
मी मात्र, नुसताच जळतो आहे, आतल्या आत गुदमरतो आहे,
पण जिवाभावाच्या माणसात गुंतलेला माझा जीव सुटत नाही...तुटत नाही.
का ? का ? कशासाठी ?

[विक्रम विचारात हरवला असतानाच आतून जाई येते. तिची मुद्रा तंग आहे.]

**जाई** : इतक्यात बलराज इथं आला होता का ?

**विक्रम** : हो, येऊन गेला.

**जाई** : लागलीच गेला सुद्धा ? थांबवून घ्यायचंत त्याला.

**विक्रम** : कदाचित तुझ्याकडून आग्रह झाला असता तर तो थांबला असता !

**जाई** : निदान आज तरी तोंड गोड करायला हवं होतं त्याचं.

**विक्रम** : (खोचून) हांऽऽ तू त्याला भेटायला त्याच्या बंगल्यावर गेलीस, त्याच वेळी त्याचं तोंड 'भरपूर गोड' झालं असावं; म्हणून मग—

**जाई** : (दुखावून) शीऽ ! आपल्या बायकोबद्दल असं बोलायला काही वाटत नाही तुम्हाला ?

**विक्रम** : बायको 'आपली' राहिली असली तर वाटायचं. पण—

**जाई** : असला गलिच्छ आरोप करायला काय पुरावा मिळालाय हो तुम्हाला ?

**विक्रम** : पुन्हा पुरावा ! माणसं फार हुशार झाली आहेत. पुरावे ठेवून ते असले फंद करीत नाहीत. तरी देखील त्यांचे डोळेच त्यांना उघडे पाडतात. नुसती दृष्टभेट

झाली तरी डोळ्यात, एक दुरावा तरी उसळतो, नाहीतर ओलावा तरी भळकन् उतू जातो. ज्यांचा त्यांना तर तो उमगतोच, पण नजर पक्की असेल, तर इतरेजनांच्याही तो लक्षात येतो. विशेष करून वायाळ नवऱ्याच्या. माझ्यासारख्या.)

जाई : खोटं आहे. साफ खोटं आहे. या स्वतःच्या मनातल्या कल्पना तुम्ही माझ्यावर आरोपीत करताहात. अगदी विनाकारण.

विक्रम : (थंडपणे) तेही शक्य असेल.

जाई : असेल नाही—आहेच. तुम्ही एकदा सांगितल्यापासून मी माझं वागणं बदलून टाकलंय. माझी इच्छा नव्हती तरीसुद्धा केवळ तुम्हाला बरं वाटावं म्हणून. तुम्हाला ठाऊक आहे मी एकटी बलराजबरोबर कुठंही जात येत नाही. एकट्याला त्याला कुठं भेटत नाही. तोही आपल्या घरी येत नाही. तरीसुद्धा—

विक्रम : आज तू एकटी जाऊन त्याला भेटलीस.

जाई : एकटी नव्हेऽऽ, रूपालीला घेऊन गेले होते बरोबर मी.

विक्रम : हूंऽ! रूपाली म्हणजे एक लिंबलोणचं.

जाई : बरी लिंबलोणचं असेल. तिनंच तुम्हाला फोन केला आणि नाही नाही ते सांगून—

विक्रम : (ओरडून) शट अप्. तू बलराजला भेटायला आली आहेस यापलिकडं तिनं मला काहीही सांगितलं नाहीये फोनवर. उगीच त्या बिचारीच्या नावानं खडे फोडू नकोस.

जाई : मग तुम्ही एवढे बिथरलात कशानं ?

विक्रम : माझी सक्त ताकीद मोडून तू त्याला भेटायला गेलीस म्हणून.

जाई : पण मी त्याला भेटायला का गेले, मी त्याच्याशी काय काय बोलले हे एका शब्दानं तरी विचारलंत का त्याला ?

विक्रम : संबंध काय त्याला विचारायचा ? तो कोण ?

जाई : तो कोण ? हे—हे तुम्ही मला विचारता ? तो तुमचा मित्र. जिवलग मित्र.

विक्रम : त्याची माझी मैत्री ठार झालीय. आता तो आहे फक्त बिझिनेस पार्टनर.

जाई : तुम्ही वाकड्यात शिरलात म्हणून मीही त्याच्याशी शत्रुत्व केलंच पाहिजे का ? तो माझाही मित्र होता आणि आहे.

विक्रम : बायकोला नवऱ्याशिवाय दुसरा कोणीही मित्र असू शकत नाही...असता कामा नये, असं माझं ठाम मत झालंय.

जाई : केव्हापासून ठाम झालंय हे तुमचं मत ? साता जन्माच्या त्या दावेदारिणीनं तुमचे कान भरले तेव्हापासूनच ना ?

विक्रम : मी पुन्हा तुला बजावतोय. रूपालीला यात तू मधे आणू नकोस. लोक तुमच्याबद्दल काय काय बोलतात, तेवढंच तिनं मला सांगितलंय. तेही तिला ऐकावं लागलं

म्हणून. आपले आईवडील एकमेकाशी एकनिष्ठ असावेत असं मुलांना वाटलं तर तो गुन्हा आहे का ?

**जाई :** रूपबद्दल तुम्ही भलावण करू नका. ती कशी आहे ती मला पक्की माहीत आहे; आणि लोक तर उलट्या काळजाचे, दुतोंडी असतात. ते काय हवं ते भकतात. तेवढ्यासाठी तुम्ही मला गुन्हेगार ठरवणार आहात ? लोक तेव्हा असंही म्हणत होते की तुम्हीच राऊला चिथावून प्रियरंजनदास आणि आई यांचा खून—

**विक्रम :** (भडकून कडाडत) खोटं आहे...साफ खोटं आहे ते. राऊ तुला येऊन भेटला होता हे तू मला कधीही सांगितलं नाहीस !

**जाई :** राऊ तुम्हाला येऊन भेटला होता हे तुम्ही मला कधी सांगितलं होतं ?

**विक्रम :** तरी पण तू त्याला चिथावणी दिलीस हे मला माहीत आहे. इतकंच नव्हे, तर तू त्याला—

**जाई :** जपून आरोप करा. हे सगळं मला तुमच्याबद्दलही म्हणता येईल.

**विक्रम :** हे शहाणपण तुला बलराजनं शिकवलं वाटतं ?

**जाई :** जिथं तिथं बलराज, बलराज, बलराज ! का त्याला तुम्ही उगीच नाही नाही त्या गोष्टी चिकटवताय ? त्यानंच त्या प्रकरणातून तुम्हाला वाचवलं. तेवढंच नाही, आजवर कोणकोणत्या प्रसंगांत त्यानं आपली पाठराखण केली, किती किती संकटांतून त्यानं आपल्याला सोडवलं, ते सगळं सगळं तुम्ही विसरलात का ?

**विक्रम :** म्हणूनच तू त्याच्या प्रेमात पडलीस, हे तरी खरं आहे ?

**जाई :** प्रेम ? प्रेमाबद्दल तुम्ही काय बोलावंत ? तुम्ही उभ्या आयुष्यात फक्त एकच प्रेम पाहिलं आहे—नरमादीचं. भाऊ-बहिणीचं प्रेम तर तुमच्या गावीही नाही.

**विक्रम :** त्या बाता सोडून दे. बलराजवर तुझा जीव जडला नाहीये ? तो तुला आवडत नाहीये ? त्याच्या भेटीसाठी तुझा जीव तडफडत नाहीये ?

**जाई :** होय, होय, होय ! पण तुम्ही म्हणता, समजता, त्या अर्थानं नाही, नाही, कधीही नाही ! स्त्री-पुरुषांच्या प्रेमात सरळ, शुद्ध आणि सात्त्विक नातं असू शकतं, हे तुम्हाला कधीच कळणार नाहीये का ?

**विक्रम :** ती नाती म्हणजे ढोंगी बकवास आहे. नवऱ्याच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा तो एक राजरोस प्रकार आहे. मला पक्कं ठाऊक आहे, तुझं माझ्यावर प्रेम नाहीये. तुला मी आवडत नाहीये...

**जाई :** अहो तुमच्या काळजीनं मी अहोरात्र जळतेय हे तरी—

**विक्रम :** नाहीऽऽ तू अहोरात्र जळते आहेस, तो तुला कायमचा कधी मिळेल या चिंतेनं. तुम्ही दोघंही एकमेकावर लट्टू झालात, लंपट झालात.

**जाई :** अहो, जरा त्याच्या आणि माझ्या वयाचा आणि रूपाचा विचार करा. लट्टू आणि लंपट होण्याचं माझं आणि त्याचं वय आहे का रूप आहे ?

विक्रम : वय आणि रूप या फजूल गोष्टी आहेत. कामातुराणां न भयं न लज्जा. माझ्या आईनं त्या नराधमाची शय्यासोबत केली तेव्हा तिचं वय आणि रूप काय होतं? सांग ना, काय होतं?

जाई : पुन्हा आई! पुन्हा तुमची आई! तुम्ही काय मला तुमच्या आईच्या पंक्तीला नेऊन बसवताय का?

विक्रम : मी नाही...लोकांनी आणि तुझ्या लेकीनंच तुला बसवलंय!

जाई : (क्रोधानं) हडळ! चांडाळीण! सटवी तुमच्या आईचंच रक्त घेऊन माझ्या उदरात उपजली असली पाहिजे!

विक्रम : (भडकून) काय? काय म्हणालीस? पुन्हा बोल? (तिचे खांदे धरून घुसळत) आपली रूपाली? तुझी-माझी रूपाली? माझ्या आईचं रक्त घेऊन? शरम नाही वाटत तुला ही शापवाणी उच्चारायला? आई आहेस की वैरीण आहेस तिची? एक वाकडा शब्द बोलला, तर बलराजला मी ताडकन् तोडून टाकला आणि तू—

जाई : (सोडवून घेत) तशी मला एकदा तोडून टाका आणि द्या रस्त्यावर भिरकावून!

विक्रम : (उपरोधानं) अरे वा रे वा! तुला तोडून रस्त्यावर भिरकावून देऊ? म्हणजे मग तुम्हा दोघांना राजरस्ताच खुला झाला की! मग काय तो प्रणयी जनांचा मीलन-सोहळा तेवढा उरला! तोही थाटामाटात उरकून टाका, बँडबिंड लावून, एका झक्क लॉन पार्टीबरोबर! (पिसाट हसतो. मग एकदम क्रूर मुद्रेनं) फरगेट् इट्! मी तुला नुसती तोडून भिरकावून देणार नाहीये. मी तुझ्यावर पाहारा ठेवणार नाहीये की तुला पळूनही जाऊ देणार नाहीये. मी खलासच करून टाकणार आहे. बेइमानीबद्दल प्रथम तुला...आणि मग इतकं वेडं प्रेम करण्याबद्दल मला. (जवळ जात) जर तू माझी उरली नसलीस, तर मग तू कोणालाच मिळणार नाहीयेस. दॅट्स् फायनल.

जाई : (घाबरून मागे सरत) अहो गळ्याशप्पथ सांगते, मी तुमचीच होते आणि तुमचीच आहे...खरंच...तुमच्याशिवाय कोणी कोणी मला स्पर्शही कधी केला नाही...बलराजनं तर नाहीच नाही...

विक्रम : (तिला मिठीत घेतो. हळूहळू तिचं मस्तक कुरवाळीत, वेगऱ्या चमत्कारिक स्वरात) आय् डोन्ट बिलिव्ह...कोणाचाही विश्वास बसायचा नाही...फार फार सुंदर आहेस तू...असल्या सौंदर्याचा मोह कोणाला पडणार नाही? कोण पाप करणार नाही त्यासाठी...? असलं लावण्य कायमचं मालवूनच टाकायला हवं. (असं म्हणत तिला दोन्ही हातांनी कुरवाळीत तो अखेर आपले हात तिच्या गळ्याभोवती आणतो. तशी—)

जाई : (भेदरून) त...त...तुम्ही काय करणार आहात?

विक्रम : प्रथम तू...आणिक मग मी...

जाई : (किंचाळते) धावा...धावा...वाचवा...वाचवा मला...


[विक्रम तिचा गळा दाबू लागतो. तेवढ्यात आतून रूपाली ओरडत, किंचाळत धावत येते, "नाही...नाही...नाही...डॅडी, ममीचा जीव घेऊ नका...तिला मारू नका... ममीनं काहीसुद्धा केलं नाहीये...चांगली आहे ममी...मीच खोटं सांगितलं...मला शिक्षा करा...पण तिला ठार मारू नका...तुम्ही जीव देऊ नका....सोडा...सोडा तिलाऽ" असं ओरडत रूपाली विक्रमशी झोंबून त्याला दूर करते. त्याला मिठी मारून रडत, "नाही डॅडी, मला तुम्ही हवे आहात...तुम्ही जीव दिलात तर मी काय करू? मला कोण आहे तुमच्याशिवाय?..." असं म्हणू लागते. विक्रमला अगदी भडभडून येते. जमिनीवर कोसळलेली जाई उठून बसते. धक्का बसल्यासारखी तिची वाचा गेलीय. खुळ्यासारखी अंगाचं मोटकुळं करून ती टुकूटुकू बघत राहते. आणि—]

**विक्रम** : (रूपालीला पोटाशी घेत) नाही नाही बेटी, नाही ठार करीत मी तुझ्या ममीला. होय होय...मला जगलं पाहिजे. सगळी नाती, सगळे संबंध करपले असले तर त्याची धग या माझ्या कोवळ्या कळीला मी मुळीच लागू देणार नाही. पोरी, तुझ्यासाठी तरी मला जगायलाच हवं!

[आणि त्याच वेळी अंधार.]

**अंक दुसरा समाप्त**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
आ. क्र. ९८७९४ नों. दि. ..........
वि. ...नाट्य... क्र. ८।५।८३



अंक तिसरा

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[मागील अंकातील घडामोडीनंतर सुमारे बारा वर्षांचा काळ उलटला आहे. विक्रमने आता पन्नाशी ओलांडली आहे. पण अनेक आघात, मनस्ताप सोसून आणि अनेक चिंता, काळज्या वाहून तो आहे त्यापेक्षा खूपच वृद्ध दिसायला लागला आहे. सगळे केस शुभ्र तर झालेच आहेत, पण मुद्रेवर सुरकुत्या, रेषाही उमटल्या आहेत. आणि वयाच्या मानाने तो वाकलेलाही दिसतोय. ब्लडप्रेशर आणि मधुमेह या विकारांनी त्याला पोखरले आहे. हृदयविकाराचा एक झटका त्याला येऊन गेला आहे. मात्र त्याचा परिणाम 'राजेंद्र-विक्रम उद्योगसमूहा'वर थोडाही झालेला नाही. उलट उद्योगाचा वेलु गगनावेरी गेलेला आहे. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर गेल्या दोन वर्षांत प्रत्यक्ष कामकाजातून विक्रमने अंग काढून घ्यायला प्रारंभ केला. रूपालीने कॉलेजचे शिक्षण अर्धवट सोडले आणि विशीच्या आधीच तिने वडिलांना मदत करायला सुरुवात केली. धडाडीच्या कर्तबगारीने तिने सगळ्या उद्योगसमूहाचा कारभार खबरदारीने ताब्यात घेतलाय, एवढेच नव्हे, तर चौफेर वाढवलाय देखील. पंचविशीत रूपाली कमालीची देखणी आणि तडफदार दिसतेय. तिला उदयची खूपच मदत होतेय. कारखान्याचा सगळा व्याप रूपाली समर्थपणे हाताळू लागल्यापासून विक्रम सेवानिवृत्त होण्याचा विचार करू लागलाय. त्याचे कारभारातले दोन्ही हात भिन्न रीतीने गळून पडले आहेत. बलराजने भागीदारी सोडली आणि त्याने एक फार्म खरेदी करून शेतीत लक्ष घातले आहे. तोही व्यवसाय स्वतःपुरता त्याने टाकटुकीने चालवला आहे. बारा वर्षांपूर्वी घड-लेल्या विचित्र प्रसंगाचा धक्का बसल्याने जाईच्या डोक्यावर परिणाम झालाय. ती बोलत नाही. फक्त टकूटकू बघत राहते. मधेच खुदकन् हसते, कधी दबलेला हुंदका देते, तर कधी एकच गीत करुण शब्दांत पुन्हा पुन्हा आळवीत राहाते. पण तरीही तिला काही समज उरलेला नाही. गेल्या बारा वर्षांत विक्रमने तिला घरात तळहातावरच्या फोडाप्रमाणं जपलंय आणि सांभाळलंय आणि त्याला वाटतंय, नव्हे, त्याची खात्री आहे

की, जाई सुधारतेय...बोललेलं तिला कळतंय. पण हे फक्त त्यालाच वाटतंय. ती पूर्ववत बरी होणं अशक्य आहे, हे डॉक्टरांनी कधीच जाहीर करून टाकलंय. दयाळजी आणखी वृद्ध झालेत. तसे ते सेवानिवृत्त झाले असले तरी आता ते रूपालीच्या तैनातीत आहेत. पूर्वीच्याच निष्ठेनं, नव्या धनिणीच्या चाकरीत.

'रूपव्हिला'तील तोच हॉल. सजावटीत आणखी भर पडलीय. टेलिफोनसुद्धा अत्याधुनिक आलाय. वेळ सकाळी आठ-साडेआठची. हॉलमधे कोणीही नाही. दयाळजी फोनवर कोणाशी तरी बोलताहेत.]

दयाळ : (फोनच्या रिसीव्हरमध्ये) हूं...हूं...हूं...ते सगळं ठीक आहे, पण ताईसाहेब दिल्लीहून परत येईतोवर तुम्हाला वाट पहायलाच हवी...नाही...नाही, विक्रमजींना भेटून काही उपयोग होणार नाही. गेली दीड-दोन वर्षं ताईसाहेबच सगळा कारभार बघताहेत. हो हो, विक्रमजींची तब्येत बरोबर नसते अलिकडं...नुसत्या वयाचा भाग नाहीये; तसं काय ते पंचावन्न वर्षांचे असतील-नसतील; पण रक्तदाब आणि मधुमेह यामुळे पोखरून निघालेत. शिवाय गेल्या वर्षी एक सीवियर हार्ट अटॅक आला होता तेव्हापासून ते सांभाळून जपून असतात स्वतःला. तुम्ही विचारा त्यांना हवं तर, पण ते रूपालीताईसाहेबांच्याकडेच तुम्हाला बोट दाखवणार. हूं...हूं...हूं...नाही, ते ठीक आहे; पण ताईसाहेबांनी कारभार हातात घेतल्यापासून सारं बदललंय...हूं... हूं...हूं...तुम्ही असं पाहा, मेडिकल कॉलेजमध्ये राजेंद्र उद्योगसमूहाच्या वीस सीटस् आहेत आणि विक्रम इंडस्ट्रिजच्या इंजिनियरिंग कॉलेजमध्ये पंचवीस सीटस्. या सीटस् कामगारांच्या मुलांना द्यायला पाहिजेत असं काही बंधन नाही चालकांवर. विक्रमजींनी तो पायंडा पाडला होता इतकंच. रूपालीताईंनी कारभार हाती घेताच तो कायदा बदलला. हो, सगळ्या सीटस् त्या विकून टाकतात. तुमची पैसे खर्च करण्याची तयारी आहे का? हूं...हूं...हूं...(हसत) काहीतरी रीतसर बोला साहेब! सध्या एका सीटला काय भाव चाललाय माहीत आहे का? छे छे, लाख नव्हे, दीड लाख... रोख रकमा भरून दाराशी मंडळी हजर आहेत. चेष्टा नव्हे...हूं...हूं...हूं...बघा प्रयत्न करून. विक्रमजी सकाळी जरा फिरायला जातात. येतील एवढ्यात. दहाच्या सुमारास फोन करा. ...कोण ताईसाहेब? त्या कशाला फ्लाइटसाठी थांबतील? त्यांच्यासाठी कंपनीनं खास विमान घेतलंय की...आता दोन्हीकडचा व्याप एवढा वाढलाय म्हणजेऽऽ (हसतो.) बराय, सांगतो, सांगतो. [रिसीव्हर खाली ठेवतो. बाहेरून विक्रम प्रवेश करतो.]

विक्रम : दयाळजी, हा काय प्रकार चाललाय? कारखान्याची सगळी शिस्तच बिघडून गेलीय. मालकाला समोर पाहिल्यावर नमस्कार करायची अदबसुद्धा विसरले की काय कामगार?

दयाळ : काय झालं साहेब ?

विक्रम : सहज कारखान्यात एक राउंड मारावी म्हणून गेलो, तर माझ्याकडे ढुंकूनसुद्धा पहायला तयार नाही एकही कामगार.

दयाळ : आपल्या वेळचे कामगार बदललेत साहेब. आपल्या आजारपणामुळे गेली दीड-दोन वर्षं आपण कारखान्यात किंवा ऑफिसातसुद्धा फिरकला नाहीत; नवे कामगार ओळखणार कसे तुम्हाला ?

विक्रम : कामगारांचं सोडा. पण इतर अधिकारीवर्ग–वर्क्स मॅनेजर–कमर्शियल मॅनेजर–जनरल मॅनेजर—एकही चेहरा ओळखीचा दिसला नाही मला.

दयाळ : ताईसाहेबांनी कारभार हातात घेतल्यापासून आपल्या वेळचा सगळा स्टाफच बदलून टाकलाय त्यांनी.

विक्रम : नुसता स्टाफच बदलला नाही दयाळजी—कारखान्याची सगळी घडीच विस्कटून टाकलीय—सगळी शिस्त बिघडवून टाकलीय. अहो मी अठरा-अठरा तास राबत असे म्हणून स्टाफही तितक्याच तत्परतेनं माझ्याबरोबरीनं राबायचा. आता विड्या ओढणं, चकाट्या पिटणं आणि घड्याळाकडे नजर ठेवून माशा मारीत वेळ काढणं याशिवाय दुसरं काही चाललेलं दिसत नाही मला.

दयाळ : तुमची गोष्टच वेगळी होती साहेब. हल्लीचा काळच बदललाय. काळ बदलला तशी माणसंही बदलली. कारखान्यात हल्ली कामापेक्षा, उत्पादनापेक्षा राजकारणच जास्त चालतं. कालच चार कामगारांची आणि वर्क्स मॅनेजरची बरीच ताणाताणी झाली म्हणे. प्रकरण ताईसाहेबांकडे आलं तेव्हा उद्धटपणाबद्दल त्या कामगारांना ताईसाहेबांनी तात्काळ काढून टाकलं.

विक्रम : कामावरून काढून टाकलं ? धिस इज टू मच. एवढ्यातेवढ्या कारणासाठी आपण नोकरीतून काढून टाकीत नाही माणसांना. त्यांच्या आधी—

दयाळ : मला वाटतं साहेब, आपण त्यात पडू नये. ताईसाहेबांनी फार विचारपूर्वक हा निर्णय घेतलाय !

विक्रम : कसला डोंबलाचा विचार केलाय ताईनं ? हे प्रकरण चिघळलं तर राजेंद्र ट्रॅक्टर्समध्ये संप होईल संप, ठाऊक आहे ? मी तर आज ऐकलं की संपाची तयारी चाललेली आहे.

दयाळ : हा संप व्हावा म्हणूनच ताईसाहेबांनी जाणूनबुजून त्या कामगारांना काढलेलं आहे, साहेब.

विक्रम : संप व्हावा म्हणून ? अरे काय बोलताय काय दयाळजी ?

दयाळ : खरं तेच बोलतोय ! दोन हजार ट्रॅक्टर्स पडून आहेत कंपनीपाशी. मंदीमुळे मालाला उठावच नाही.

विक्रम : मंदी ? अशी अचानक मंदी...

दयाळ : मंदी आहे असं ताईसाहेबांचंच म्हणणं आहे साहेब. त्यामुळे चारसहा महिने संप होऊन फॅक्टरीला टाळेबंदी झाली तर मॅनेजमेंटला हवीच आहे.

विक्रम : हे कुणाचं डोकं ? हे कसलं सडलेलं नीतिशास्त्र ? ही कसली विकृत व्यापारी दृष्टी ? आपण उत्पादक आहोत की विध्वंसक ? राजेंद्र उद्योगसमूहाची परंपरा काय आहे हे तुम्ही कुणी समजावून सांगितलं नाहीत का तिला ?

दयाळ : कोण समजावून सांगणार ? मी एकदा तसा प्रयत्न केला तर मलाच त्यांनी ठणकावून सांगितलं, 'माझ्या आजोबांचं आणि वडिलांचं नीतिशास्त्र मला सांगू नका. ते संत होते. मी नाही. मी फक्त व्यवहार जाणते.'

विक्रम : अरे हा काय व्यवहार आहे ? ही बदमाशी आहे बदमाशी. तिला एकदा कडक शब्दांत समज द्यायलाच हवी !

दयाळ : त्या भानगडीत आपण पडू नये. आणि पडायचंच ठरवलंत तर निदान हे सगळं राजकारण मी आपल्याला सांगितलं म्हणून माझं नाव तरी घेऊ नये.

विक्रम : हं...आय सी.

[वरून बाळाराम जाईला घेऊन येतो. जाईची मुद्रा, आविर्भाव ठार वेड लागलेल्या माणसासारखा.]

जाई : (शून्यवत मुद्रेने)

मज सदन नको, नको जगाची नाती । मी आता नाही नाही
मज चंद्र नको, नको चांदण्या राती । मी आता नाही नाही
जाहला रिता देव्हारा
संसार जयास्तव सारा
तो माझा जीवनतारा
चिररात्र अशी देऊनिया मज जाई । मी आता नाही नाही.

विक्रम : (व्याकूळ) नको नको जाई, हे गाणं म्हणू नकोस ! हे शब्द ऐकले की कासावीस होतो, जीव गलबलून जातो माझा. अग हे गाणं नाही...खंजीर आहे खंजीर—माझ्या काळजात रुतलेला. हे गाणं म्हणू नकोस म्हणून किती वेळा सांगितलं तुला ! बारा वर्षं होऊन गेली त्या प्रकाराला. मी वेड्यासारखा तुझा संशय घेतला—मत्सरानं माझं डोकं फिरलं होतं त्या वेळी—त्या भ्रमिष्ट अवस्थेतच मी तुझ्या जीवावर उठलो—चुकलं माझं. किती वेळा मी माझी चूक कबूल केली. क्षमा मागितली. माझ्या अपराधाची शिक्षा मी भोगली तेवढी आता पुरे नाही का झाली ? अग मी तुझी क्षमा मागितली. बलराजचे तर अक्षरशः पाय धरले. पण तो मला सोडून गेला तो गेलाच. आणि आता तू त्या धक्क्यानं अशी ठार वेडी होऊन बसलीस. बोलत नाहीस—कधी हसतेस—कधी रडतेस—नाहीतर मग अंगाचे फळके सोलून

काढणारं हे गाणं—मज सदन नको–नको जगाची नाती–मी आता नाही नाही! बाळाराम, हिचा नाष्टा झाला ना रे?

बाळाराम : झाला साहेब.

विक्रम : ठीक आहे, जा तू. [बाळाराम जातो.] दयाळजी, बलराज यायचा आहे आत्ता. लक्षात आहे ना?

दयाळ : नक्की येणार आहेत का? नाही तर येतो येतो असं ते म्हणतात, पण...

विक्रम : आज आल्याशिवाय तो रहायचा नाही. आणि आज आला नाहीच तर आता त्याच्यासाठी थांबायला मला धीर नाही. आता ताईचं आणि उदयचं लग्न जाहीर करून टाकल्याशिवाय राहाणार नाही मी. माझं काही बरंवाईट होण्याआधी निदान ताईचं लग्न तरी डोळे भरून पहावं अशी एकच इच्छा उरलीय आता!

दयाळ : उदयरावांची संमती असेलच?

विक्रम : उदयच्या संमतीचा प्रश्नच नाही. तो काही बलराजसारखा हट्टी नाही. शहाणा आहे. समंजस आहे. तो मला म्हणाला, "रीत म्हणून तुम्ही काकांना विचारा. ते नाहीच म्हणाले तर हुज्जत घालू नका. सरळ मुहूर्त ठरवून टाका."

दयाळ : मग बलराज आज नक्कीच येतील.

विक्रम : का असं का बोलता? बलराज या लग्नाला विरोध करण्यासाठी...

दयाळ : नाही नाही...माझ्या बोलण्याचा असा अर्थ घेऊ नका साहेब. मी आपलं सहज बोलून गेलो.

विक्रम : हं...पाहू या. तो हट्टाला पेटला तर मीही तितकाच हट्टी आहे. पण आपल्याकडून काही चुकायला नको. तुम्ही त्याच्या स्वागतासाठी बाहेर उभे रहा. खरं म्हणजे ही बरी असती तर...नाही नाही, रडायचं नाही राणी. अग तू बरी होणार...नक्की बरी होणार...मीसुद्धा बरा होणार...मग पूर्वीच्या सगळ्या चुका सुधारून आपण... [रूपाली प्रवेश करते.]

रूपाली : हाय डॅडी...आणि हे काय? ममीला खाली कुणी आणलं? बाळाराम—बाळारामऽ

विक्रम : आरडाओरडा करून सगळा मॅन्शन डोक्यावर घेऊ नकोस. चोवीस तास चौथ्या मजल्यात डांबून ठेवायला ती काय कैदी आहे काय? जरा पाय मोकळा करायला आणली त्यानं तिला खाली, तर काही फार मोठा गुन्हा नाही केला बाळारामनं!

रूपाली : मी सुद्धा ममीला चौथ्या मजल्यावर ठेवतेय म्हणजे गुन्हा नाही करीत! ममीची अवस्था काय आहे डॅडी? अशा अवस्थेत तिला गडीमाणसांच्या समोर, बाहेरच्या माणसांच्यासमोर आणणं बरं दिसतं का? नस्ती चर्चेला जागा. आधीच लोक काय काय बोलतात!

विक्रम : काय बोलतात लोक?

रूपाली : ते ऐकून उगीच स्वतःचाच मनस्ताप वाढवून घ्यायचाय का डॅडी?

विक्रम : लोक काय बोलतात रूपाली?

रूपाली : ठीक आहे, ऐकायचं तर ऐका! लोक बोलतात तुमच्यामुळेच ममीची अशी अवस्था झालीय. तुम्ही तिचा जीव घ्यायला लागलात—म्हणून त्या धक्क्यानं—

विक्रम : माय गॉड...माय गॉड...

रूपाली : तुम्ही शांत व्हा, शांत व्हा पाहू आधी. म्हणूनच मी तुम्हाला सांगणार नव्हते. ममीला मी चौथ्या मजल्यावरच ठेवते ती यासाठीच. आणि तिथं काय कमी केलंय मी तिला. दोन नर्सेस आहेत तिच्या दिमतीला. शिवाय बाळाराम आहे. ते तान्ह्या मुलासारखी तिची काळजी घेतात. तिची आंघोळ-कपडे जेवणखाण-औषधं सगळं व्यवस्थित होतं. दिवसातून एकदा डॉक्टर तपासून जातात....यापेक्षा जास्त काय करायला पाहिजे मी? तुम्ही उगीच मनस्ताप करून घेऊ नका. चिडायचं नाही—संतापायचं नाही, डोक्याला निष्कारण ताप करून घ्यायचा नाही म्हणून डॉक्टरांनी किती वेळा सांगितलंय तुम्हाला? अहो तुम्हाला दोन सीव्हिअर हार्ट-ॲटॅक्स येऊन गेलेत. विसरलात तुम्ही डॅडी?

विक्रम : ते खरं आहे पोरी, पण—

रूपाली : डॅडी, तुमचा मला केवढा आधार आहे याची तुम्हाला कल्पना नाही का? मला पोरकी आणि एकाकी करायचं ठरवलंयत का तुम्ही?

विक्रम : नाही...नाही...तसं नाही बेटी.

रूपाली : बाळाराम...ममीला वर घेऊन जा. आणि लक्षात ठेव, माझ्या परवानगी-शिवाय तिला परत खाली आणायचं नाही.

बाळाराम : जी! [जाईला घेऊन जातो. इतक्यात बाहेरून बलराज प्रवेश करतो.]

विक्रम : अरे बलराज—ये ये मित्रा! (कडकडून मिठी मारतो.) आज इतक्या दिवसांनी... नव्हे, इतक्या वर्षांनी तुला आठवण झाली माझी.

बलराज : तुझी आठवण झाली नाही असा एक दिवस कधी गेला नाही; मग तुला येऊन भेटावं असं वाटल्यावाचून कसं राहील!

विक्रम : मग का नाही आलास? कुणी अडवलं होतं तुला?

बलराज : ते तू स्वतःलाच विचार!

विक्रम : माझं मन केव्हाच स्वच्छ झालंय. पण तू मात्र मागचं काहीएक विसरायला तयार नाहीस. मी अक्षरशः तुझे पाय धरून तुझी क्षमा मागितली त्यालाही बारा वर्षं उलटली, पण तरीदेखील—

बलराज : छे छे मित्रा, तुझं निदान अगदीच चुकलं! तुझं मन स्वच्छ आहे म्हणून तर मी तुझ्या लोभात पडलोय, आणि मागचं म्हणशील तर ते मी केव्हाच विसरलोय

तुझी चूक तुला कळून आली इथेच आपलं भांडण संपलं. क्षमा मागण्याचीसुद्धा गरज नव्हती. तुझ्या संशयी स्वभावानं बिचारी जाई मात्र—

**विक्रम** : माझं काळीज आधीच फाटून गेलंय बलराज; जुन्या खपल्या काढून मला आणखी रक्तबंबाळ करू नकोस!

**बलराज** : ऑल राइट, ऑल राइट! तो विषयच बदलूया आपण. हाऊ इज बिझनेस?

**विक्रम** : या अशा प्रकृतीमुळे मी तर आता निवृत्त झाल्यासारखाच आहे. गेल्या दीडदोन वर्षांत आज पहिल्यांदा कारखान्यात गेलो—अरे हो—रूपाली, राजेंद्र ट्रॅक्टर्स-मधल्या चार कामगारांना तू काढून टाकलं आहेस असं कानावर आलंय माझ्या.

**रूपाली** : खरं आहे ते.

**विक्रम** : मंदीमुळे दोन हजार ट्रॅक्टर्स पडून आहेत काय कारखान्यात?

**रूपाली** : हो. तेही खरं आहे.

**विक्रम** : अस्सं. म्हणून मॅनेजमेंटला संप झाला तर हवाय. आणि कामगारांनी संप पुकारावा म्हणून मुद्दाम तुम्ही या चार कामगारांना अकारण काढून टाकलंय.

**रूपाली** : हे कुणी सांगितलं तुम्हाला?

**विक्रम** : कुणीही सांगितलेलं असो. हे खरं आहे की नाही एवढं सांग.

**रूपाली** : खरं आहे.

**विक्रम** : माझ्या पपांच्या आणि माझ्या नीतिमत्तेत हे धोरण बसत नाही रूपाली.

**रूपाली** : डॅडी, तुम्ही या प्रकरणात लक्ष घालू नका.

**विक्रम** : तसं चालणार नाही बेटी. मी जिवंत आहे तोवर मी लक्ष घालणार. आपल्या घराण्याचं नाव बदनाम होईल असं मी काहीही होऊ देणार नाही. पपांच्या आणि माझ्या—

**रूपाली** : आजोबा संत होते आणि तुम्हीही संत आहात डॅडी, पण—

**विक्रम** : तू संत नाहीस. तुला फक्त व्यवहार कळतो. कुणी, कुणी हे स्वार्थानं बरबटलेलं तत्त्वज्ञान भरवलं तुझ्या डोक्यात?

**रूपाली** : कुणी भरवायला कशाला पाहिजे? कुणी भरवलेलं भरवून घ्यायला मी काही कुक्कुलं बाळ नाही डॅडी. माझे निर्णय घ्यायला मी समर्थ आहे.

**विक्रम** : पण तुझे निर्णय मॅनेजिंग बोर्डानं कसे मान्य केले? कुणीच तुला आपल्या घराण्याची व्यापारनीती समजावून सांगितली नाही? कुणीही विरोध केला नाही तुझ्या या अविचारी निर्णयाला?

**बलराज** : कोण विरोध करणार विक्रम! बोर्डावर तू नाहीस, मी नाही. आणि तुझ्यामाझ्या वेळच्या सगळ्या डायरेक्टर्सना रूपालीनं केव्हा या ना त्या उपायानं मोडीत काढलंय. आता नवं मॅनेजिंग बोर्ड आहे.

**विक्रम** : नवं मॅनेजिंग बोर्ड? मला याचा थांगपत्ता कसा लागला नाही?

बलराज : गेली दीड-दोन वर्षं तू हृदयविकारानं बिछान्याला खिळून होतास. रूपालीनं तुझ्याभोवती उभारलेल्या कडेकोट बंदोबस्तातून बाहेरच्या बातम्या तुझ्यापर्यंत पोचवणार कोण?

रूपाली : कारखान्यातल्या अडीअडचणी सांगून डॅडींना उगीच त्रास होईल असं काही करू नका, म्हणून डॉक्टरांनीच सक्त ताकीद दिलेली होती.

बलराज : बरोबर आहे. म्हणूनच परस्पर नवं मॅनेजिंग बोर्ड अस्तित्वात आलं. जुने जाणते निष्ठावान गेले आणि त्यांच्या जागी आले कोण? विठ्ठलभाई सुरतवाला, छगनलाल गुंडेचा आणि लॉरेन्स डिसिल्वा.

विक्रम : माय गॉड—हे सट्टेवाले, काळाबाजारवाले आणि स्मगलर्स. हे चोर, बदमाष, लफंगे.

रूपाली : कुणी सांगितलं डॅडी, हे चोर बदमाष आणि लफंगे आहेत म्हणून?

विक्रम : हे काळ्याचे पांढरे उन्हात पिकून झाले नाहीत बेटी! अशा सैतानांची संगत जोडल्यावर दुसरं काय होणार? बेटी, तुझ्या आजोबांनी आणि मी रक्ताचं पाणी करून फक्त सचोटीच्या बळावर हा उद्योग उभा केलाय. या देशाचं भवितव्य घडवण्याच्या महान कार्यात आपलाही हातभार लागलाच पाहिजे, या जिद्दीनं. तू भोवती जमा केलेले स्वार्थी भुंगे हा उद्योग तर पोखरून टाकतीलच, पण स्वतःच्या दीडदमडीच्या फायद्यासाठी या देशाचं दिवाळं फुंकायलाही कमी करणार नाहीत!

रूपाली : देशावीरा असलं काही मोठं बोलू नका डडी. देशाची काळजी वहायला मी काही देशभक्त वगैरे नाहीये. मी 'मी' आहे. ज्या वेळी जे मला माझ्या फायद्याचं वाटेल, ते मी करणार आहे. सगळ्या इंडस्ट्रीचा कारभार तुम्ही माझ्यावर सोपवलाय ना; मग मला माझ्या पद्धतीनं तो करू द्या. तुम्ही उगाच चिंता करू नका. स्वस्थ आराम करा. तुम्ही मला आणखी खूप वर्षं हवे आहात डॅडी—अच्छा, मी जरा वर जाते. चल रे उदय. [दोघे जातात.]

विक्रम : हं...हे लक्षण काही ठीक दिसत नाहीये...का बलराज, तू गप्प का?

बलराज : गप्प का? (विषण्ण हसतो.) खरं सांगू विक्रम? तुझ्याशी एक तर तुला प्रिय पण खोटं तरी बोलायला हवं. नाहीतर खरं पण फार अप्रिय तरी बोलायला हवं. आणि हे दोन्ही टाळायचं तर मग गप्प राहाणं एवढा एकच मार्ग उरतो नाही का?

विक्रम : इंडस्ट्री सोडून शेती करायला लागल्यापासून तू काहीतरी कोडं घातल्यासारखा बोलायला लागला आहेस!

बलराज : कोडं वगैरे काही नाही. कोडं असतं कारखानदारीत. कारखान्यातली अजस्र यंत्रं जितकी गुंतागुंतीची त्यापेक्षा कारखानदारी हजार पटीनं जास्त गुंत्याची, जास्त कोड्यात टाकणारी. शेती त्यामानानं फार सरळ, साधी, फार शांत, फार निर्मळ.

विक्रम : अरे वा...तुझ्या फार्मवर यायलाच हवं एकदा!

बलराज : मुख्य विषयाचा शेवट कधीच झालाय विक्रम.

विक्रम : तू पुन्हा कोड्यात बोलायला लागलास!

बलराज : कोड्यात वगैरे काही नाही. मी अगदी सरळ आणि स्वच्छ बोलतोय. रूपालीशी लग्न करायचंच असं उदयनं ठरवलं असेल तर त्याचा तो स्वतंत्र आहे. मात्र या आत्मघाताला मी त्याला संमती देणार नाही—कधीही नाही!

विक्रम : रूपालीशी लग्न म्हणजे उदयचा आत्मघात आहे असं तू समजतोस?

बलराज : होय मित्रा, दुर्दैवानं माझी तशी खात्री झालीय!

विक्रम : बलराज, अरे रूपालीला तू समजतोस तरी काय?

बलराज : ते शेवटचं अप्रिय सत्यही तुला सांगून टाकतो! तुझी रूपाली बुद्धिमान आहे, तडफदार आहे, कर्तबगार आहे; पण तितकीच ती स्वार्थी आहे, पाताळयंत्री आहे आणि छिनाल आहे.

विक्रम : (भडकून) बलराज!

बलराज : स्वार्थासाठी जगातला कोणताही गुन्हा करायला ती कचरणार नाही. या उद्योगसमूहाची प्रतिष्ठा तर ती धुळीला मिळवणारच आहे, पण तुला आणि उदयलाही ती—

विक्रम : (क्रोधाने थरथरत) गेट आउट—चालता हो! आधी चालता हो या घरातून!

बलराज : आपल्या भेटीचा हा शेवट गृहीत धरूनच आलो होतो मी...गुड बाय!

रूपाली : (वरून धावत येते) डॅडी...डॅडी...आय ॲम प्राउड ऑफ यू. तुम्ही शांत व्हा...शांत व्हा. काकांचं बोलणं मुळीच मनावर घेऊ नका. यापुढे मी तुम्ही सांगाल तशीच वागेन. कारखान्याचे निर्णय तुमच्या मनाप्रमाणेच होतील!

[त्याच वेळी अंधार.]

## प्रवेश दुसरा

[काही महिने उलटले आहेत. तोच हॉल. एक सायंकाळ. दयाळ आणि बाळाराम बोलत येतात.]

बाळाराम : साहेबांचा काही पत्ता लागला?

दयाळ : आं?

बाळाराम : मी विचारलं, साहेबांचा काही ठावठिकाणा लागला? आज दोन दिवस झाले घर सोडून निघून गेलेत.

दयाळ : हो. त्या वेळी मी नेमका घरात नव्हतो. चिडून असं अगदी घर सोडून जाण्याइतकं काय झालं तरी काय बाळाराम?

बाळाराम : कामगारांचा हा संप लांबलाय ना इतके महिने. साहेब त्यावरून ताईसाहेबांना काही बोलले. शब्दानं शब्द वाढला. साहेब चिडून बोलले. ताईसाहेबही उलटून काहीतरी बोलल्या आणि रागाच्या भरात साहेब गाडी घेऊन जे गेले ते अजून त्यांचा पत्ता नाही. आमची काही छाती नाही, पण तुम्हीच ताईसाहेबांना सांगितलं तर—

दयाळ : मी सांगितलं नाही असं वाटतं तुला? काय म्हणाल्या माहिती आहे? म्हणाल्या, "रुसायफुगायला डॅडी काही आता लहान मूल नाहीत. गेले तसे येतील परत. तुम्हाला त्यांची एवढी काळजी वाटत असेल तर तुम्ही जा शोधायला त्यांना. त्यांच्याबरोबर लपंडाव खेळायला मला वेळ नाही!"—काय बोलणार यावर!

[बाळाराम कपाळाला हात लावीत जाऊ लागतो. दयाळ त्याला हाक मारीत म्हणतात—]

दयाळ : बाळाराम, हा तुझा या महिन्याचा पगार.

बाळाराम : का? आज पगार वाटायची तुमच्यावर पाळी आली साहेब?

दयाळ : काय करणार बाबा. राजेंद्र ट्रॅक्टर्सचा संप सुरू झाला आणि प्रकरण चिघळत चिघळत या उद्योगसमूहाचे सर्व कारखाने संपाच्या चक्रात सापडले. सर्व कारखान्यांना टाळी लागून आज सहा महिने झाले. कामगारांचे नेते स्वतःच्या स्वार्थासाठी ताठ आणि ताईसाहेब स्वतःच्या अहंकारापायी ताठ. परवा राजेंद्र ट्रॅक्टर्सच्या फाटकातच एका कामगाराचा खून झाल्यापासून तर प्रकरण पार हद्दीबाहेर गेलंय. युनियनच्या एका कार्यकर्त्याशी आपला बंगल्यावरचा मुनीम बोलत होता अशी नुसती बातमी कुणी ताईसाहेबांना दिली; लगेच तिथल्या तिथे त्याला नोटिस!—पैसे मोजून घेतलेस ना?

बाळाराम : मोजायचे कशाला साहेब?

दयाळ : देताना-घेताना पैसे नेहमी मोजावेत. बरं, हे आणखी घे.

बाळाराम : आणखी पैसे कशाला साहेब?

दयाळ : आणखी एक महिन्याचा पगार.

बाळाराम : बोनस?

दयाळ : नाही.

बाळाराम : ॲडव्हान्स?

दयाळ : नाही. नोटिशीचा पगार. आजपासून ताईसाहेबांनी तुला कामावरून कमी केलेलं आहे.

बाळाराम : कामावरून कमी केलं? का?

दयाळ : जाईला चौथ्या मजल्यावरून खाली आणायचं नाही असा ताईसाहेबांनी तुला

सक्त हुकूम दिला होता ना? मग आज सकाळी तू तिला खाली का घेऊन आलास?

बाळाराम : साहेब, अहो चौथ्या मजल्यावर कोंडल्यासारखं होतं त्यांना. जीव गुदमरून जातो. कासावीस होतात. चेहरा कसनुसा करतात.

दयाळ : गच्चीवर फिरवत नाहीस का त्यांना तू?

बाळाराम : फिरवतो...दिवसातून दोनदा फिरवतो. पण काल संध्याकाळी माझ्या हातातून निसटल्या आणि वेडाच्या भरात गच्चीवरून खाली उडी मारायला लागल्या. धावत जाऊन मी वेळीच सावरलं म्हणून बचावल्या. कसं गच्चीवर नेणार त्यांना? गच्चीला कुलूप ठोकलं. आणि आज सकाळी पाय मोकळे करायला खाली आणलं. माझं काय चुकलं साहेब?

दयाळ : चुकलं काय? चुकलं हेच की तू ताईसाहेबांचा हुकूम मोडलास. जाई गच्ची-वरून उडी मारायला लागली होती हे आधीच ताईसाहेबांना सांगितलं असतंस तर काय निर्णय घ्यायचा तो त्यांनी घेतला असता. तू स्वतःचं डोकं वापरून जाईला खाली का आणलंस? शिक्षा जाईला खाली आणल्याबद्दल नाही, ताईसाहेबांचा सक्त हुकूम मोडल्याबद्दल आहे. समजलास? कायदे करणाऱ्यांना दुसऱ्या कुणी कायदा हातात घेतलेला खपत नाही बाळाराम.

बाळाराम : मी काय कायदा हातात घेतला साहेब? मी चक्क बाईसाहेबांना—

दयाळ : तिथेच चुकलास! अरे चाकरी करायची म्हणजे ज्याच्या हातात सत्ता त्याची आज्ञा प्रमाण. का, कशासाठी असले प्रश्न विचारायचे नाहीत. स्वतःचं डोकं चालवायचं नाही, की मन विरघळू द्यायचं नाही. अरे तू नोकर आहेस, पण मी जाईचा बाप आहे बाप. सगळं पहातोय. सगळं समजतंय. माझं काळीज पिळवटून निघत नसेल? पण मी गप्प आहे.

बाळाराम : मी कानाखाली आवाज काढीन. पायतानानं टकुरं सडकीन. बत्तिशी फोडून हातात ठेवीन.

दयाळ : कुणाची? कोणाची बत्तिशी फोडशील तू?

बाळाराम : माझ्या पोटच्या पोरीचे जो कुणी असे हाल करील त्याची.

दयाळ : चाकराच्या तोंडी अशी माजोरी भाषा शोभत नाही बाळाराम. हा तुझा नोटिशीचा पगार. ताईसाहेबांच्या हुकुमाप्रमाणे मी त्यातले काही पैसे कापून घेणार आहे. जाईला गच्चीत फिरवताना ती तुझ्या हातातून निसटली म्हणून दंडाचे हे दहा रुपये. ताईसाहेबांच्या परवानगीशिवाय तू गच्चीच्या दाराला कुलूप घातलंस म्हणून दंड दहा रुपये. आणि आता माझ्यापुढे आगाऊपणानं बोललास म्हणून दंड रुपये दहा.

बाळाराम : अहो पण—

दयाळ : आणि हे दहा रुपये यापुढं आगाऊपणानं माझ्यासमोर बोलू नयेस यासाठी डिपॉझिट म्हणून.

बाळाराम : अहो पण दयाळजी—

दयाळ : मी वॉर्निंग दिली असताना सुद्धा तू माझ्यासमोर बोललास म्हणून दंड दहा रुपये!

बाळाराम : च्या आयला—

दयाळ : माझ्या समोर 'च्या आयला' म्हणालास म्हणून दंड दहा रुपये. असे सत्तर रुपये वजा जाता उरलेला हा तुझा नोटिशीचा पगार. [बाळाराम खिशातून दारूची बाटली काढून पितो.] हे काय आहे?

बाळाराम : याला फेणी म्हणतात साहेब. गोव्याची. आपला ड्रायव्हर डिसोझा सकाळीच आला गोव्याहून, त्यानं आणली माझ्यासाठी खास. ड्यूटी संपवून घरी गेल्यावर फोडणार होतो; पण ड्यूटी तुम्ही कायमचीच संपवलीत, तेव्हा इथेच सेलिब्रेट करतो. हांऽऽ त्याला काय!

दयाळ : बाळाराम, माझ्यासमोर तू—

बाळाराम : कुणाच्या बापाची भीती आहे साहेब? आपण काही तुमचे नोकर नाही आता! (पितो.)

दयाळ : अरे अरे, या वास्तूत उभा राहून दारू ढोसतोस तू? तुला काही लाजलज्जा, शरम?

बाळाराम : दयाळजी, साहेब घर सोडून गेले आणि त्यांच्याबरोबर या घरातली लाजलज्जा आणि शरमही गेली. अहो बाटली तशी मजा आणि मालकीण तशी प्रजा. माझ्या दारूचं काय सांगता दयाळजी! रूपालीताईसाहेबांच्याबद्दल लोक बाहेर आणखी काय काय बोलतात ते तुम्हांला माहीत नसलं, तर कारखान्यातल्या कोणत्याही कामगाराला जाऊन विचारा.

दयाळ : हे तुझे पैसे घे आणि चालू लाग—

बाळाराम : तेही ठेवून घ्या साहेब. टक्कुऱ्यावर एक केस राहिला नसला तरी टक्कुऱ्यामागचे केस फार वाढलेत तुमचे. कापून घ्या आणि सलूनवाल्याला द्या हे.

दयाळ : माझे केस कापायला इतके पैसे लागत नाहीत बाळाराम.

बाळाराम : वर टीप द्यावी लागेल साहेब.

दयाळ : टक्कल भादरायला इतके पैसे आणि वर टीप कशाला?

बाळाराम : टक्कल भादरायला जास्त काळजी घ्यावी लागते साहेब. तुम्ही श्रीमंत, मी गरीब, तरी पण बँकेचा दाखला देतो साहेब. बँकेत खातं गच्च भरलेलं असलं की पैसे काढताना काळजी घ्यायचं कारण नसतं. पण खातं टकलासारखं उघडंबोडकं झालं की पैसा पैसा काढताना विचार करावा लागतो माणसाला. टकलाचा एक एक

केस काढताना किती त्रास होतो बिचाऱ्याला. त्याला एवढी बक्षिसी पाहिजेच. पण तुम्ही कसचे बक्षीस देता राव! प्रेताच्या टाळूवरचं लोणी चाटून खाणारे तुम्ही—

दयाळ : तू चालायला लाग इथून! फार माजलास काय?

बाळाराम : कष्ट करून भाकरी मिळवणाऱ्या माणसाला कधी मजा येत नाही साहेब. धन्याची खुशामत करून उष्टी शिरापुरी खायला चटावलेल्या हांजीखोरानांच—

दयाळ : बरं बरं, कळलं! तुझं गाठोडं उचल आणि आजच्या आज बंगल्याबाहेर हो! [बाळाराम जाऊ लागतो.] बाळाराम, हे तुझे सगळे पैसे घेऊन चल. तुझे सत्तर रुपये कापून मला काय करायचंय? उगीच गम्मत केली रे थोडी तुझी.

बाळाराम : मीही तुमची गम्मतच करीत होतो साहेब. नाहीतर कष्टाचे पैसे जातात कुठे? आमच्या घरगडी युनियनकडून नोटिस मारून वसूल करून घेतले असते मी. आपलं कायदेशीर काम असतं साहेब.

दयाळ : मला कायदा शिकवण्यापर्यंत मजल गेली काय रे तुझी?

बाळाराम : कायद्याची मजल जरा लांबची झाली का साहेब? मग त्या अलीकडची बेकायदेशीर मजल सांगतो. तुम्ही काही चोवीस तास या महालात दडी मारून बसणार नाही साहेब. कधीतरी रस्त्यावर यालच. माझ्या दंडाची बेटकुळी तुम्ही कधी बघितलीत? नाही साहेब. टणाटणा उड्या मारते. तिचं नाचकाम बघून सत्तरच काय, शंभर रुपयांचा दौलतजादा कराल तुम्ही!

दयाळ : कोपरांपासून नमस्कार आहे बाबा तुला! जा तू आता इथून.

बाळाराम : रागावू नका साहेब. कमीजास्त बोललो असेन तर संभाळून घ्या. अहो शेवटी आम्ही नोकर, तुम्ही नोकरच. आम्ही चटणीभाकरीचे, तुम्ही शिरापुरीचे. आम्ही निढळाच्या घामाचे, तुम्ही चामडीतल्या चरबीचे. आम्ही काबाडकष्टाचे, तुम्ही हांजीखोरीचे. अच्छा. (जातो.)

दयाळ : घर फिरलं की घराचे वासे फिरतात ते असे. पण याचंही बरोबरच आहे. दुधाच्या भरलेल्या पात्रात पालीचं गरळ पडावं आणि सगळं दूध विषारी व्हावं तसं या घराचं झालं आहे. आज चार पिढ्या या घराची चाकरी करतो आहे मी. मातीतून उद्योगाचा महाल उभा करणारे शिवशंकर राजेंद्र, बदफैली असूनही या उद्योगाला प्राणपणाने जपणारे प्रियरंजन, पित्याच्या पावलावर पाऊल टाकून शून्यातून उद्योगसमूह उभा करणारे विक्रमजी...कुठे ते रथी-महारथी आणि कुठे अमृताच्या बीजातून विषवल्ली जन्माला यावी तशी ही रूपाली! एक आंबा सडका निघाला की तो सगळी आढी सडवून टाकतो. हा सगळा उद्योगसमूहच हिनं पार आमूलाग्र सडवून टाकला आहे. दिवसाढवळ्या या वास्तूत नोकरानं दारू ढोसण्याचा उन्मत्तपणा करावा आणि मी तो असाहाय्यपणे पहावा यासारखं दुर्भाग्य ते कोणतं? या म्हाताऱ्या डोळ्यांना आणखी काय काय पहावं लागणार आहे?

[बलराज आणि ड्रायव्हर विक्रमला घेऊन येतात. विक्रमच्या डोक्याला बँडेज बांधलेले व अंगावरच्या कपड्यांवर रक्ताचे डाग आहेत.]

**बलराज** : सावकाश...सावकाश...

**दयाळ** : काय झालं ? काय झालं ?

**बलराज** : काही नाही...त्याला स्वस्थ बसू द्या जरा. गरम गरम कॉफी घेणार का विक्रम ? बरं वाटेल तुला. [तो गप्प.] ठीक आहे. आराम कर जरा वेळ. (दयाळला) दोन दिवसांपूर्वी अचानक माझ्या फार्मवर आला. फार विचित्र मनःस्थितीत होता.

**दयाळ** : हो. हा संप चाललाय ना. ताईसाहेबांशी थोडा वाद झाला.

**बलराज** : त्यानं सांगितलं मला सगळं. रूपालीच्या वागण्यानं फार दुखावला गेलाय तो.

**दयाळ** : तुमचा विरोध असतानासुद्धा साहेबांनी हट्टानं ताईसाहेबांचं लग्न उदयरावांशी लावून दिलं. तुम्ही दोघांनी एकमेकांचं नाव टाकलंत, आणि तरीदेखील साहेब तुमच्या फार्मवर स्वतः होऊन आले म्हणजे...

**बलराज** : त्यात आश्चर्य करण्यासारखं काय आहे दयाळजी ! अशा मनःस्थितीत तो माझ्याकडे येणार नाही तर दुसऱ्या कुणाकडे जाणार ? जाईची तशी अवस्था. माझ्याशिवाय त्याला जिवाभावाचं आहे का कुणी जगात ?

**दयाळ** : आलेच होते तर महिना-पंधरा दिवस फार्मवर का नाही ठेवून घेतलंत त्यांना ? मनाला स्वस्थता तरी मिळाली असती थोडी.

**बलराज** : अहो त्याचं सगळं मन गुंतलंय इथे. जेमतेम एक दिवस राहिला आणि लागला तगमग करायला. त्यात त्या कामगाराच्या खुनानंतर काही कामगार राजेंद्र ट्रॅक्टर्सच्या फाटकासमोर आमरण उपोषणाला बसल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचली आणि तडक इकडे यायचं म्हणून हट्ट धरून बसला. इथे घेऊन आलो तर म्हणाला, 'गाडी आधी राजेंद्र ट्रॅक्टर्सच्या फाटकापाशी ने. मला त्या उपोषणाला बसलेल्या कामगारांना भेटायचंय.' तिथे घेऊन गेलो. त्या कामगारांशी चांगलं अर्धा-पाऊण तास बोलत बसलो. आणि अचानक पाचपन्नास माणसांनी येऊन दंगल सुरू केली. दगडफेक, लाठीमार—एकच हलकल्लोळ नुसता. पोलिसांना गोळीबार करावा लागला शेवटी. त्या दंग्यातच लाठीचा एक फटका चुकून याला लागला.

**विक्रम** : चुकून नाही बलराज, चुकून नाही. माझा कपाळमोक्ष करण्यासाठी मुद्दाम घातलेला घाव होता तो. माझ्या जीवाची आता मला पर्वाच राहिलेली नाही बलराज. दुःख याचंच आहे की ज्या कामगारांच्या हितासाठी माझ्या पपांनी आणि मी जिवाचं रान केलं त्याच कामगारांपैकी एकानं माझ्या जिवावर उठावं—

**बलराज** : का उगीच त्या कामगारांचा संशय घेतो आहेस ? या अशा उतावळ्या आणि संशयी स्वभावानं तू नेहमी स्वतःवरच दुःख ओढवून घेतोस. त्या वेळी माझाही अकारण संशय घेतलास. मला दुखावलंस. त्या संशयाच्या भरात उतावळेपणानं

जाईच्या जीवावर उठलास आणि तिला जन्माची जायबंदी करून ठेवलंस. झालं इतकं पुरे नाही का झालं?

**विक्रम :** तो विषय काढू नकोस बलराज. ते वेगळं, हे वेगळं.

**बलराज :** काही वेगळं नाही. एवढ्या दंगलीत तेच कामगार छातीचा कोट करून तुझ्या भोवती उभे राहिले म्हणूनच बचावलास ना तू?

**विक्रम :** पण तो लाठीचा वार—

**बलराज :** येवढ्या गर्दीत कुणीही केला असण्याची शक्यता आहे किंवा त्या दंगलीचा फायदा घेऊन तुझ्या कुणी हितशत्रूनं जाणूनबुजून तुझा काटा काढण्यासाठी केला असण्याची कमी शक्यता नाहीये!

**विक्रम :** माझ्या मरणानं कुणाचा काय फायदा होणार होता? उलट हा संप मिटला तर माझ्यामुळेच मिटण्याची शक्यता आहे.

**बलराज :** म्हणूनच कदाचित तू कुणाला नकोसा झाला असशील. परवा रूपालीशी झालेल्या वादाच्या वेळी तू तिला तुझ्या मृत्युपत्राबद्दल सांगितलंस. कदाचित—

**विक्रम :** डोन्ट टॉक रॉट, बलराज. पहिल्यापासून रूपालीबद्दल तुझं मन नासून गेलंय...रूपाली माझी मुलगी आहे बलराज...प्रत्यक्ष बापाच्या जीवावर...

**बलराज :** मी तसला कुठलाही आरोप तिच्यावर करीत नाहीये. मी तुला फक्त इतकंच वारंवार बजावून सांगतोय, तिच्याबद्दल फार खात्री बाळगू नकोस. आणि कामगारांच्या-बद्दलही विनाकारण संशय घेऊ नकोस. तुझंच मन त्यांच्याबद्दल असं कलुषित झालं तर हा संप आणखी चिघळत रहाणार आहे. मिटायचा असला तर तुझ्यामुळे— फक्त तुझ्यामुळेच मिटणार आहे, आणि तो मिटायलाच हवा. तुलाच तो मिटवायला हवा. मित्रा, तुला अप्रिय पण सत्य असं एक सांगू? तू सत्प्रवृत्त आहेस, बुद्धिमान आहेस, कर्तबगार आहेस; पण तितकाच तू असंयमी आहेस, उतावळा आहेस आणि काही बाबतींत मनानं कमकुवत आहेस. तुझ्यातले हे दुर्गुण वेळीच झटकून टाक आणि खंबीरपणानं सगळी सूत्रं स्वतःच्या हातात घे. तरच तू आणि तुझ्या पपांनी उभं केलेलं हे उद्योगमंदिर कळसापर्यंत जाणार आहे. नाहीतर स्वार्थाच्या घुशी हे मंदिर जमीनदोस्त केल्याशिवाय रहाणार नाहीत. आय वॉर्न यू.

[रूपाली व उदय बाहेरून येतात.]

**रूपाली :** इतकं आभाळ भरून आलंय बाहेर आणि वारंही इतकं भन्नाट सुटलंय, मी तर गारठूनच गेले अगदी...पण...(विक्रमला व बलराजला पाहून) हाय डॅडी...हाय अंकल. (हसून) मला वाटलंच होतं! म्हटलं आमचे डॅडी रागावून रागावून जाणार कुठे? तुमच्या फार्मवर आले होते ना अंकल?

**बलराज :** हं.

**रूपाली :** मग महिना-दोन महिने त्यांना तिथेच नाही का ठेवून घ्यायचं. तिथल्या

मोकळ्या हवेत डोकं शांत झालं असतं त्यांचं. इथे उगीच आलतूफालतू कारणासाठी चिडचिड करतात आणि माझं डोकं खातात.

विक्रम : आलतूफालतू कारण? पपांच्या आणि माझ्या उभ्या कारकिर्दीत जे कधी घडल नाही, ते घडलं! माझ्या कारखान्याच्या दारात माझा कामगार दिवसाढवळ्या मारला गेला.

रूपाली : मग त्यात काय विशेष झालं? संप म्हटला की असा एखादा किरकोळ प्रकार होणारच.

विक्रम : किरकोळ प्रकार? अग माझा एक कामगार माझ्या दारात जीवानिशी जातो—

रूपाली : तशी काय लाखो, करोडो माणसं जगात रोज जीवानिशी जातच असतात.

विक्रम : लाखो-करोडोंशी मला कर्तव्य नाही. हा माझा कामगार होता!

रूपाली : असेल.

विक्रम : तो एक जीवानिशी मेला...पण या संपामुळे माझे हजारो कामगार आणि त्यांची बायकामुलं अन्नान्नदशा होऊन रोज जिवंत मरण भोगताहेत.

रूपाली : संपावर जायला काही मी कामगारांना सांगितलं नव्हतं. त्यांच्याच कर्मांची फळं ते भोगताहेत.

विक्रम : त्यांच्या कर्मांची नाही, तुझ्या कर्मांची फळं भोगताहेत ते! रूप, राजेंद्र ट्रॅक्टर्सच्या फाटकाबाहेर आमरण उपोषणाला बसलेल्या कामगारांना भेटून त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलून आलोय मी आता!

रूपाली : ते समजलं मला.

विक्रम : ही जखमही तिथेच झाली मला.

रूपाली : तेही समजलंय मला.

विक्रम : माझ्या आजारपणात तू कारभार हातात घेतल्यापासून तू काय काय उद्योग केलेस ते सगळं समजलंय मला!

रूपाली : कसले उद्योग?

विक्रम : चार कामगारांना तू काढून टाकलंस हे काही या संपाचं एकच कारण नाही. ती फक्त भडका उडवणारी शेवटची ठिणगी होती. सुरुंग तू आधीपासून पेरून ठेवलेले होतेस!

रूपाली : सुरुंग?

विक्रम : आपल्या उद्योगसमूहात कामगार-कल्याण्याच्या मी प्रयत्नपूर्वक सुरू केलेल्या सर्व योजना तू एक एक करून बंद पाडल्यास. [कामगारांना फक्त पन्नास पैशांत दुपारचं जेवण मिळावं म्हणून आपल्या प्रत्येक कारखान्यात मी कॅन्टीन्स उघडली होती. ती कॅन्टीन्स तू बंद केलीस. माफक दरात कामगारांना किराणामाल, धान्य आणि कापड मिळावं म्हणून मी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स सुरू केलं होतं. ते बंद केलंस. मोफत

वाचनालय, व्यायामशाळा आणि सांस्कृतिक केंद्र तर बंद केलीसन्च, पण त्या कामगारांच्या मुलांना मोफत शिक्षण आणि त्यांच्या घरातल्या माणसांना मोफत औषधोपचार मिळावेत म्हणून मी सुरू केलेल्या शाळा आणि दवाखानेही तू बंद केलेस. |x

**रूपाली** : हो, केलं मी हे सगळं बंद. आपला उद्योगसमूह म्हणजे काही अन्नछत्र नाही, (पांजरपोळ नाही की धर्मादाय संस्था नाही.) हा व्यापारासाठी उभा केलेला उद्योग आहे. इथे माल तसं मोल आणि काम तेवढं दाम एवढाच हिशेब असतो आणि तेवढाच हिशेब मला समजतो. कामगारांचं हित, कामगारांचं कल्याण, कामगारांचं यंव आणि कामगारांचं त्यंव असल्या तुमच्या भंपक कल्पनांपायी हे कामगार डोक्यावर मिऱ्या वाटायला लागतात. कामगारांचे असले फालतू लाड मी मुळीच चालू देणार नाही. पायातली वहाण पायातच ठेवणार आहे मी !

**विक्रम** : मी—मी—मी ! कोण ग तू ? ही 'मी'ची भाषा केव्हापासून शिकलीस तू ? काय अधिकार आहे तुला हा मीपणा गाजवण्याचा ? काय केलंस तू हा उद्योगसमूह उभा करण्यासाठी ? रक्ताचं पाणी केलंस ? अग शून्यातून हा उद्योगसमूह उभा केला माझ्या पणजोबांनी; रक्तामासाचं खतपाणी घालून फुलवला मी आणि माझ्या कामगारांनी. आयत्या बिळावरच्या नागिणीसारखी तू. आज आम्हालाच डंख करायला निघालीस. नाही बये, भलत्या भ्रमात राहू नकोस. माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी कधीही हे होऊ देणार नाही !

**रूपाली** : उगीच त्रागा करू नका डॅडी. तुम्ही काहीही करू शकत नाही आहात !

**विक्रम** : म्हातारा झाला, गलितगात्र झाला तरी सिंह हा सिंह असतो हे कधीही विसरू नकोस ! मी काय करू शकतो आणि काय करणार आहे ते ऐकायचंय ? ऐक ! माझ्या मृत्युपत्रात जे तू स्वतः करावंस असं मी लिहून ठेवलं होतं, ते मी आता स्वतःच करणार आहे. या सगळ्या उद्योगसमूहाचा मी सार्वजनिक ट्रस्ट करणार आहे. कुणाही एका व्यक्तीला या दौलतीतली एक पैही खाजगी उपभोगासाठी वापरता येणार नाहीये. ही लोकांची दौलत आहे. ही लोककल्याणासाठीच वापरली जाईल. स्वतःच्या स्वार्थासाठी आणि महत्त्वाकांक्षेसाठी हा उद्योगसमूह राबवता येईल, या भ्रमात तू मुळीच राहू नकोस !

**रूपाली** : मी कधीही कुठल्याही भ्रमात नव्हते डॅडी. /आणि तुम्हीही भ्रमात राहू नका. X| काही माणसांत जन्मतःच एक सुईसायडल टेन्डन्सी असते. कामगारकल्याणाच्या दिवाळखोर स्वप्नापायी स्वतःचा सर्वनाश करून घेण्याची टेन्डन्सी आजोबांच्यातही होती आणि तुमच्यातही आहे, हे मी केव्हाच ओळखलं होतं. तेव्हापासूनच मी प्रत्येक पाऊल सावधपणानं टाकीत होते. तुम्ही आजारी पडल्यावर एक एक सूत्र हातात घेतलं. मॅनेजिंग बोर्डावरची तुमच्या विश्वासातली माणसं एक एक करून बाजूला

सारली. त्यांच्या जागी माझी माणसं आणली. कामगारांना तुम्ही दिलेल्या एक एक सुखसोयी बंद करून त्यांना डिवचीत डिवचीत संपावर जायला भाग पाडलं, ते उगीच नाही. या संपामुळे आणि माझ्या मॅनिप्युलेशनमुळे आपल्या उद्योगासमूहाच्या शेअर्सचा भाव बाजारात घसरायला लागला. शेअर्स भराभर विक्रीसाठी बाहेर आले आणि मी ते सर्व कॉर्नर केले. आज ह्या उद्योगसमूहाचे सत्तर टक्के शेअर्स माझ्या कब्जात आहेत डॅडी. तुम्ही मनात आणलंत तरी आज काहीही करू शकत नाही आहात. हा उद्योगसमूह माझा आहे. फक्त माझा. (फोनची घंटा वाजते. रूपाली फोन घेते.) हलो...हाय व्हिकी डार्लिंग...झोपेतून आत्ता उठलास? यू लेझी बगर... अरे म्हणजे काय, तुझ्याबरोबर मी नाही का जागले रात्रभर...पण सकाळी सातला उठून कामाला लागले...अरे अपना व्हिगर क्या है?...रात्रीचं काय विचारतोस? यार, मझा आ गया! मी आमच्या नवरोबाला सांगितलं, 'यू आर अ चाइल्ड... माय व्हिकी इज अ मॅन...अ रिअली मॅन...अ रेग्युलर टायगर...' सेक्स कशाशी खातात ते समजून सांग यार त्याला तू एकदा! नाही, नाही...आज नाही यार. आज अपना मूड खराब है...अच्छा...पुन्हा फोन कर. किस मी ऑन द फोन डार्लिंग. (फोनचा मुका घेते.) बाय. (फोन ठेवते.)

विक्रम : (अत्यंत व्याकुळ) बलराज. (तुझी भविष्यवाणी खरी ठरली बलराज.) अरे हे ऐकताना माझे कान कसे फुटले नाहीत...माझं काळीज कसं फाटलं नाही...उदय... उदय...तू तरी कसं सहन करतो आहेस हे...या छिनाल हडळीच्या नरडीचा घोट कसा घेत नाहीयेस तू?

रूपाली : तुम्ही उदयला माझ्याविरुद्ध भडकवायचा प्रयत्न चालवलाय का? तसं असेल तर त्याचा काहीही उपयोग व्हायचा नाही डॅडी. माझ्या नीतीच्या कल्पना सीता-सावित्री युगातल्या जुन्यापुराण्या राहिलेल्या नाहीयेत आणि या बाबतीत उदयच्यात आणि माझ्यात परफेक्ट अँडरस्टँडिंग आहे. आम्ही दोघांनी एकमेकांना समजून घ्यायचं ठरवलंय. खरं ना उदय?

विक्रम : कुलटे, अग प्रत्यक्ष नवऱ्याला—

रूपाली : कशाला नाक खुपसताय डॅडी तुम्ही आमच्या खाजगी बाबतीत? उदयला जे मी एकदा सांगितलं तेच मी तुम्हाला स्पष्टपणे सांगते! मी काय करावं आणि कसं वागावं हा माझ्या मर्जीचा प्रश्न आहे. मला कुणीही काही शिकवण्याची गरज नाही. तुमच्या लक्षात आलंच असेल डॅडी, की या घरात यापुढे तुमचं आणि माझं जमणं अशक्य आहे. आपलं एक क्षणभरही पटायचं नाही. तेव्हा विश्रामपूरच्या वृद्धाश्रमात मी तुम्हाला ठेवायचं ठरवलंय.

विक्रम : वा रे वा! सिंह म्हातारा झाला म्हणून हे पिल्लू त्याला पांजरपोळात ठेवणार म्हणे. ते विसर. त्याची काहीही गरज नाहीये. ज्या घरात तुझ्यासारखी नादान,

कृतघ्न, नीच, कुलटा आहे, त्या घरातला पाण्याचा थेंबही मला विषासारखा आहे.
कीड लागलेल्या या ऐश्वर्यात खुशाल नरकातल्या किड्यासारखी जन्मभर लोळत रहा.
हा जन्म ही मुळातच आहे
एक गलिच्छ, लाजिरवाणी घटना.
पण माणसाचा जन्म म्हणजे तर मूर्तिमंत पाप आहे पाप
असल्या शापापेक्षा, अवकाशाच्या ओसाडीतली
चिरंतरन निर्जीव स्तब्धता किती भाग्यशाली असली पाहिजे !
त्यातून जन्म अटळच असेल—
तर जन्म मिळावा पशुपक्ष्यांचा, कीडामुंगीचा,
प्रसंगी क्षुद्र जीवजंतूचाही जन्म चालेल,
पण हे चांगलं, हे वाईट, हे कळणारा
आणि कळून मनाला नुसताच छळणारा
हा वांझ, ढोंगी, भ्याड, माणसाचा जन्म
मात्र नकोऽ नकोऽऽ नकोच नको !
नर आणि मादी, ही कशी सोपी नाती आहेत नाही ?
पण त्यात मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण, बाप, आई,
ही नाती कालवली की गुंता, गुंतावळच वाढवतो.
एकेक नात्याचा शब्द,
हक्काची साहेबी टाच तेवढी नरडीला लावतो.
आणि फास आवळून 'देणे' तेवढे पुरेपूर वसूल करतो.
माणसांच्या दुनियेतली सगळी नाती झूट आहेत झूट.
खरा आहे फक्त, माणसाच्या उत्पत्तीबरोबरच, रक्तात रुजलेला
स्वार्थ, विश्वासघात, द्वेश, क्रौर्य आणि छिनालपणा !
वाघासिंहांच्या बलदंड छाव्यांनी
कधी आईच्या नरडीचा घोट घेतला असेल का ?
जलाल नागिणीच्या पिल्लांनी
फणा उगारून कधी आपल्या पित्यालाच डंख केला असेल का ?
मग माणसांच्या पिल्लांत हे गरळ आले कुठून ?
माणसाचे छावे, म्हाताऱ्या मातापित्यांवरच
झडप घालायला शिकले कोठून ?
गाढ वात्सल्याच्या पोटी उपजते तिचंच नाव
कृतघ्नता !
("कृतघ्नता —कृतघ्नता" असं पुटपुटत जाऊ लागतो.)

उदय : डॅडी—डॅडी कुठे निघालात तुम्ही?

विक्रम : या नरकाबाहेर–जगाच्या पाठीवर कुठेही–जा उदय–जाईला खाली घेऊन ये–आधी जाईला खाली घेऊन ये–पण थांब, हे घर सोडण्यापूर्वी माझ्या काळजात सळसळणारा एकच सवाल मला तुला विचारायचाय. खरं खरं उत्तर दे. देशील? या कुलटेचा सगळा स्वैराचार तुला पुरेपूर माहिती असलाच पाहिजे. नाही म्हणू नकोस. तिचा हा अनाचार तू निमूटपणे का सहन करतो आहेस? तिचा हा छिनालपणा उघड्या डोळ्यांनी तू का पहात राहिला आहेस? का, का, का? इतकं वेडं आंधळं प्रेम आहे तुझं तिच्यावर? [उदय मान खाली घालतो.] बलराज, बलराज, अरे अश्शीच मान खाली घालून पपा उभे होते. मी विचारलं जेव्हा त्यांना "पपा पपा, एकच सांगा, आईचा हा व्यभिचार उघड्या डोळ्यांनी तुम्ही का सहन केलात?" तर पपा—अशीच मान खाली घालून...माय गॉड! एक वर्तुळ पूर्ण झालंय बलराज. अरे हे एक भीषण वर्तुळ पूर्ण झालंय. [उदय खाली मान घालून जातो.] ऐन तारुण्यात आईच्या व्यभिचारावर थुंकून, सगळ्या ऐश्वर्यावर लाथ मारून अंगावरच्या वस्त्रानिशी ललितमहालातून बाहेर पडलो. चाळिशीत स्वतःच्या कर्तबगारीवर हा उद्योगधंद्याचा गगनभेदी वृक्ष उभारला आणि आता म्हातारपणी कुठे येऊन पोचलो? या—या ऐश्वर्यानंच बोट धरून पोचवलं मला पोटच्या पोरीच्या छिनालपणापाशी! बलराज—मी शापित आहे रे...मी शापित आहे. माझा जन्मच शापित आहे. माणसांच्या दुनियेतली सगळी नाती झूट आहेत झूट!

बलराज : मित्रा...मित्रा...माझं प्रेमदेखील?

विक्रम : नाही...नाही...तेवढा एकच होता मला उःशाप! अरे पण मला करंट्याला समजलाच नाही रे—कधी उमजलाच नाही!

बलराज : आता तरी उमजला ना—मग चल—माझ्याबरोबर माझ्या फार्मवर चल—जाईलासुद्धा घेऊन ये. उरलेलं आयुष्य आपण सारे मिळून—

विक्रम : नाही बलराज, नाही. ते आता होणार नाही. कधीही होणार नाही. अश्वत्थाम्यासारखा माझा शाप मी माझ्या मस्तकावरच वाहीन. कुणाचंही घर मी यापुढे डागाळणार नाही. कुणाच्याही आश्रयाला जाणार नाही. कुणाचाही आधार आता मला नको आहे. मी एकटाच रुजेन अश्वत्थ वृक्षासारखा आणि उन्मळेन तोही गगनभेदी...

[आतून भयानक किंकाळी ऐकू येते. सर्व दचकतात.]

बलराज...बलराज...कुणाची किंकाळी ही?

[उदय धावत येतो.]

उदय : मम्मींनी चौथ्या मजल्याच्या खिडकीतून खाली उडी मारली.

बलराज : माय गॉड!

विक्रम : काय—काय म्हणालास उदय—माझी जाई–माझी जाई...

बलराज : नाही विक्रम–तू बाहेर यायचं नाहीस–तू इथेच थांब.

विक्रम : बलराज, अरे जाई तिकडे—

बलराज : मी आहे ना–मी पाहतो सगळं. उदय, तू विक्रमपाशी थांब–त्याला येऊ देऊ नकोस बाहेर.

[बलराज बाहेर धावतो.]

विक्रम : सोड सोड उदय—

उदय : डॅडी, प्लीज!

विक्रम : सोड उदय, मला जाईकडे जाऊ दे—आई गऽऽ (छाती दाबीत गॅलरीच्या कठड्याकडे धडपडत जातो.) जाई...जाई...मला सोडून जाऊ नकोस जाई...माझ्या एका चुकीची अशी भयानक शिक्षा मला देऊ नकोस जाई...

उदय : डॅडी...डॅडी...

विक्रम : (हंबरडा फोडीत) जाईऽऽऽ आई ग! उदय—उदय—जाई कुठंय—बलराज कुठंय—माझ्या डोळ्यासमोर अंधेरी येतेय—उदय—बलराज—

[बलराज प्रवेश करतो.]

बलराज : (कंठ दाटलेल्या सुरात) विक्रम...

विक्रम : बोलू नकोस बलराज–ते भयानक शब्द तोंडातून उच्चारूसुद्धा नकोस...मला समजलंय...जाईनं मला क्षमा केलेली नाहीये बलराज...ती कायमची रुसलीय माझ्यावर...(छाती दाबीत बलराजच्या हातावर कोसळतो.) बलराज...मित्रा...निदान तू तरी जाईसारखा माझ्याकडे पाठ फिरवू नकोस...मला क्षमा केली असं म्हण... बलराज...

बलराज : म्हणायची गरजच काय आहे विक्रम—अरे मित्रानं का मित्राची कधी क्षमा मागायची असते?

विक्रम : बलराज...मित्रा...

[प्राण सोडतो. मागे आकाशात प्रचंड विजेचा कडकडाट. वादळाचं तांडव सुरू असतानाच पडदा हळूहळू खाली येतो.]

अंक तिसरा संपला

IRBK-0119717

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. नं. १२०७८ नों. दि. ७।५।८३
वि. ....नाटक.... नं. ........